महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

हाकारा

जुलै - डिसेंबर २००४

आदिवासी विकास धोरण

वर्ष : पंचविसावे ★ अंक : तिसरा व चौथा

राणीपूर गाव, ता. शहादा, जि. नंदूरबार.

औषधी वनस्पती गोळा करणारा भगत.

कष्टकरी जनता, भूषण भारता वंदन करतो पददलिता !
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

वर्ष पंचविसावे : अंक तिसरा - चौथा **हाकारा** जुलै - डिसेंबर २००४

अनुक्रमणिका

संपादकीय
A SUMMERY ५
DRAFT TRIBAL POLICY ७
केंद्रसरकारच्या नवीन आदिवासी धोरणाचा मराठी गोषवारा १९
आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरणाचा मसुदा : प्रश्न आणी पर्याय २८
तज्ञांच्या प्रतिक्रिया ३४
महाराष्ट्रातील प्रक्रियेतून पुढे आलेल्या सुचना व प्रतिक्रिया ५६
आदिवासी / मूळ निवासी जनतेचे दिल्ली घोषणापत्र ८१
सहभागी कार्यकर्त्यांची यादी ८७
विचार विनिमय प्रक्रियेचा घटनाक्रम ९०

◆ पत्रव्यवहाराचा पत्ता
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११००७
दुरध्वनी - २५८८४१५०
मूल्य रू. ५०/-

◆ अतिथी संपादक मंडळ
(प्रयास गट)
सुबोध वागळे
प्रांजल दीक्षित
ललिता जोशी
कल्पना दीक्षित

◆ संपादक
रामचंद्र मुटाटकर

◆ संपादन सहाय्य
शैलजा आरळकर

◆ मुखपृष्ठ
सुचेता देशपांडे

◆ अक्षर जुळणी व मुद्रण
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०

◆ प्रकाशक
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

महाराष्ट्र मानविज्ञान परिषदेचे (महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एन्थ्रापॉलॉजिकल सायन्सेस) आदिवासींबाबत चर्चेस वाहिलेले त्रैमासिक हाकारा प्रथम १ जानेवारी १९८० रोजी प्रसिध्द झाले. तेव्हापासून आजतागायत ते प्रकाशित होत आहे. स्वयंसेवी संस्थांच्या अडचणी लक्षात घेवून प्रकाशनास विलंब होतो पण खाडा होत नाही, बंद झालेले नाही. हा अंक भारत सरकारने आदिवासी धोरणाचा मसुदा जाहीर केल्यावर त्यावरील जी चर्चासत्रे महाराष्ट्रभर आयोजण्यात आली त्याचा गोषवारा स्वरुपाचा आहे. या प्रक्रीयेस प्रयास संस्थेने पुढाकार घेतला. श्री. सुबोध वागळे व त्यांचे तरुण सहकारी प्रांजल दीक्षित , कल्पना दीक्षित आणि ललिता जोशी यांनी सिंहाचा वाटा या प्रक्रीयेत उचलला. सुरेखा दळवी, मिलिंद बोकील, गोविंद गारे, काळूराम धोदडे ही मंडळी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेशी कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून गेली २४ वर्षे जोडलेली आहेत. तसेच चर्चासत्रात सहभागी झालेले कार्यकर्ते यांचा आमच्या परिषदेशी व हाकाराशी जुना संबंध आहे. त्यामुळे हा हाकाराचा अंक प्रकाशित करण्यास आम्हाला विशेष आनंद होत आहे.

मानव विज्ञान किंवा मानवशास्त्र याचे मराठीत चुकीचे नामकरण मानववंशशास्त्र झाले आहे. त्याची दुरुस्ती आम्ही शासनाच्या मराठी विश्वकोशात केली आहे. मानवशास्त्राचा सैध्दांतिक पाया आदिवासी संस्कृतिच्या अध्ययन, संशोधनावर आधारलेला आहे. मानवी समाज व संस्कृतिच्या उत्क्रांतीची उकल आपल्याला आदिवासी संस्कृति, समाज, अर्थ, स्वयंशासन, धर्म, कला, साहित्य, संगीत इत्यादींच्या अध्ययनातून होते. म्हणून आदिवासी किंवा वेगवेगळ्या प्रदेशातील तत्सम जनसमुदायांना आपण आपल्या पूर्वजांचा दर्जा व वागणूक दिली पाहिजे. ते एका विशिष्ट भूप्रदेशातील आदि किंवा मूळचे रहिवासी आहेत किंवा कसे ही चर्चा निरर्थक आहे. त्यांची एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात किंवा दुर्गम भागात ससेहोलपट झाली असल्यास त्यास विकसित, जास्त संघटक, शस्त्रधारी, संपन्न राज्यकर्ते जबाबदार आहेत. दुसऱ्यांना अविकसित, दरिद्री ठेवून त्यांच्या भूप्रदेशातील संपत्तिचा उपभोग करण्याची प्रकृति अजून जी युध्दे आशिया-आफ्रिकेत लादली जातात त्यावरून उघड होते ही प्रक्रीया चालूच आहे. भारतात आदिवासींना इतर काही नावांनी संबोधण्याच्या मागे आदिवासींच्या निसर्गसंपत्तिचा अमर्याद उपभोग व त्यांच्या अस्मितेचा ऱ्हास करणे हाच आहे.

अलिकडच्या काळात, भारताचे सूज्ञ पुढारी महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरु यांनी आदिवासींच्या विकासाचा, त्यांच्या अस्मितेला धक्का लागू न देता प्रयत्न केला. त्यानुसार भारतीय राज्यघटनेत तरतुदी करण्यात आल्या. अनेक आयोग व समित्यांमार्फत याबद्दलच्या वैचारिक व धोरणात्मक वाटचाली चालू राहिल्या. अगदी अलिकडे म्हणजे ७३ व्या घटनादुरुस्तीत आदिवासी ग्रामसभेस विशेष अधिकार देण्यात आले. इतक्या जमेच्या बाजू असूनदेखील भारत सरकार किंवा महाराष्ट्र व इतर प्रदेशातील शासनव्यवस्थेत आदिवासी कल्याण किंवा आदिवासी विकास स्थापन होण्यास स्वातंत्र्यानंतर २५-३० वर्षांचा काळ लोटावा लागला. महाराष्ट्रात समाजकल्याण विभागाचा उपविभाग म्हणून आदिवासी कल्याण कार्य १९७३-७४ पर्यंत तरी चालले. आता आदिवासी उपयोजना आहेत. परंतु त्या त्या विभागाचा आदिवासी विभागाचे बजेट वाटण्याच्या पलिकडे आदिवासी विभागास काहीही अधिकार नाहीत.

एखाद्या मोठ्या नदीचे मूळ जसे एखाद्या छोट्या कुंडात असते, तसेच सुसंस्कृत व विकसित समाज-संस्कृतीचे

मूळ आदिवासी संस्कृतीत आहे. आदिवासींना मुख्य प्रवाहात सामील करावयाचे म्हणजे काय करावयाचं? म्हणजे नदीच्या मोठ्या प्रवाहास जसे आपण गढूळ केले तसेच नासायचे का? आदिवासी संस्कृतीच्या चांगल्या मूल्यांपासून शिकून मुख्य प्रवाहास कसे स्वच्छ करावयाचे हा खरा प्रश्न आहे. आदिवासींबाबत राष्ट्रीय धोरणाच्या पहिल्या वाक्यातच आदिवासींचा सर्वांगीण विकास त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीस धक्का न लावता पण त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने आखण्याबाबत उल्लेख आहे.

भारतीय संस्कृतिच्या जडण-घडणीत अनेक धार्मिक, जातीय व प्रादेशिक सांस्कृतिक प्रवाहांचा वाटा आहे. तसा आदिवासी संस्कृतीचाही आहे. ज्या रामायणावर भारतीय संस्कृतीची बरीच शाश्वत मूल्ये आधारलेली आहेत, त्यात दंडकारण्यातील आदिवासींचा मोठा वाटा आहे. रावणाबरोबरच्या लढ्यात रामाबरोबर हनुमान इ. आदिवासी होते, अयोध्येचे कोणीही योध्दे नव्हते. रामाचे वनवासात राहणे हे सपाटी प्रदेश अर्थव्यवस्था व वन अर्थव्यवस्था यांचा मिलाफ होता. आदिवासींनी अनेक ठिकाणी ब्रिटीशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य प्राप्त केले. महाभारतातील एकलव्याची कथा ही त्या काळातील राज्यकर्ते आदिवासींची कशी पिळवणूक करत होते याचे उदाहरण आहे. तरी सातपुड्यातील भिल्ल-पावरा आदिवासीत अश्वत्थामाबद्दल कडवटपणा नाही.

आदिवासींकडून स्त्रीच्या वागणूकीबद्दल बरेच शिकण्यासारखे आहे. इतर भारतीय, जातीय समाजात स्त्रीला हुंड्याकरीता जाळणे, पोळणे असे प्रकार घडतात, तिच्यावर बलात्कार होतात, स्त्री ही केवळ भोग्य वस्तू समजतात. आदिवासी पुरुष स्त्रीवर बलात्कार करीत नाही. तिच्याशी विवाह करण्यास देज म्हणजे वधूमूल्य द्यावे लागते. त्यामुळे आदिवासींत स्त्री-पुरुष प्रमाण सम आहे. स्त्री भृणहत्या नाही. जमीन, जंगल, पाणी यांची खाजगी मालकीची कल्पना अलिकडे आपण आदिवासी समाजात रुजवायला लागलो आहे. पारंपारिक आदिवासी समाजात सहकाराची भावना असते. एक भयंकर श्रीमंत व दुसऱ्याची उपासमार असे प्रसंग आदिवासी समाजात नसतात. ओरिसातील डोंगरी कोंढ समाजात जंगल जाळून स्थलांतरीत पोडू शेतीकरीता जमीन कसतात, त्यात समाजातील विकलांग वृद्धांचाही वाटा असतो व त्या जमिनीवर तरुणवर्ग पीक काढून त्याचा वाटा विकलांग व्यक्तीला देण्यात येतो हे मी बघितले आहे.

अशा समाजास मुख्य प्रवाहात सामील करावयाचे म्हणजे नेमके काय करावयाचे? आदिवासी भागातील प्रशासनात दोन प्रकारचे विचार आहेत. (१) प्रशासनाने लोकांपर्यंत कसे पोहोचायचे? म्हणजे त्याकरीता रस्ते व इतर सुविधा हव्यात. रस्तेबांधणीत प्रचंड भ्रष्टाचार करता येतो हे उघड आहे. पाड्या-पाड्यावरच्या आदिवासींनी सोयी-सुविधांपर्यंत कसे यायचे हा विचार नसतो. (२) मुख्य प्रवाात ज्या लोकसंख्येच्या प्रमाणात सोयी-सुविधा असतात, जसे प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र त्यापेक्षा कमी लोकसंख्येच्या प्रमाणात या सोयी आदिवासी भागात केल्या म्हणजे आदिवासी विकासाच्या वाटा मोकळ्या झाल्या असा गैरसमज आहे. तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांना शिक्षा म्हणून आदिवासी भागात पाठविण्यात येते ही शिक्षा आदिवासी समाजावर लादली जाते याचा विचार प्रशासनास शिवत नाही.

आदिवासी धोरण मसुद्यात पंचायत राज्य व त्याचे अधिकार, पारंपारिक स्वशासनाचा आदिवासी समाजाचा अनुभव याचा नामनिर्देश नाही. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आदिवासी विकासाच्या योजनांची चर्चा करताना स्थानिक ग्रामपंचायत, महिला गट, पंचायत समिती यांच्यामार्फत आदिवासी विकासाच्या योजना राबविल्या जावू शकतात याचा विचारही करत नाही. केवळ शासन निर्णय जाहीर करून पगारी कर्मचाऱ्यांच्या मार्फत विकास घडविण्याची दिवास्वप्ने बघायची हे दृश्य पहावयास मिळते. पगारी कर्मचाऱ्यांच्या मार्फत कधी समाजाचा विकास, समाज-संस्कृती परिवर्तन झाले आहे का?

आदिवासींचे जंगलाबद्दलचे, औषधि वनस्पतींचे पारंपारिक ज्ञान याबाबत आपण काय उपयोग करतो किंवा आपली काय भूमिका आहे ? जंगलाची शतकानुशतके राखण कोणी केली ? त्याचा ऱ्हास कोणी केला ? आदिवासींचा केवळ जंगल कामगार म्हणून उपयोग केला जातो, त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केला जात नाही. भगत, वैदूच्या ज्ञानाचा उपयोग केला जात नाही. तो लोकांच्या अंधश्रद्धेचा गैरफायदा घेवून त्यांची पिळवणूक करतो असा आरोप आहे. शासनव्यवस्थेतील वैद्यक क्षेत्रातील मंडळी आदिवासींचे शोषण करीत नाहीत का?

आदिवासी धोरण मसुद्याचा शेवटही मुख्य प्रवाहात सामील होण्याबाबत आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीचा पाठपुरावा करून ग्रामसभेच्या अधिकारांचा व शिफारशींचा आदर केला तर बरेच प्रश्न सुटू शकतील. परंतु त्याकरीता आपण आदिवासींवर ग्रामपंचायती लादू नयेत. तेथेही लोकसंख्येचा निकष लावून अनेक ग्रुप-ग्रामपंचायती केल्या आहेत. जसे नंदुरबार जिल्ह्यात धडगाव तालुक्यात १६३ महसूली गावांकरीता केवळ २५ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायती कार्य कशा करणार ? यांच्या ग्रामसभा कशा होणार ? ग्रामसेवक कोणास भेट देणार ? असे अनेक व्यवहार्य प्रश्न आहेत. परंतु आकड्यावर नियोजन केले तर दुसरे काय होणार. आदिवासी विकास योजनांचे अधिकार महसूल (कलेक्टर), जिल्हा परिषद (सी.ई.ओ.) व आदिवासी विकास (प्रकल्प अधिकारी) यांत विभागले आहेत. त्यांच्यात समन्वय कसा होणार व कोण करणार ? भारतीय प्रशासकीय सेवा जातीय व्यवस्थेपेक्षा जास्त उच्च-नीच उतरंडीवर आधारभूत आहे. अधिकारी आपली ज्येष्ठता-कनिष्ठता त्याप्रमाणे जपतात. या यंत्रणेत आदिवासी विकास होणे दुरापास्तच आहे.

याशिवाय खोट्या आदिवासींचा भयंकर मोठा प्रश्न आहे. नामसाद्रिशाचा फायदा घेवून बरेच बिगर आदिवासी आदिवासींच्या सोयी सवलतींचा फायदा घेतात. त्यांना शिक्षा होत नाही, पायबंद नाही. त्यामुळे खरे आदिवासी वंचितच राहतात. हे सर्व चालते मतांच्या राजकारणामुळे. आपली न्यायसंस्था त्यामानाने वस्तुनिष्ठ असली तरी सर्वज्ञ नाही. त्यांच्यासमोर मांडणी करणारे शासकीय वकील तोकडे पडतात व खोट्या आदिवासींचे वकील प्रबळ ठरतात. महाराष्ट्रात खऱ्या-खोट्या आदिवासींबाबत तज्ज्ञ समितींच्या अहवालावर योग्य अंमलबजावणी होत नाही. पर्यायाने खऱ्या आदिवासींवर अन्याय होतो व खोट्यांचे फावते. याविषयावर आदिवासी धोरण मसुद्यात उल्लेखही नाही.

महाराष्ट्रात आदिवासी धोरण मसुद्यावर विस्तृत चर्चा झाली आहे, होत आहे. अजून शासकीय पातळीवर चर्चा व्हावयाची आहे. अलिकडे भारत सरकारच्या आदिवासी विकास विभाग आणि पर्यावरण व वनखाते यांच्यात जंगलजमिनीच्या प्रश्नावरून वाद निर्माण झाला आहे. आदिवासी विभागास जंगलजमिनीबाबत आदिवासींना जमीन देण्यासंबंधी संसदेसाठी बील तयार करण्याचा किंवा मांडण्याचा अधिकार नाही असे जंगलखात्याचे म्हणणे आहे. त्यामुळे जंगलांचा ऱ्हास होईल असा हास्यास्पद आक्षेप त्यांनी घेतला आहे. यावरून आदिवासी धोरणावर अजून सर्व पातळ्यांवर व्यापक चर्चेची निकड आहे हे उघड आहे.

महाराष्ट्रात आम्हाला प्रक्रीयेत सहभागी केलं तरी मुख्य चर्चेबाबत पुढाकार व आखणी आणि त्याचे अहवाल तयार करणे ही सर्व कार्ये प्रयास या संस्थेने केली त्याबाबत हाकारा व परिषदेतर्फे त्यांचे शतशः आभार व ऋणी आहोत.

रामचंद्र मुटाटकर

HAKARA : SUMMARY

We are happy to present to you this issue of 'Hakara' which presents the discussions on Draft National Policy on Tribals prepared by the Ministry of Tribal Affairs, Government of India. The discussions were held under the auspices of our organization Maharashtra Association of Anthropological Sciences, Shoshit Jan Andolan, a forum of peoples organizations and Prayas – Energy and Livelihood Group, all over Maharashtra between May and July 2004 culminating in a meeting at New Delhi in September 2004. Our colleagues in other organizations held such meetings in northeast and at Ranchi, Bangalore and in Ahmedabad during the same period. Prayas organization took a lead role in organizing these meetings and in preparing the Draft Report.

Since Hakara is published since 1st January 1980 and is devoted to the discussions on tribal issues, we thought it fit to present a consolidated report of the discussions mentioned above.

One of the key contentious issue refers to repeated statements and appeals to scheduled tribes to join the main stream of Indian society. The appeal of assimilation in the mainstream vis-à-vis the approach of integration initiated by Nehru whereby a tribal culture would contribute in evolving a pluralistic main stream of India, strikes at the very root of tribal identity. 73rd Constitutional Amendment has devolved more powers to tribal gramsabhas respecting the traditions of self-governance. However the same is not implemented in the bureaucratic design of tribal development.

The term 'adivasi' is objected to by many fearing that the term concedes the status of original dwellers of the land to scheduled tribe on par with American Indians or Australian aborigines who are mentioned as indigenous people. Actually the origin of all human institutions are to be traced to the tribal institutions. Tribal cultures are indeed studied in various academics disciplines more particularly in Anthropology to study the process of cultural and social evolution.

In this context the 'Adivasi Culture' could be given a status of original culture of humanity. Marx and Engles also conceded this by propagating the concept of primitive communism.

The mainstream Indian society has much to learn from the tribal culture, especially on gender issue. The tribal man does not molest or rape a tribal woman. He has to pay bride price to marry her unlike our dowry system. Male female ratio in tribal society is therefore,

even. There is no female foeticide in tribal society.

The bureaucracy has two approaches for tribal development.

1) How would they reach the people in their villages or hamlets? This requires road construction to facilitate the movement of government functionaries.
2) The development infrastructure and institutions in tribal areas are planned according to the population ratio. The only difference made between the caste peasant society and tribal society pertains to reduction of population per institution in tribal areas. Otherwise there is no qualitative distinct approach in tribal development. No genuine effort is being made to develop the decision-making, planning and implementation authority at the Gram Panchayat level. The approach is to issue Government Resolutions and try its implementation through paid government employees. Similarly no attempt is made to use indigenous knowledge and wisdom of tribal people in respect of forests including medicinal plants. They are used only as forest labour. Tribal development schemes are routed through tribal development departments, to the development sectors and are supervised by the revenue administration (Collector), Zilla Parishad (CEO) and tribal development (Project Officer). There is no coordination between these various authorities. It becomes much worse by the hierarchical ladder in Indian Administrative and Forest services. Recently a fierce debate is on between the Ministry of Environment and Forest, and Ministry of Tribal Affairs at the Government of India about a bill to be tabled in Parliament giving tribal rights to land in the forest. Another dangerous issue is about pseudo tribes claiming the schedule tribe status to claim the benefits. This may possibly be due to politics of vote banks. The expert committee reports on these issues are not properly implemented. The legal system is also ignorant about these issues, thereby making wrong interpretation of Presidential powers in the Constitution to notify the tribal groups as scheduled a tribes. Although the debate on draft policy are continuing at the NGO level, no such discussions have yet started at the governmental level.

This issue of Hakara may provide a handle in that direction. We invite your suggestions.

DRAFT TRIBAL POLICY

NATIONAL POLICY ON TRIBALS
For the first time after the country became Independent, the Government of India is proposing the formulation of a National Policy on Scheduled Tribes.

The policy seeks to bring Scheduled Tribes into the mainstream of society through a multi-pronged approach for their all-round development without disturbing their distinct culture.

There are 67.8 million Scheduled Tribe people, constituting 8.08 per cent of India's population. There are 698 Scheduled Tribes spread all over the country barring States and Union Territories like Chandigarh, Delhi, Haryana, Pondicherry and Punjab. Orissa has the largest number – 68—of Scheduled Tribes.

Scheduled Tribes are those which are notified as such by the President of India under Article 342 of the Constitution. The first notification was issued in 1950. The President considers characteristics like the tribes' primitive traits, distinctive culture, shyness with the public at large, geographical isolation and social and economic backwardness before notifying them as a Scheduled Tribe. Seventy-five of the 698 Scheduled Tribes are identified as Primitive Tribal Groups considering they are more backward than Scheduled Tribes. They continue to live in a pre-agricultural stage of economy and have very low literacy rates. Their populations are stagnant or even declining.

The Constitution through several Articles has provided for the socio-economic development and empowerment of Scheduled Tribes. (You may list the provisions here, if necessary). But there has been no national policy, which could have helped translate the constitutional provisions into a reality. Five principles spelt out in 1952, known as Nehruvian Panchasheel, have been guiding the administration of tribal affairs. They are:

1. Tribals should be allowed to develop according to their own genius
2. Tribals' rights in land and forest should be respected
3. Tribal teams should be trained to undertake administration and development without too many outsiders being inducted
4. Tribal development should be undertaken without disturbing tribal social and cultural institutions
5. The index of tribal development should be the quality of their life and

not the money spent

Realising that the Nehruvian Panchasheel was long on generalities and short on specifics, the Government of India formed a Ministry of Tribal Affairs for the first time in October 1999 to accelerate tribal development. The Ministry of Tribal Affairs is now coming out with the draft National Policy on Tribals. Based on the feedback from tribal leaders, the concerned States, individuals, organisations in the public and the private sectors, and NGOs, the Ministry will finalise the policy.

The National Policy recognises that a majority of Scheduled Tribes continue to live below the poverty line, have poor literacy rates, suffer from malnutrition and disease and are vulnerable to displacement. It also acknowledges that Scheduled Tribes in general are repositories of indigenous knowledge and wisdom in certain aspects.

The National Policy aims at addressing each of these problems in a concrete way. It also lists out measures to be taken to preserve and promote tribals' cultural heritage.

Formal education:

Formal education is the key to all-round human development. Despite several campaigns to promote formal education ever since Independence, the literacy rate among Scheduled Tribes is only 29.60 per cent compared to 52.21 per cent for the country as a whole (1991 Census). The female literacy rate is only 18.19 per cent compared to the national female literacy rate of 39.29 per cent. Alienation from the society, lack of adequate infrastructure like schools, hostels and teachers, abject poverty and apathy towards irrelevant curriculum have stood in the way of tribals getting formal education.

To achieve the objective of reaching the benefit of education to tribals, the National Policy will ensure that:

- Tribals are included in the national programme of Sarva Shiksha Abhiyan run by the Ministry of Human Resource Development.
- Schools and hostels are opened in areas where no such facilities exist.
- At least one model residential school is located in each tribal concentration area
- Education is linked with provision of supplementary nutrition.
- Special incentives like financial assistance, pocket allowance, free distribution of textbooks and school uniforms are provided
- Teaching is imparted in tribals'

mother tongue at least up to the primary level. Educated tribal youth are given employment as teachers, wherever possible. (This will obviate the need to employ teachers belonging to far-off places who find commuting is as difficult as staying in a village with no basic amenities.

- Pedagogy is made relevant so that tribals do not find it as alien.
- Curriculum and cocurriculum include aspects of meta skill upgradation of tribal children.
- Curricula for meta skill upgradation are to include aspects of tribal games and sports, archery, identification of plants of medicinal value, crafts art and culture, folk dance and folk songs, folk paintings etc.
- Emphasis is laid on vocational/ professional education. Polytechnics are set up for studies in subjects like forestry, horticulture, dairying, veterinary sciences, polytechnics.

Traditional wisdom:

Dwelling amidst hills, forests, coastal areas, deserts, tribals over the centuries have gained precious and vast experience in combating environmental hardships and leading sustainable livelihoods. Their wisdom is reflected in their water harvesting techniques, indigenously developed irrigation channels, construction of cane bridges in hills, adaptation to desert life, utilisation of forest species like herbs, shrubs for medicinal purposes, meteorological assessment etc. Such invaluable knowledge of theirs needs to be properly documented and preserved lest it should get lost in the wake of modernisation and passage of time.

The National Policy seeks to:

- Preserve and promote such traditional knowledge and wisdom and document it
- Establish a centre to train tribal youth in areas of traditional wisdom
- Disseminate such through models and and exhibits at appropriate places
- Transfer such knowledge to non-tribal areas

Health:

Although tribal people live usually close to nature, a majority of them need health care on account of malnutrition, lack of safe drinking water, poor hygiene and environmental sanitation and above all poverty. Lack of awareness and apathy to utilise the available health services also affect their health status. In wake of the opening of tribal areas with highways industrialization, and communication facilities, diseases have spread to tribal areas. Endemics like malaria, deficiency diseases, venereal diseases including

AIDS are not uncommon among tribal populations. However, lack of safe drinking water and malnutrition are well-recognised major health hazards. Tribals suffer from a deficiency of calcium, vitamin A, vitamin C, riboflavin and animal protein in their diets. Malnutrition and undernutrition are common among Primitive Tribal Groups who largely depend upon food they either gather or raise by using simple methods. The poor nutritional status of tribal women directly influences their reproductive performance and their infants' survival, growth and development.

Tribal people, who are self reliant and self-sufficient, have over the centuries developed their own medicine system based on herbs and other items collected from the nature and processed locally. They have also their own system of diagnosis and cure of diseases. They believe in taboos, spiritual powers and faith healing. There are wide variations among tribals in their health status and willingness to access and utilise health services, depending on their culture, level of contact with other cultures and degree of adaptability.

Against this background, the National Policy seeks to promote the modern health care system and also a synthesis of the Indian systems of medicine like ayurveda and siddha with the tribal system.

The National Policy seeks to:

- Strengthen the allopathy system of medicine in tribal areas with the extension of the three-tier system of village health workers, auxiliary nurse mid-wife and primary health centres.
- Expand the number of hospitals in tune with tribal population
- Validate identified tribal remedies (folk claims) used in different tribal areas
- Encourage, document and patent tribals' traditional medicines
- Promote cultivation of medicinal plants related value addition strategies through imparting training to youth
- Encourage qualified doctors from tribal communities to serve tribal areas
- Promote the formation of a strong force of tribal village health guides through regular training-cum-orientation courses
- Formulate area-specific strategies to improve access to and utilisation of health services
- Strengthen research into diseases affecting tribals and initiate action programmes
- Eradicate endemic diseases on a war footing

Displacement and Resettlement:

Displacement of people from traditional habitations causes much trauma to the affected people. Compulsory acquisition of land for construction of dams and roads, quarrying and mining operations, location of industries and reservation of forests for National Parks and environmental reasons forces tribal people to leave their traditional abodes and land – their chief means of livelihood.

Nearly 85.39 lakh tribals had been displaced until 1990 on account of some mega project or the other, reservation of forests as National Parks etc. Tribals constitute at least 55.16 percent of the total displaced people in the country. Cash payment does not really compensate the tribals for the difficulties they experience in their living style and ethos.

Displacement of tribals from their land amounts to violation of the Fifth Schedule of the Constitution as it deprives them of control and ownership of natural resources and land essential for their way of life.

The National Policy for Tribals, therefore, stipulates that displacement of tribal people is kept to the minimum and undertaken only after possibilities of non-displacement and least displacement have been exhausted. When it becomes absolutely necessary to displace Scheduled Tribe people in the larger interest, the displaced should be provided a better standard of living.

The National Policy, therefore, mandates that the following guidelines be followed when tribals are resettled:

- When displacement becomes inevitable, each scheduled tribe family having land in the earlier settlement shall be given land against land. A minimum of two hectares of cultivable land is considered necessary and viable for a family (comprising man, his wife and unmarried children).
- Tribal families having fishing rights in their original habitat shall be granted fishing rights in the new reservoir or at any other alternative place
- Reservation benefits enjoyed at the original settlement shall be continued at the the resettlement area.
- Additional financial assistance equivalent to nearly one and a half year's minimum agricultural wages for loss of customary rights and usufructory rights of forest produce shall be given.
- Tribals are to be resettled close to their natural habitat by treating all the

people so displaced as one group to let them retain their ethnic, linguistic and socio-cultural identity and the network of kinship and mutual obligations

- Free land is to be provided for social and religious congregations.
- If resettlement is possible only away from the district/taluka, then substantively higher benefits in monetary terms shall be given.
- When tribal families are resettled en masse, all basic minimum amenities shall be provided at the new sites. They include roads and passages, electricity, drainage and sanitation, safe drinking water, educational and health care facilities, fair price shops, a community hall and a panchayat office.

Forest villages

Tribal's age-old symbiotic relationship with forests is well known. Recognising this fact, even the National Forest Policy committed itself to the close association of tribals with the protection, preservation and development of forests and envisaged their customary rights in forests. It is, however, a matter of serious concern that about 5000 forest villages do not have minimum basic living conditions and face a constant threat of eviction.

The National Policy suggests that any forceful displacement should be avoided. Human beings move on their own to places with better opportunities. The forest villages may be converted into revenue villages or forest villages may be developed on par with revenue villages to enable the forest villagers enjoy at least the minimum amenities and services that are available in revenue villages.

The National Policy, therefore, mandates that

- Educational and medical facilities, electricity and communication, approach roads and such other basic amenities be provided to forest villagers.
- Public Distribution System (PDS) and Grain Banks be established to prevent food problems.
- Advanced agriculture and animal husbandry technologies be introduced so that forest villagers raise their production, incomes and economic standards.
- Bank and other institutional loans be made available for entrepreneurs with viable projects of income generation
- Tribals be given opportunities to partake in joint forest management and encouraged to form cooperatives and corporations for major forest

related operations

- Integrated area development programmes be taken up in and around forest areas
- Tribals' rights in protection, regeneration and collection of minor forest produce (MFP) be recognised and institutional arrangements made for marketing such produce
- Efforts be made to eliminate exploitation by middlemen in cooperatives like Tribal Development Cooperative Corporations (TDCCs), Large Sized Multi Purpose Societies (LAMPS) and Forest Development Cooperatives by introducing minimum support prices for non agricultural produce on the lines of minimum support prices for agricultural produce.

Shifting Cultivation:

In the evolution of human civilisation, shifting cultivation preceded agriculture as we know it today. In shifting cultivation, tribals do not use any mechanized tools or undertake even ploughing. A digging stick and a sickle are the usual tools. It is widely practised in whole of North- Eastern region besides the States of Andhra Pradesh, Orissa, Tamil Nadu and to some extent in Chhattisgarh and Jharkhand. Though the practice is hazardous to environment, it forms basis of life for tribals. Traditionally, shifting cultivation has been in vogue in hilly terrains where tribals have had the right on land either individually or on community basis. Because of poor yields, crops do not meet their food requirement for more than four months or so in a year.

The tribals involved in shifting cultivation do not seem to have any emotional attachment to the land as an asset or property needing care and attention as in non-tribal areas. In shifting cultivation lands, no attention is paid to the replenishment of soil fertility. Tribals merely believe in harvesting crops without putting in efforts or investments. Land is just left to nature to recoup on its own.

To handle the problem of shifting cultivation, the National Policy will focus on the following aspects:

- Land tenure system will be rationalised giving tribals right to land ownership so that they will invest their energy and resources in checking soil erosion and fertility – which have hitherto been neglected as land belonged to no one but was subject to exploitation by every one.
- Agricultural scientists will be asked to focus on shifting cultivation and evolve suitable technologies to

improve production.

- The shifting cultivators will be ensured sufficient food supply through the public distribution system and grain banks. Tribals will be encouraged to raise cash crops and horticultural plantations.
- Training and extension programmes will be organised to sensitise tribals about alternative economic strategies so that they can come out of shifting cultivation.

Land Alienation:

Scheduled Tribes being simple folk are often exploited to forgo their foremost important resource – land – to non-tribals. Although States have protective laws to check the trend, dispossessed tribals are yet to get back their lands. Yet, another form of land alienation takes place when States promote development projects like hydro-electric power stations and mining and industries. These developmental activities, which do not confer any benefit on tribals directly, render them landless.

The National Policy for Tribals seeks to tackle tribal land alienation by stipulating that

- Tribals have access to village land records
- Land records be displayed at the panchayat
- Oral evidence be considered in the absence of records in the disposal of tribals' land disputes
- States prohibit transfer of lands from tribals to non-tribals
- Tribals and their representatives be associated with land surveys
- Forest tribal villagers be assigned pattas for the land under their tillage since ages
- States launching development projects take adequate care to keep tribal lands intact and when not possible, allot land even before a project takes off

Intellectual Property Rights:

Scheduled Tribes are known for their knowledge and wisdom of ethnic origin. There is, however, no legal and/or institutional framework to safeguard their intellectual property rights.

The National Policy, therefore, will aim at making legal and institutional arrangements to protect their intellectual property rights and curtailing the rights of corporate and other agencies to access and exploit their resource base.

Tribal Languages:

The languages spoken by tribals - tribal languages - are treated as unscheduled languages. In the wake of changing educational scenario, many of the tribal

languages are facing the threat of extinction. The loss of language may adversely affect tribal culture, especially their folklore.

The National Policy aims at preserving and documenting tribal languages. Education in the mother tongue at the primary level needs be encouraged. Books and other publications in tribal languages will be promoted.

Primitive Tribal Groups (PTGs):
Primitive Tribal Groups (PTGs) are Scheduled Tribes known for their declining or stagnant population, low levels of literacy, pre- agricultural technology, primarily belonging to the hunting and gathering stage, and extreme backwardness. They were considered as a special category for support for the first time in 1979. There are 75 Primitive Tribal Groups spread over 15 States and Union Territories. The 25 lakh PTG population constitutes nearly 3.6 per cent of the tribal population and 0.3 per cent of the country's population.

PTGs have not benefited from developmental activities. They face continuous threats of eviction from their homes and lands. They live with food insecurity and a host of diseases like sickle cell anaemia and malaria.

The National Policy envisages the following steps to tackle PTGs' problems:

- To boost PTGs' social image, their being stigmatized as 'primitive' shall be halted.
- Efforts shall be made to bring them on par with other Scheduled Tribes in a definite time frame. Developmental efforts should be tribe-specific and suit the local environment.
- Effective preventive and curative health systems shall be introduced.
- PTGs' traditional methods of prevention and cure shall be examined and validated.
- To combat the low level of literacy among PTGs, area and need specific education coupled with skill upgradation shall be given priority.
- Formal schooling shall be strengthened by taking advantage of 'Sarva Shiksha Abhiyan'. Trained tribal youth shall be inducted as teachers.
- Teaching shall be in tribals' mother tongue/dialect
- Considering PTGs' poverty, school-going children shall be provided incentives.
- Emphasis shall be on laid on vocational education and training.
- PTGs shall enjoy the 'right to land'. Any form of land alienation shall be

prevented and landless PTGs given priority in land assignment.

- Public distribution system (PDS) shall be introduced to ensure regular food supply. Grain banks shall be established to ensure food availability during crises.
- PTGs' participation in managing forests shall be ensured to meet their economic needs and nourish their emotional attachment to forests.

Scheduled Tribes and Scheduled Areas:

Although the Constitution is clear about the concept and strategy adopted for defining Scheduled Areas and tribal areas in terms of Fifth and Sixth Schedules under Articles as 244(1) and 244(2), there is some confusion among those concerned with implementing them.

The National Policy, therefore, envisages the following steps:

- The regulation making powers of State Governors to maintain good governance, peace and harmony in tribal areas will be further strengthened. It will be ensured that Tribal Advisory Councils meet regularly and focus on speedy developmental works and prohibition of land transfers. Money lending menace shall be curbed through implementation of money lending laws.
- Tribal Advisory Councils will be established in States which have Scheduled Areas and even in States where a substantial number of tribal people live although Scheduled Areas have not been declared.
- The Autonomous District/Regional Councils in North-Eastern Stateswill be further strengthened. The Councils are elected bodies having powers of legislation and execution and administration of justice.

Administration:

The existing administrative machinery in States and districts comprising Integrated Tribal Development Agencies (ITDA) and Integrated Tribal Development Projects (ITDP) have not been up in terms of the quality of performance and development indicators.

The National Policy seeks to revitalise the administration by proposing the following:

- Skill upgradation-cum-orientation programmes shall be conducted for tribal administration officials.
- Infrastructure development shall be given priority to so that officials will function from their places of posting.
- Only officials who have adequate

knowledge, experience and a sense of appreciation for tribal problems shall be posted for tribal administration.

- As the schemes meant for improving tribals' condition take time, a tenure that is commensurate with their implementation shall be fixed for officials.

Research:

The National Policy acknowledges the importance of a good database to deal with Scheduled Tribes' affairs. Research on tribals' ethnic profiles, spectrum of problems and prospects and developmental constraints and monitoring and evaluation of schemes and projects needs priority attention.

The National Policy for Tribals proposes that the existing Tribal Research Institutes located in different States shall be further strengthened for carrying out purposeful research and evaluation studies and work towards the preservation of the rich tribal cultural heritage. It also envisages the establishment of a national-level research institution.

Participatory Approach:

The National Policy recognises the importance of participatory approach to development. Non- Governmental Organisations (NGOs) and Voluntary Agencies (VAs) act as catalysts in reaching benefits of Government programmes and policies to the grass-root level and thus optimise the desired accomplishment. Such organisation's have direct linkages with people and are conversant with their problems. NGOs can undertake and promote family and community based programmes and mobilise resources in tribal areas. Some well-established NGOs are eager to take part in the development of Scheduled Tribes in general and Primitive Tribal Groups in particular.

The National Policy, therefore, seeks to enlist and encourage NGOs in tribal development activities. They can play an important role in the opening of residential and non-residential schools, hostels, dispensaries, hospitals and vocational training centres, promotion of awareness programmes and capacity building.

Assimilation:

To bring the tribals into country's mainstream, the National Policy envisages the following

- Identification of tribal groups with 'primitive traits' shall be done away with on a priority basis.
- The 'distinct culture' of the tribes reflected in their folk art, folk

literature, traditional crafts and ethos shall be preserved. Their oral traditions shall be documented and art promoted.

- Opportunities shall be provided for tribals to interact with outside cultures.
- Their geographical isolation shall be minimised through development of roads, transport and means of communication and provision of concessional travel facility.

आदिवासींसाठीच्या राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याचा मराठी गोषवारा

स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारत सरकारने अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय धोरण ठरविण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या ६७.८ लक्ष म्हणजेच देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८.०८% एवढी आहे. राज्य घटनेच्या ३४२व्या कलमानुसार राष्ट्रपतींनी प्रमाणित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते. जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून घोषित करण्याआधी त्यांच्या काही गुणवैशिष्ट्यांचा विचार केला जातो. जसे की, आदिमपणाची लक्षणे/मागासपणाच्या खुणा, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, बुजरेपणा, भौगोलिक वेगळेपणा आणि सामाजिक व आर्थिक मागसलेपणा. ६९८पैकी ७५ अनुसूचित जमाती आदिम/पुरातन म्हणून ओळखल्या जातात. इतर अनुसूचित जमातींच्या तुलनेने त्या अप्रगत असतात. अनुसूचित जमातींच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीला धक्का न लावता त्यांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे, आणि सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून ते साध्य करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारण्यात आलेला आहे.

राज्यघटनेत अनेक कलमांच्या माध्यमातून अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाची तसेच सबलीकरणाची तरतूद केलेली आहे. पण या घटनात्मक तरतुदी प्रत्यक्षात येण्यासाठी मदत करू शकेल असे कोणतेही राष्ट्रीय धोरण अस्तित्वात नाही. १९५२ मधे विशद केलेल्या पाच मार्गदर्शक तत्त्वांनुसार (पंडित नेहरूंचे पंचशील) आदिवासींविषयक कामांचे प्रशासन चालवले जाते.

पाच मार्गदर्शक तत्त्वे याप्रमाणे :

१) आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या क्षमता आणि प्रतिभेनुसार विकासाची संधी मिळावी.

२) आदिवासींच्या जंगल व जमीन यांच्यावरील अधिकारांचा आदर केला जावा.

३) प्रशासकीय आणि विकासाच्या कामांसाठी अनेक बिगर-आदिवासींऐवजी आदिवासी गटांनाच प्रशिक्षण दिले जावे.

४) आदिवासींच्या सामाजिक-सांस्कृतिक संस्थांना बाधा न आणता विकासविषयक कामे केली जावीत.

५) आदिवासी विकासाचा निर्देशक त्यासाठी खर्च झालेला पैसा हा नसून, आदिवासींच्या जीवनमानाचा दर्जा हा असावा.

पं. नेहरूंनी विशद केलेल्या पंचशीलात सर्वसाधारण बाबी सविस्तरपणे तर नेमके तपशील मात्र संक्षिप्तपणे दिलेले आहेत. हे लक्षात घेऊन आदिवासी विकासाला चालना देण्यासाठी भारत सरकारने ऑक्टोबर १९९९ मधे आदिवासी विकास मंत्रालयाची स्थापना केली. या आदिवासींवरील राष्ट्रीय धोरणाचा सदर मसुदा आदिवासी विकास मंत्रालयाने तयार केलेला आहे. आदिवासी नेते, संबंधित राज्यशासने, तसेच व्यक्ती, संघटना आणि बिगर-शासकीय संस्था यांनी दिलेल्या सूचनांच्या

आधारे, मंत्रालय हे धोरण निश्चित करणार आहे.

बहुसंख्य अनुसूचित जमाती दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात, आदिवासी साक्षरतेचा दर अतिशय कमी आहे, बहुसंख्य अनुसूचित जमाती कुपोषण आणि रोगराईने ग्रस्त आहेत आणि विस्थापनालाही त्या बळी पडतात याची राष्ट्रीय धोरणाने दखल घेतलेली आहे. यातील प्रत्येक प्रश्न नेमकेपणाने हाताळणे हे राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट आहे.

औपचारिक शिक्षण :

औपचारिक शिक्षण ही माणसाच्या सर्वांगीण विकासाची किल्ली आहे. आदिवासींना शिक्षण मिळण्यामध्ये विविध अडथळे आहेत. समाजापासूनचा तुटलेपणा, शाळा, वसतिगृह, शिक्षक अशा आवश्यक शैक्षणिक सुविधांचा अभाव, आत्यंतिक गरिबी आणि विसंगत अशा अभ्यासक्रमाबाबतची उदासीनता. शिक्षणाचा लाभ आदिवासींपर्यंत पोचवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रीय धोरण खालील बाबींची पूर्तता करेल :

- मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे चालवल्या जाणाऱ्या 'सर्व शिक्षा अभियान'च्या राष्ट्रीय कार्यक्रमात आदिवासींचा समावेश.
- शैक्षणिक सुविधा नसलेल्या भागांमध्ये शाळा आणि वसतिगृहांची सुरुवात.
- प्रत्येक आदिवासी केंद्रित भागात किमान एका आदर्श / नमुना निवासी शाळेची उपलब्धता.
- शिक्षण आणि पूरक आहाराची तरतूद यांची सांगड.
- आर्थिक सहाय्य, नियमित प्रासंगिक भत्ते, पाठ्यपुस्तके आणि शालेय गणवेशांचे मोफत वाटप, यांसारख्या खास सवलतींची तरतूद.
- किमान प्राथमिक पातळीपर्यंतचे शिक्षण आदिवासींच्या मातृभाषेतून. शक्य तेथे सुशिक्षित आदिवासी तरुणांची शिक्षक म्हणून नेमणूक.
- आदिवासींना उपरी वाटणार नाही अशा प्रकारची सुसंगत अध्यापन पद्धती.
- आदिवासी बालकांच्या अंगभूत कौशल्य-विकासाचा अभ्यासक्रमात, तसेच पूरक अभ्यासक्रमात समावेश.
- आदिवासींचे मैदानी व इतर खेळ, नेमबाजी, वनौषधींची ओळख, सांस्कृतिक हस्तकला व कौशल्ये, चित्रकला, लोकनृत्य आणि लोकसंगीत इत्यादींचा कौशल्य-विकासासाठीच्या अभ्यासक्रमात काही अंशी समावेश.
- औद्योगिक व व्यावसायिक शिक्षणावर भर. वनविद्या, उद्यानशास्त्र, दुग्धोद्योग, पशुवैद्यक, तंत्रशिक्षण, यांच्या अभ्यासासाठी तंत्रनिकेतनांची स्थापना.

पारंपरिक शहाणपण :

गेली अनेक शतके आदिवासींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शाश्वत पद्धतींनी उपजीविका चालविण्याचा विपुल आणि मौल्यवान असा अनुभव मिळवलेला आहे. त्यांच्या अमूल्य ज्ञानाची सुयोग्यपणे नोंद करून त्याचे जतन करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय धोरण त्यासाठी खालीलप्रमाणे प्रयत्न करेल :

- पारंपरिक ज्ञान व शहाणपणाचे जतन करणे आणि त्यांच्या संवर्धनाला चालना देणे व त्याची नोंद करणे

- पारंपरिक शहाणपणाबाबत आदिवासी तरूणांचे प्रशिक्षण करण्यासाठी एका केंद्राची निर्मिती.
- सुयोग्य ठिकाणी प्रदर्शने आणि नमुने यांच्या माध्यमातून अशा ज्ञानाचा प्रसार करणे.
- बिगर-आदिवासी भागांमधे अशा ज्ञानाचे हस्तांतरण करणे.

आरोग्य :

कुपोषण, पिण्याच्या स्वच्छ व शुद्ध पाण्याचा अभाव, अस्वच्छता आणि सांडपाण्याच्या निचऱ्याची अपुरी व्यवस्था, भरीस भर म्हणून गरिबी या सगळ्यांमुळे बहुसंख्य आदिवासींना आरोग्य सेवेची नितांत गरज असते. राष्ट्रीय धोरणाद्वारे आधुनिक वैद्यक व्यवस्थेची, तसेच आयुर्वेद व सिद्ध यासारख्या भारतीय वैद्यक पद्धतींची आदिवासी व्यवस्थेशी सांगड घालण्याला प्रोत्साहन दिले जाईल.

राष्ट्रीय धोरणात खालील बाबींसाठी प्रयत्न केले जातील :

- ग्रामस्तरीय आरोग्य-सेवक, सहाय्यक परिचारिका-दाई आणि प्राथमिक आरोग्य-केंद्रे अशा त्रिस्तरीय व्यवस्थेच्या विस्तारातून आदिवासी भागात ॲलोपॅथीच्या उपचार पद्धतीला बळकटी आणणे.
- आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात रुग्णालयांची संख्या वाढवणे.
- वेगवेगळ्या आदिवासी भागांत प्रचलित असलेल्या उपचारांची चिकित्सा करून ते प्रमाणित करणे.
- आदिवासींच्या पारंपारिक औषधांना प्रोत्साहन देणे, त्यांचे दस्तऐवज तयार करणे आणि या औषधांवर त्यांचा मालकी हक्क प्रस्थापित करणे.
- युवक-प्रशिक्षणाद्वारे वनौषधी लागवडीतील मूल्य वृद्धीच्या प्रयत्नांना चालना देणे.
- आदिवासींमधील योग्य अर्हतेच्या डॉक्टरांना आदिवासी भागातच सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- नियमित अशा प्रशिक्षण व परिचयपर अभ्यासक्रमांद्वारे गावांमध्ये आरोग्य-मार्गदर्शकांची ताकद उभी करायला पाठबळ देणे.
- आरोग्य-सेवांची उपलब्धता व उपयोगिता सुधारण्यासाठी प्रदेश-निहाय कार्यक्रमांची आखणी करणे.
- आदिवासींमधील आजारांवरच्या संशोधनाचे संवर्धन आणि कृती-कार्यक्रमांची सुरुवात करणे.
- साथीच्या आजारांचे उच्चाटन करण्यासाठी युद्ध-पातळीवर प्रयत्न करणे.

विस्थापन आणि पुनर्वसन :

पूर्वापार चालत आलेल्या निवास-स्थानांमधून विस्थापन होणे हा विस्थापितांवर एक जबर आघात असतो. जमीन बळकावली गेल्यामुळे आदिवासींना त्यांचे राहण्याचे पारंपरिक ठिकाण तर गमवावे लागतेच, तसेच त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असलेली जमीनही हिरावली जाते. देशातील एकूण विस्थापितांपैकी ५५.१६% विस्थापित हे आदिवासी आहेत. आदिवासींचे त्यांच्या जमिनीतून विस्थापन करण्याने राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीचे उल्लंघन होते, कारण विस्थापनामुळे आदिवासींना त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरील मालकी हक्कांपासून आणि त्यांच्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग असलेल्या जमिनीपासून वंचित रहावे लागते.

आदिवासींचे विस्थापन किमान मर्यादितच ठेवावे आणि विस्थापन न करण्याच्या तसेच कमीत कमी विस्थापन करण्याबाबतच्या सर्व शक्यता संपल्यानंतरच विस्थापन हाती घेतले जावे असा आग्रह राष्ट्रीय धोरणात धरलेला आहे.

आदिवासींचे पुनर्वसन करताना खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे राष्ट्रीय धोरणानुसार बंधनकारक राहील :

- जेव्हा विस्थापन अटळ असेल तेव्हा आधीच्या वसाहतीमधील अनुसूचित जमातीच्या प्रत्येक जमीनधारक कुटुंबाला जमिनीच्या मोबदल्यात जमीन दिली जावी. किमान दोन हेक्टर कसण्यायोग्य जमीन एका कुटुंबासाठी आवश्यक आणि पुरेशी मानली गेली आहे.
- मूळच्या वसाहतीत मासेमारीचा हक्क असलेल्या आदिवासी कुटुंबांना नव्या जलाशयात किंवा इतर कोणत्याही पर्यायी ठिकाणी मासेमारीचे हक्क दिले जावेत.
- मूळच्या वसाहतीमध्ये मिळणारे आरक्षणापासूनचे फायदे पुनर्वसनाच्या ठिकाणीही मिळत राहावेत.
- पूर्वापार चालत आलेल्या व कोणतेही नुकसान न करता मिळणाऱ्या जंगल उत्पन्नावरील हक्कांच्या मोबदल्यात, साधारण दीड वर्षाच्या किमान शेतमजुरीएवढे अतिरिक्त आर्थिक सहाय्य भरपाई म्हणून दिले जावे.
- विस्थापित आदिवासींचे पुनर्वसन त्यांच्या गटांनुसार एकत्रितपणे, तसेच त्यांच्या नैसर्गिक वसतिस्थानाच्या जवळ केले जावे.
- यामुळे त्यांना त्यांची वांशिक, भाषिक आणि सामाजिक-सांस्कृतिक ओळख तसेच त्यांची नाती-गोती, आणि देवाण-घेवाणीचे परस्पर संबंध टिकवून धरता येतील.
- सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी मोफत जमीन उपलब्ध करून द्यावी.
- पुनर्वसन जर तालुक्यापासून लांबच्या ठिकाणीच करावे लागले असेल, तर नगद आर्थिक सहाय्यही त्याप्रमाणात वाढवले जावे.
- आदिवासी समूहांचे पुनर्वसन झाल्यानंतर त्या-त्या ठिकाणी सर्व मुलभूत सुविधांची सोय केली जावी.

जंगलातील गावे :

सुमारे ५०० जंगलातील आदिवासी गावांमध्ये जगण्यासाठीच्या कोणत्याही मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. केव्हाही हकालपट्टी होण्याची भीती या गावांना सातत्याने भेडसावते. ही परिस्थिती गंभीरपणे दखल घेण्याजोगी आहे. बळजबरीने कोणतेही विस्थापन करणे टाळावे असे राष्ट्रीय धोरणाद्वारे सुचवलेले आहे. जंगल गावांचे महसुली गावांमध्ये रुपांतर व्हावे किंवा महसुली गावांच्या बरोबरीने त्यांचा विकास व्हावा.

राष्ट्रीय धोरणात यासाठी खालील बाबी बंधनकारक करण्यात आलेल्या आहेत :

- शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधा, वीज आणि दळण-वळणाची साधने, रस्ते यासारख्या मुलभूत सुविधा जंगलांमध्ये राहणाऱ्या आदिवासींना पुरवल्या जाव्यात.
- अन्न-धान्य विषयक समस्या सोडवण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि धान्य-बँकेची स्थापन व्हावी.

- आदिवासींना सुधारित शेती आणि पशु-संगोपन तंत्रांचा परिचय करून द्यावा, जेणेकरून त्यांचे उत्पादन, उत्पन्न आणि आर्थिक परिस्थिती यांचा स्तर उंचावू शकेल.
- स्वयंरोजगाराचे व्यवहार्य प्रकल्प राबवणाऱ्या उद्योजकांसाठी बँक तसेच इतर वित्तीय संस्थामार्फत अर्थ-साह्य मिळण्याची सोय व्हावी.
- आदिवासींना संयुक्त-जंगल व्यवस्थापनात सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध केल्या जाव्यात. जंगल-विषयक मुख्य उपक्रमांसाठी सहकारी-संस्था किंवा समित्या तयार करायला त्यांना प्रोत्साहन दिले जावे.
- जंगलांमध्ये तसेच जंगलाभोवतालच्या परिसरात एकात्मिक क्षेत्रीय विकासाचे कार्यक्रम सुरू केले जावेत.
- जंगल उत्पादने गोळा करून त्यांचे जतन व पुनर्निर्मिती करण्याच्या आदिवासींच्या हक्कांना मान्यता मिळावी. अशी उत्पादने बाजारात आणण्यासाठी संस्थात्मक रचनांची सोय केली जावी.
- शेतमालासाठी किमान भाव या तत्त्वानुसार बिगर शेतमालासाठीही किमान भावांची व्यवस्था अस्तित्वात यावी. यातून सहकारी संस्थांमध्ये अडत्यांकडून होणारे शोषण थांबवण्याचा प्रयत्न करता येईल.

फिरती शेती :

फिरती शेती करणाऱ्या आदिवासींची जमिनीमध्ये 'विशेष लक्ष देण्याजोगी, काळजी घेण्याजोगी संपत्ती किंवा मालमत्ता' अशा प्रकारची भावनिक गुंतवणूक असल्याचे दिसत नाही, जशी ती बिगर आदिवासी गावांमध्ये दिसून येते.

फिरत्या शेतीच्या समस्या हाताळण्यासाठी राष्ट्रीय धोरणात खालील मुद्यांवर भर दिला जाईल. :

- भू-धारणा-व्यवस्थेच्या पुनर्मांडणीतून आदिवासींना जमिनीवरील मालकी हक्क दिले जातील. त्यामुळे त्यांना त्यांच्या शक्ती व साधनसंपत्तीचा विनियोग जमिनीची धूप रोखण्यासाठी व तिचा कस वाढवण्यासाठी करता येऊ शकेल.
- कृषी-शास्त्रज्ञांनी फिरत्या शेतीच्या अभ्यासातून, उत्पादन वाढीसाठी समुचित तंत्रज्ञानाची निर्मिती करावी.
- फिरती शेती करणाऱ्या आदिवासींना सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि धान्य बँक यांच्यामार्फत पुरेशा अन्न-पुरवठ्याची हमी दिली जाईल. नगदी पिके आणि फळबागा लागवडीसाठीही आदिवासींना प्रोत्साहन दिले जाईल.
- आदिवासींना फिरती शेती सोडून देता यावी म्हणून प्रशिक्षण आणि विस्तार कार्यक्रम आयोजित केले जातील आणि त्यातून आर्थिक पर्यायांबाबत आदिवासींमध्ये जागरूकता निर्माण केली जाईल.

जमिनीशी फारकत :

जमीन ही आदिवासींची सगळ्यात महत्त्वाची, मोलाची साधन-संपत्ती. तीच बिगर आदिवासींच्या हाती पडून त्यांचे नेहमीच शोषण होत असते. जल-विद्युत केंद्राची निर्मिती, खाणी, कारखाने अशा राज्य-शासनांनी सुरू केलेल्या विकासाच्या

कामांमुळेही आदिवासीं त्यांच्या जमिनींना मुकतात. जमीन हक्कांपासून आदिवासींना वंचित बनवणाऱ्या या विकासाच्या प्रकल्पांचा कुठलाही प्रत्यक्ष लाभ आदिवासींना होत नाही.

आदिवासींची जमीन-फारकतीच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय धोरणात खालील बाबींचा आग्रह धरलेला आहे :

- आदिवासींना गावातील जमिनींची कागदपत्रे बघता यावीत.
- जमिनीबाबतचे उतारे पंचायतींच्या कार्यालयात बघण्यासाठी लावलेले असावेत.
- आदिवासींच्या जमीन-विषयक तक्रारींचे निवारण करताना कागदपत्र उपलब्ध नसल्यास तोंडी पुरावा ग्राह्य मानला जावा.
- आदिवासींकडून बिगर-आदिवासींकडे होणाऱ्या जमिनींच्या हस्तांतरणावर राज्यशासनांनी बंदी आणावी.
- आदिवासी व त्यांच्या प्रतिनिधींना भू-सर्वेक्षणाच्या कामांमध्ये सहभागी करून घेतले जावे.
- वर्षानुवर्षे कसलेल्या जमिनींचे पट्टे आदिवासींकडे सोपवण्यात यावेत.
- कोणतेही विकास प्रकल्प सुरू करताना आदिवासींच्या जमिनी सुरक्षित राहतील याची राज्यसरकारांनी पुरेशी खबरदारी घ्यावी. हे जेव्हा शक्य नसेल तेव्हा प्रकल्प सुरू होण्याआधी आदिवासींना जमिनी देण्यात याव्यात.

बौद्धिक संपत्तीवरील अधिकार :

वांशिक परंपरेतून आलेले ज्ञान व शहाणपण यासाठी अनुसूचित जमाती आपल्याला माहीत असतात. पण त्यांच्या बौद्धिक संपदेच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी मात्र कोणतीही कायदेशीर किंवा संस्थात्मक चौकट उपलब्ध नाही. म्हणूनच, आदिवासींच्या बौद्धिक संपदेवरील अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या साधनसंपत्तीचा वापर व तिचे शोषण करण्याच्या औद्योगिक व इतर संस्थांच्या अधिकारांवर मर्यादा आणण्यासाठी कायदेशीर व संस्थात्मक तरतूदी करणे, हे राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट आहे.

आदिवासी भाषा :

आदिवासींच्या बोली-भाषा अप्रमाणित म्हणून गणल्या जातात. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत अनेक आदिवासी भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आदिवासी भाषांचे जतन करून त्यांचे दस्तऐवज तयार करणे हे राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्राथमिक पातळीवर मातृभाषेतील शिक्षणाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच आदिवासी भाषांमधील पाठ्यपुस्तके आणि प्रकाशने यांच्या निर्मितीला चालना दिली जाईल.

आदिम आदिवासी जमाती : (Primitive Scheduled Tribes)

घटती लोकसंख्या, साक्षरतेचे अत्यल्प प्रमाण, प्रामुख्याने 'शिकार करणे-अन्न गोळा करणे' या शेती-पूर्व काळातील तंत्रज्ञान आणि आत्यंतिक मागासलेपणा यामुळे ओळखल्या जाणाऱ्या अनुसूचित जमाती म्हणजेच पुरातन/आदिम आदिवासी गट. या गटांची एकूण लोकसंख्या २५ लाख इतकी आहे. ही लोकसंख्या आदिवासी लोकसंख्येच्या ३.६% इतकी तर देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ०.३%

इतकी आहे.

आदिम आदिवासी गटांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राष्ट्रीय धोरणात खालील उपायांचा विचार केलेला आहे :

- आदिम आदिवासी गटांची सामाजिक प्रतिमा उंचावण्यासाठी त्यांच्यावरचा 'पुरातन/आदिम' हा शिक्का पुसला जावा.
- त्यांना इतर अनुसूचित जमातीच्या बरोबरीला आणण्यासाठी निश्चित कालावधीमध्ये प्रयत्न केले जावेत. विकासाचे हे प्रयत्न प्रदेश-निहाय आणि स्थानिक परिस्थितीनुरुप असावेत.
- प्रतिबंध आणि उपचार या दोन्हींसाठी परिणामकारक आरोग्य सेवांची सोय केली जावी.
- आदिम गटांच्या परंपरागत प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक पद्धतींची चिकित्सा करून त्या प्रमाणित केल्या जाव्यात.
- आदिम गटांमधील निरक्षरतेवर मात करण्यासाठी कौशल्य-विकासाच्या जोडीने गरजांवर आधारित आणि प्रदेश-निहाय अशा शिक्षणाला प्राधान्य दिले जावे.
- 'सर्व शिक्षा अभियान'च्या मदतीने औपचारिक शिक्षणाची परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले जावेत. प्रशिक्षित आदिवासी युवकांची शिक्षक म्हणून नेमणूक केली जावी.
- आदिवासींच्या मातृ/बोलीभाषेतून शिक्षण दिले जावे.
- आदिम गटांच्या गरिबीचा विचार करून, शाळकरी मुलांना विशेष सवलती दिल्या जाव्यात.
- औद्योगिक शिक्षण आणि प्रशिक्षणावर भर दिला जावा.
- आदिम गटांना 'जमिनीवरील हक्क' उपभोगता यावा. जमिनीपासून कोणत्याही स्वरूपातील फारकतीला आळा घातला जावा आणि जमीन-वाटपात भूमीहीन आदिम गटांना प्राधान्य दिले जावे.
- अन्न-धान्याच्या नियमित पुरवठ्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू केली जावी आणि संकट-काळातील अन्न-पुरवठ्यासाठी धान्य-बँकांची स्थापना व्हावी.
- आदिम गटांच्या आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी म्हणून तसेच त्यांच्या जंगलाशी असणाऱ्या भावनिक नात्याची जोपासना करण्यासाठी, जंगल व्यवस्थापनांमध्ये त्यांचा सहभाग असेल याची खात्री केली जावी.

अनुसूचित जमाती आणि अनुसूचित भाग :

अनुसूचित आणि आदिवासी भाग निश्चित करण्यासाठी स्वीकारलेली संकल्पना आणि त्याची पद्धती याबाबत राज्यघटनेला पुरेशी स्पष्टता असली तरी तिची अंमलबजावणी करण्यांमध्ये मात्र त्याबाबत काहीसा गोंधळ आहे.

यासाठी राष्ट्रीय धोरणाने खालील उपाय सुचवलेले आहेत :

- आदिवासी भागांमध्ये सुव्यवस्था, शांतता आणि सुसंवाद राखण्यासाठी राज्यशासनांच्या नियंत्रणात्मक अधिकारांमध्ये वाढ केली जाईल. आदिवासी सल्लागार-समित्यांच्या बैठका नियमितपणे व्हाव्यात, या बैठकांमधून विकासाच्या कामांना चालना मिळावी आणि

जमिनीच्या हस्तांतरणाला आळा बसावा, यासाठी पाऊले उचलली जातील. कर्ज-विषयक कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारे सावकारीच्या दहशतीला आळा घातला जाईल.

- अनुसूचित प्रदेश असलेल्या राज्यांमध्ये त्याचप्रमाणे अनुसूचित प्रदेश जाहीर न झालेल्या परंतु बहुसंख्य आदिवासी असणाऱ्या राज्यांमध्येही 'आदिवासी सल्लागार मंडळांची' स्थापना केली जाईल.
- ईशान्येकडील राज्यांमधील जिल्हास्तरीय किंवा विभागीय मंडळांच्या स्वायत्ततेत वाढ केली जाईल. या मंडळांमध्ये निवडून आलेले सदस्य असतात आणि या मंडळांना कायदेविषयक कार्यवाहीचे त्याचप्रमाणे न्यायविषयक प्रशासनाचे अधिकार असतात.

प्रशासन :

कामाची गुणवत्ता आणि विकासाचे निकष या दोन्हींच्या संदर्भात सध्याच्या राज्यातील आणि जिल्ह्यातील प्रशासन यंत्रणेची कामगिरी समाधानकारक नाही.

प्रशासन-यंत्रणेला नवसंजीवनी देण्यासाठी राष्ट्रीय धोरणात खालील बाबी सुचवलेल्या आहेत :

- आदिवासी प्रशासनाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी कौशल्य-विकासाचे तसेच जाणीव जागृतीचे कार्यक्रम आखले जावेत.
- अधिकाऱ्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणांहून काम करता यावे यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले जावे.
- पुरेसे ज्ञान, अनुभव आणि आदिवासी प्रश्नांची सुयोग्य जाण असणाऱ्या अधिकाऱ्यांचीच आदिवासी प्रशासनासाठी नेमणूक केली जावी.
- आदिवासींची परिस्थिती सुधारावी म्हणून आखलेल्या योजना प्रत्यक्षात येण्यामध्ये बराच वेळ जातो. त्यासाठी योजनांच्या अंमलबजावणीला लागणाऱ्या वेळानुसार अधिकाऱ्यांसाठीही निश्चित कालावधी ठरवून दिला जावा.

संशोधन :

आदिवासींचे वांशिक तपशील, त्यांच्या प्रश्नांची व्याप्ती आणि संभाव्य प्रश्न, विकास-प्रक्रियेतील अडथळे, योजना आणि प्रकल्पांचे पर्यवेक्षण आणि मूल्यमापन यांसारख्या विषयांवरील संशोधनांकडे अग्रक्रमाने लक्ष देण्याची गरज आहे. अर्थपूर्ण संशोधन आणि मूल्यमापन-अभ्यास पूर्ण करण्यासाठी आणि आदिवासींचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवण्यासाठी, वेगवेगळ्या राज्यांमधील आदिवासी-संशोधन-संस्थांना अधिक सबल केले जावे, असा प्रस्ताव राष्ट्रीय धोरणाने मांडलेला आहे. राष्ट्रीय पातळीवर एका संशोधन-केंद्राची स्थापना व्हावी, हाही प्रस्ताव राष्ट्रीय धोरणातून सुचवलेला आहे.

सहभागी दृष्टिकोन :

विकासाच्या सहभागी दृष्टिकोनाचे महत्त्व राष्ट्रीय धोरणाने ओळखलेले आहे. शासनाच्या कार्यक्रम आणि धोरणांचे लाभ तळागाळापर्यंत पोचवण्यात बिगर-शासकीय संस्था आणि स्वयंसेवी संघटनांची भूमिका प्रवर्तकाची असते आणि त्यामुळेच इच्छित ध्येयाची अधिकाधिक पूर्तता होते. म्हणून राष्ट्रीय धोरणाद्वारे आदिवासी-विकासाचे काम करणाऱ्या बिगर-शासकीय संस्थांची यादी करण्याचा व त्यांना

प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जाईल. निवासी व अनिवासी शाळा, वसतिगृहे, दवाखाने, रुग्णालये सुरू करणे, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे चालवणे आणि क्षमता विकासाच्या व जनजागृतीच्या कार्यक्रमांना चालना देणे, अशा कामांमध्ये त्यांना महत्त्वपूर्ण भूमिका बजावता येईल.

सामिलीकरण :

आदिवासींना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रीय धोरणाची जी महत्त्वपूर्ण भूमिका आहे, त्या भूमिकेत म्हणजेच

राष्ट्रीय धोरणात खालील बाबी सुचवलेल्या आहेत :

- मागास /अविकसित जमाती म्हणून आदिवासींना ओळखण्याची पद्धत बंद करण्याला प्राधान्य दिले जावे.
- लोक-कला, लोकसाहित्य, पारंपरिक हस्तकला या सगळ्यात प्रतिबिंबित होणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी-संस्कृतीचे जतन केले जावे. आदिवासींच्या मौखिक परंपरांचे दस्तऐवज तयार केले जावेत आणि कलेला चालना दिली जावी.
- आदिवासींना विभिन्न संस्कृतींमध्ये मिसळण्याच्या संधी दिल्या जाव्यात.
- रस्ते, दळण-वळण यांचा विकास आणि प्रवासाच्या सोयी-सवलती यांच्या मदतीने आदिवासींचे भौगोलिक तुटलेपण/दुरावलेपण कमी केले जावे.

■ ■ ■

आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरणाचा मसुदा : प्रश्न आणि पर्याय
(पुणे येथील चर्चासत्रासाठी आधारभूत टिपण)

स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारत सरकारने अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय धोरण ठरविण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. अनुसूचित जमातींच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीला धक्का न लावता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बहुआयामी दृष्टिकोन स्वीकारून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे, असे राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यात (Draft) नमूद केले आहे.

या मसुद्यानुसार बहुसंख्य अनुसूचित जमाती दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात, त्यांच्यात साक्षरतेचा दर अतिशय कमी आहे, या जमाती कुपोषण आणि रोगराईने ग्रस्त आहेत आणि विस्थापनाला त्या बळी पडतात याची दखल राष्ट्रीय धोरणाने घेतलेली आहे. आणि यातील प्रत्येक प्रश्न नेमकेपणाने हाताळणे असे राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट म्हणून नमूद केले आहे.

प्रत्यक्षात राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याचा अभ्यास केल्यानंतर त्यामध्ये अनेक गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आले. या मसुद्यावरील आक्षेपांची चर्चा पुढे थोडक्यात केली आहे.

१) मसुद्यात दखल घेतल्याप्रमाणे भारतातील बहुसंख्य अनुसूचित जमाती दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, रोगराई, विस्थापन अशा गंभीर समस्यांनी त्रस्त आहेत. या मसुद्यानुसार ही प्रत्येक समस्या ठोस पद्धतीने हाताळण्याचा सरकारचा उद्देश आहे. परंतु या संपूर्ण मसुद्यात या समस्यांचे विश्लेषण करण्यात आलेले नाही. या समस्यांमागील नेमकी कारणे कोणती आहेत याचा ऊहापोह केलेला नाही. तसेच कोणती उपाययोजना केली म्हणजे कोणता प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे हे कुठेही स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे या साऱ्या समस्यांच्या संदर्भात राष्ट्रीय धोरणाचा मसुदा तयार केला आहे असे जरी म्हटले असले तरी प्रत्यक्षात या समस्यांमागील विविध कारणे आणि त्यावरील ठोस उपाय यावरील चर्चेचा या मसुद्यात अभाव जाणवतो.

आदिवासींना भेडसावणाऱ्या दारिद्र्य, कुपोषण इ. गंभीर समस्यांबाबत काही महत्त्वाच्या प्रश्नांना हात घालणे आवश्यक आहे. अ) या समस्यांचा आणि सध्या राबविले जाणारे विकास–प्रतिमान (Model) यांचा काय संबंध आहे? ब) विकासाचे सध्याचे अग्रक्रम आणि उद्दिष्टे कायम ठेऊन वरील समस्यांचे निराकरण करणे (आणि अनुसूचित जमातींचा सर्वांगीण विकास घडविणे) शक्य आहे का? थोडक्यात, सध्या देशाचा विकास घडवण्यासाठी म्हणून जी धोरणे राबवली जातात त्यामुळेच अनुसूचित जमातीबाबत विविध गंभीर समस्या निर्माण होत असतील तर विकासाची सध्याची धोरणे एका बाजूने कायम ठेवून (आणि उजाखा प्रक्रियेद्वारे ही धोरणे अधिक जोमाने राबवून) दुसऱ्या बाजूने अनुसूचित जमातींचा सर्वांगीण

विकास आराखडा बनवणे शक्य आहे का? त्याकरता सध्याच्या विकासाच्या धोरणात मूलगामी परिवर्तन करणे गरजेचे नाही काय? या प्रश्नांबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे.

२) मसुद्यात नमूद केल्यानुसार, ''बहुआयामी दृष्टिकोन ठेवून अनुसूचित जमातींचा सर्वांगीण विकास घडवणे, याद्वारे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि हा विकास घडवतानाच त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीला जपणे'' असे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट फारच व्यापक आणि अस्पष्ट आहे. अनुसूचित जमातींचा सर्वांगीण विकास घडवणे म्हणजे नेमके काय हे मसुद्यात कोठेही स्पष्ट करण्यात आलेले नाही. सदर मसुद्यात विकासाची व्याख्या स्पष्टपणे नमूद केलेली नाही. तसेच अनुसूचित जमातींच्या 'सर्वांगीण विकासासाठी' म्हणून मांडलेल्या या धोरणात या विकास प्रयत्नांचे नेमके उद्दिष्ट काय आहे हेही स्पष्टपणे मांडलेले नाही. (उदा. अनुसूचित जमातींसाठी किमान मानवी पातळीवरील जीवनाची हमी, समृद्ध जीवन इ.) अशा तऱ्हेने राष्ट्रीय धोरणाच्या सदर मसुद्यात अनुसूचित जमातींच्या विकासाचा समग्र विचार आणि त्या विचारावर आधारित व्यूहनीती यांचा अभाव आहे.

३) राष्ट्रीय धोरणाच्या या मसुद्यात अनुसूचित जमातींच्या विकासासाठी जी मार्गदर्शक तत्त्वे सुचवली आहेत ती वेगवेगळ्या विभागात विभागलेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जमातींना विविध सेवा पुरविणे (उदा. औपचारिक शिक्षण, आरोग्य, मूलभूत सुविधा); त्यांचे पारंपरिक शहाणपण जपणे; त्यांचे विस्थापन व पुनर्वसन, जंगलातील गावांचा विकास, जमीन फारकत, फिरती शेती, बौद्धिक संपत्तीवरील अधिकार, आदिम आदिवासी जमातींचा विकास, आदिवासी भाषा, आदिवासींचे मुख्य प्रवाहात सामिलीकरण इत्यादींबाबत धोरणविषयक दिशादर्शक सूत्रे किंवा धोरणसूत्रे (Policy Guidelines) या मसुद्यात नमूद केलेली आहेत. ही सर्व धोरणसूत्रे अनुसूचित जमातींच्या जीवनाशी संबंधित वेगवेगळ्या अंगांबाबत आहेत. या धोरणसूत्रांमधील एक महत्त्वाची त्रुटी म्हणजे ही सर्व अंगे एकमेकांपासून जणू स्वतंत्र असल्याप्रमाणे चर्चिली गेली आहेत. या सर्व अंगांबाबत धोरणात्मक विवेचनात समग्र दृष्टिकोनाचा (Integrated approach) अभाव जाणवतो. या सर्व मुद्यांचा एकमेकांशी काय संबंध आहे आणि सर्वांगीण विकासाच्या व्यापक उद्दिष्टांशी त्यांचा कसा संबंध आहे हे स्पष्ट होत नाही. तसेच मसुद्यात सुरुवातीला नमूद केलेल्या दारिद्र्य, कुपोषण इ. समस्या सुटायला यामुळे कशी मदत होईल, हे देखील स्पष्टपणे मांडलेले नाही. या सर्व मुद्यांना एका सूत्राभोवती गुंफेल अशी विशिष्ट उद्दिष्ट असणारी विकासाची संकल्पना यामागे नाही. उदा. औपचारिक शिक्षण, आरोग्य, मूलभूत सुविधा इ. सेवा

अनुसूचित जमातींना पुरवण्यावर या मसुद्यात भर आढळतो. परंतु औपचारिक शिक्षण घेऊन अनुसूचित जमातीचे दारिद्र्य कसे दूर होईल, औपचारिक शिक्षणामुळे विकासाच्या कोणत्या संधी त्यांना मिळतील, याचा ऊहापोह कोठेही करण्यात आलेला नाही.

४) या मसुद्यात अनुसूचित जमातींची सध्याची उपजीविकेची परिस्थिती काय आहे या मुद्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे. भारतातील अनुसूचित जमातींची जगण्याची पद्धत काय, त्यांच्या पुढील गंभीर समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या उपजीविकेच्या उपक्रमात काय सुधारणा करता येतील याचा विचार मसुद्यात केलेला नाही. मसुद्यामध्ये अनुसूचित जमातींच्या विकासासाठी जी धोरणसूत्रे नमूद केली आहेत, त्यामध्ये महत्त्वाच्या अशा आर्थिक अंगावर कोणतेही भाष्य केलेले नाही. अनुसूचित जमातीच्या लोकांचा कोणत्या आर्थिक उपक्रमात सहभाग असेल, या अनुसूचित जमातींच्या सध्याच्या आर्थिक/उत्पादक उपक्रमांचे स्थान काय राहणार आहे, त्यात काही सुधारणा करता येतील की नवीनच आर्थिक उपक्रम अनुसूचित जमाती हाती घेतील याविषयी स्पष्ट मांडणी केली गेलेली नाही.

बहुसंख्य अनुसूचित जमातींच्या उपजीविकांची सध्याची स्थिती अमानुष पातळीवरील हलाखीची आहे असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीमध्ये अनुसूचित जमातींच्या उपजीविकेची पूर्ती व सुरक्षितता हा ह्या नव्या धोरणाचा केंद्रीय मुद्दा व सर्व प्राधान्याचे उद्दिष्ट असायला हवे व त्याभोवती आदिवासींच्या जीवनाच्या इतर अंगाविषयीच्या धोरणसूत्राची गुंफण करायला हवी. तसे झाल्यास त्या धोरणाला खरीखुरी परिणामकारकता आणि उपयुक्तता लाभेल.

५) मसुद्यात दिलेल्या धोरणसूत्रांमध्ये आर्थिक अंगाबरोबरच राजकीय अंगाचाही समावेश नाही. अनुसूचित जमातींच्या सर्वांगीण विकासात राजकीय संघटन, राजकीय सहभाग आणि एकूणच राजकीय सबलीकरणाचे स्थान काय असेल यावर काहीही भाष्य केलेले नाही.

६) या मसुद्यात केला गेलेला संपूर्ण प्रयत्न येथील प्रस्थापित विकास प्रतिमानाच्या मूल्यांनी प्रभावित झाल्याचे दिसते. अनुसूचित जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट या मसुद्यात ठेवण्यात आले आहे हे याचे द्योतक आहे. अनुसूचित जमाती समाजाच्या प्रस्थापित आर्थिक व्यवस्थेत सामावून घेतल्या जातील असे गृहीतक या उद्दिष्टांमागे आढळते. या गृहीतकाला तपासून बघण्याची आवश्यकता आहे. याबाबत काही प्रश्नांचा विचार करणे गरजेचे आहे.

अ) अनुसूचित जमातींना प्रस्थापित आर्थिक व्यवस्थेत जाण्याची इच्छा आहे काय?

ब) जास्तीत जास्त नफा आणि स्पर्धा यावर आधारित प्रस्थापित अर्थरचनेला समाजाच्या शेवटच्या पातळीवर असलेल्या

अनुसूचित जमातींना सामावून घेण्याची निकड वाटते का?

क) अनुसूचित जमातींच्या वाढीव लोकसंख्येला सामावून घेऊ शकेल आणि विकासाचे फायदे मिळवून देऊ शकेल इतकी प्रस्थापित आर्थिक रचनेची क्षमता आहे का?

ड) पर्यावरणाच्या मर्यादा लक्षात घेता अनुसूचित जमातींना संसाधनांच्या वापरावर अवलंबून असणाऱ्या प्रस्थापित अर्थरचनेत सामावून घेणे खरोखर शक्य आहे का?

७) मसुद्यात म्हटल्याप्रमाणे अनुसूचित जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याबरोबरच त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जपणे असे उद्दिष्ट आहे. परंतु अनुसूचित जमातींनी समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून जाणे आणि त्यांची वेगळी संस्कृती टिकणे या दोन गोष्टींमध्ये अनेक गंभीर विरोधाभास आहेत. ही दोन्ही उद्दिष्टे एकाचवेळी कशी साध्य करणार याबाबत मसुद्यात काही स्पष्टीकरण आढळत नाही.

८) मसुद्यामध्ये जमीन आणि नैसर्गिक संसाधनांवरील अनुसूचित जमातींच्या हक्काचे महत्त्व मान्य केले असले तरी व्यापक हितासाठी अनुसूचित जमातींचे विस्थापन होणे अपरिहार्य असल्याचे स्वीकारलेले दिसते. यामध्ये व्यापक हितासाठी म्हणजे नेमके काय याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. ह्या संदिग्धतेचा फार मोठा फटका अनुसूचित जमातींना बसेल हे उघड आहे. एका अर्थाने ह्या धोरणाद्वारे अनुसूचित जमातींच्या विस्थापनाला मान्यता दिल्यासारखे होईल.

९) सदर मसुद्यात दारिद्र्याचे फारच प्राथमिक, मर्यादित आणि कालबाह्य आकलन गृहीत धरण्यात आले आहे. दारिद्र्याचे विविध आयाम (जसे की, सत्ताहीनता, वंचितता, अभावग्रस्तता, निराधारता) यामध्ये विचारात घेतलेले नाहीत. त्यामुळे या सर्वांवर उपाय शोधण्याचाही प्रयत्न मसुद्यात झालेला नाही. दारिद्र्य दूर करणे म्हणजे प्रस्थापित आर्थिक व्यवस्थेत अनुसूचित जमातींना सामावून घेणे असा आणि एवढाच विचार यामध्ये दिसतो. यात अनुसूचित जमातींच्या उपजीविका पद्धतीबद्दलचे अज्ञान आणि सध्याच्या विकास प्रतिमानावरील अवाजवी विश्वास याचे दर्शन घडते. अनुसूचित जमातींच्या दारिद्र्यामागील सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, राजकीय इत्यादी बिगर आर्थिक घटकांची दखलही या मसुद्यात घेण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यावर उपाय सुचवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

१०) या मसुद्यात संदर्भ विशिष्टतेच्या (Context-specificity) मुद्याकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. फक्त एकाच ठिकाणी आदिम जमातींच्या विकासासंदर्भात 'प्रदेश–निहाय आणि स्थानिक परिस्थितीनुरूप विकास प्रयत्न असावेत', असा उल्लेख आहे. अन्यथा संपूर्ण मसुद्यामध्ये भारतातील अनुसूचित जमातींमध्ये असणाऱ्या

वैविध्याकडे दुर्लक्ष करून सर्वांसाठी समान धोरणसूत्रे आखलेली आहेत. भारतातील विविध अनुसूचित जमातींची भौतिक परिस्थिती आणि सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ कमालीचे भिन्न आहेत. या साऱ्या स्थानिक परिस्थितीबरोबर अनुसूचित जमातीचा जैविक नातेसंबंध असतो. त्यामुळे अनुसूचित जमातींच्या प्राकृतिक, सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक आणि इतर संदर्भात असणाऱ्या संदर्भ-विशिष्टतेकडे दुर्लक्ष करून त्यांच्या विकासाचा विचार करणे अयोग्य ठरेल.

११) Panchayats Extension to Scheduled Areas (PESA) सारख्या महत्त्वाच्या कायद्याचे जे चांगले परिणाम होऊ शकतात, त्यावर या मसुद्यात काहीही भाष्य नाही. PESA मधील अनेक तरतूदी भारतातील अनुसूचित जमातींच्या दृष्टीने मूलगामी महत्त्वाच्या ठरु शकतात.

राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यावरील सूचना :

१) सदर धोरणात्मक मसुदा विस्कळित असून त्याची रचना संपूर्णपणे बदलण्याची गरज आहे. केवळ वरवर काही बदल करून उपयोग होणार नाही. अनुसूचित जमातींसाठीच्या धोरणाची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट करून नव्या धोरणाची त्यानुसार गुंफण करणे अनिवार्य आहे.

२) धोरणात्मक मसुद्यामध्ये अनुसूचित जमातींच्या विकासाचे मुख्य उद्दिष्ट काय हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. केवळ सर्वांगीण विकास इतके व्यापक उद्दिष्ट असणे पुरेसे नाही. तर 'भारतातील अनुसूचित जमातींना सुरक्षित, शाश्वत आणि समृद्ध अशी जीविका आणि उपजीविका मिळण्यासाठीचे धोरण' अशा तऱ्हेचे स्पष्ट उद्दिष्ट हवे.

३) या धोरणावर आधारित अनुसूचित जमातींसाठीची विकासाची व्यूहनीती (strategy) स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. या व्यूहनीतीद्वारे नमूद केलेले उद्दिष्ट कसे साध्य होईल याविषयी स्पष्टता असणे गरजेचे आहे.

४) सदर मसुद्यात वेगवेगळे मुद्दे स्वतंत्ररित्या हाताळले गेले आहेत. तसे न करता मुख्य उद्दिष्ट गाठण्यासाठी या वेगवेगळ्या मुद्यांवर कसे काम करता येईल यावर विचार होण्याची गरज आहे. तसेच या सर्व मुद्यांची मुख्य उद्दिष्टाभोवती उतरंडीची रचना असावी जेणेकरून अधिक प्राधान्याचे मुद्दे ठरवणे सोपे जाईल.

५) धोरणात्मक मसुद्यामध्ये सरकारी पातळीवर कार्यक्रम-योजना तयार करण्यासाठी कोणती प्रक्रिया/पद्धत वापरावी याबाबत दिशादर्शक सूत्रे (guidelines) असावीत. योजना तयार करताना आणि राबवताना सहभागिता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या तत्त्वांचे पालन करण्याबाबतच्या स्पष्ट सूचना असाव्यात.

६) धोरणात्मक मसुद्यामध्ये ज्या परस्परविरोधी गोष्टींचा उल्लेख आहे त्याबाबत धोरणामध्ये सविस्तर विवेचन व स्पष्ट निर्देश असण्याची गरज आहे. उदा. संसाधनांवरील अनुसूचित जमातींचा अधिकार आणि त्यांचे विस्थापन याबाबत

परस्परविरोधी विधाने मसुद्यात केलेली आहेत.

७) या मसुद्यानुसार अनुसूचित जमातींच्या विकास प्रयत्नांमध्ये ज्या संस्था-व्यक्ती यांचा सहभाग राहणार आहे त्या सर्वांच्या कामाचे निश्चित स्वरुप व त्यांच्यावरील जबाबदाऱ्या याची स्पष्टता करणे गरजेचे आहे.

८) हा धोरणात्मक मसुदा आणि इतर क्षेत्रातील धोरणे (उदा. खाण क्षेत्रातील धोरणे, वीज क्षेत्रातील धोरणे) यांचा संबंध स्पष्ट होणे गरजेचे आहे. तसेच या मसुद्यात काही गोष्टींवर भर दिल्यामुळे इतर क्षेत्रातील धोरणांवर त्याचा काय परिणाम होईल हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

सरकारसाठी सूचना :

१) वरील सूचनांच्या आधारे धोरणात्मक मसुद्याची पुनर्रचना करून तो प्रसिद्ध करावा आणि त्यावर व्यापक, सखोल चर्चा करून मगच त्याला अंतिम रुप देण्यात यावे. या मसुद्याची पुनर्रचना करतानाही आरोग्य, शिक्षण, संसाधनांवरील अधिकार, विकासाची व्यूहनीती इ. वरील सूचना विचारात घेतल्या जाव्यात.

सहभागी कार्यकर्त्यांसमोर चर्चेसाठी प्रश्न :

१) धोरणवकिली संदर्भातील मुद्यांवर आपण सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न करता येतील का?

२) सरकारच्या या मसुद्याची पुनर्रचना करून आपण आपला स्वतःचा मसुदा तयार करावा का?

३) त्या पुनर्रचित मसुद्यातील धोरणाची मुख्य उद्दिष्टे, दुय्यम उद्दिष्टे, त्यासाठीच्या धोरणसूत्रे कोणती असावीत?

■ ■ ■

आदिवासींसाठी नवीन राष्ट्रीय धोरण: तज्ञांच्या प्रतिक्रिया

प्रस्तावना

भारत सरकारच्या आदिवासी मंत्रालयातर्फे प्रथमच आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या धोरणाचा एक मसुदा सरकारने प्रसिद्धीसाठी त्यांच्या वेबसाइटवर ठेवला असून त्यावर भारतातील आदिवासी भाग असणारी राज्य सरकारे, अभ्यासक आणि कार्यकर्ते यांच्याकडून सूचना आणि प्रतिक्रिया मागवण्यात आल्या आहेत.

आदिवासी धोरणाच्या आधारावरच आदिवासींच्या विकासासाठीचे केंद्र आणि राज्य स्तरावरील कार्यक्रम आणि योजना आकारास येणे अपेक्षित असल्याने या धोरणाचे महत्त्व आदिवासी जनतेच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे. या विषयावर व्यापक व सहभागी चर्चा व्हावी या उद्देशाने महाराष्ट्रात काम करणाऱ्या संस्था संघटनांचे कार्यकर्ते आणि अभ्यासक यांचे एक चर्चासत्र पुणे येथे दि. ८ व ९ मे २००४ रोजी आयोजित केले होते. हे चर्चासत्र महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे; शोषित जन आंदोलन (महाराष्ट्र); आणि प्रयास-संसाधने व उपजीविका गट, पुणे या तीन संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केले होते. या चर्चासत्रात तज्ञांनी मांडलेल्या प्रतिक्रियांचा सारांश देत आहोत

- सुरेखा दळवी (शोषित जनआंदोलन)

स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंनी आदिवासी विकासासाठी मांडलेली पंचशील सूत्रे, त्या आधारावर सरकारने अंगिकारलेले धोरण व त्यात कालांतराने होत गेलेले बदल, ह्याबाबत सर्व संघटना आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये वेळोवेळी चर्चा होणे आवश्यक होते. परंतु यातील धोरणविषयक बाबी व इतर मुद्दे यावर व्यापक पातळीवर पुरेशी सखोल चर्चा घडू शकली नाही. आता केंद्र सरकारने पुन्हा एकदा आदिवासी समाजाच्या विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर नवीन धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. या राष्ट्रीय धोरणामुळे आदिवासी समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे अनेक प्रश्न नव्याने उपस्थित होत आहेत. आदिवासी म्हणजे नक्की कोण? या शब्दाची व्याख्या काय? त्यांना मुख्य प्रवाहात सामील करणार म्हणजे सरकार नेमके काय करणार? असे मूलभूत प्रश्न ऐरणीवर आले आहेत. आणि सगळ्यात महत्त्वाचे असे की आदिवासींच्या धोरणाचा मसुदा सरकारने जरी वेबसाईटवर चर्चेसाठी उपलब्ध करून दिला असला आणि त्याबाबत सूचना मागवल्या असल्या तरी ज्या आदिवासी समाजाकरिता ही प्रक्रिया सुरु आहे, त्यांना हे धोरण आणि या धोरणाचे भलेबुरे परिणाम याबाबत सुतराम् कल्पना नाही. या पार्श्वभूमीवर आदिवासी भागात

काम करणारे कार्यकर्ते, अभ्यासक व राजकीय कार्यकर्ते या सगळ्यांनी मिळून या धोरणाच्या निमित्ताने उपस्थित होणाऱ्या मुद्द्यांवर एका ठोस भूमिकेपर्यंत यावे आणि सरकारने मांडलेल्या धोरणात करावयाचे बदल व मागण्या यांची महाराष्ट्राच्या पातळीवर एकत्रित मांडणी करावी.

- **प्रा. रा. के. मुटाटकर** (महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद)

गेली पंचवीस वर्षे महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ही संस्था, यहाकारा‌राय या नियतकालिकाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर वेळोवेळी चर्चा घडवून आणत आले आहे. परंतु राष्ट्रीय पातळीवरील धोरणावर अशा प्रकारचे चर्चासत्र घडवून आणण्यासाठी यप्रयासय या संस्थेने घेतलेल्या पुढाकाराची गरज होती.

सरकारने जाहीर केलेल्या नवीन आदिवासी धोरणाचा मसुदा आदिवासी मंत्रालयातील एक सनदी अधिकारी, श्री. रमेशचंद्र यांनी तयार केला आहे. त्यांच्याशी झालेल्या भेटीचा उल्लेख करून प्रा. मुटाटकर म्हणाले की, श्री. रमेशचंद्र यांना हा मसुदा तयार करण्याकरिता भारत सरकारने केवळ पंधरा दिवसांची मुदत दिली होती. केवळ पंधरा दिवसांच्या अपुऱ्या कालावधीत मसुदा तयार केल्यामुळे यात अनेक उणीवा असण्याची शक्यता त्यांनी स्वीकारली आहे. हा मसुदा अधिक परिपूर्ण व सर्वसमावेशक होऊ शकतो अशी भूमिका त्यांनी घेतली असून भारतभर मसुद्यावर चर्चा घडणे त्यांना महत्त्वाचे वाटते. अशा चर्चेच्या प्रक्रियेस हैद्राबाद विद्यापीठ व शिलाँगमध्ये मानवविज्ञानशास्त्र विभागातर्फे सुरूवात झाली आहे, अशी माहितीही श्री. मुटाटकरांनी दिली.

आदिवासी धोरणावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की मुख्य प्रवाह नेमके कशाला म्हणायचे ? आदिवासींना मुख्य प्रवाहात सामील करावयाची प्रक्रिया नेमकी काय असेल यावरूनच आदिवासींच्या विकासाची सरकारच्या प्रयत्नांची दिशा ठरणार आहे. त्यामुळे या प्रश्नावर व्यापक चर्चेच्या माध्यमातून स्पष्टता आणून हा मुद्दा धसास लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सरकार आदिवासींसाठी अमलात आणत असणाऱ्या योजना व इतर सवलती यांचा फायदा घेण्याकरिता बिगर आदिवासी लोक आदिवासी प्रमाणपत्रे मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशी प्रमाणपत्रे मोठ्या प्रमाणावर बिगर आदिवासींनी मिळवल्यामुळे सरकारी पातळीवरील योजनांचा उपयोग खऱ्या आदिवासींना होत नसल्याचे दिसते.

- **डॉ. गोविंद गारे** (आदिवासी विकास प्रतिष्ठान)

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये यापूर्वी आदिवासींसाठी शासनाचे अधिकृत धोरण अस्तित्वात नव्हते. १९५० सालापासून सन १९७५ पर्यंत सरकारने राबवलेल्या धोरणाचा आढावा घेतल्यास असे आढळते की पं. नेहरूंनी मांडलेल्या पंचशील सूत्रांवर आधारित धोरण, धोरणाच्या अनुषंगाने विकास विभागांची रचना

व योजनांची आखणी यावर सरकारने भर दिला. १९७५ सालापर्यंत यसामाजिक विकास विभागांच्याय (कम्युनिटी डेव्हलपमेंट ब्लॉक्स) माध्यमातून विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरु होती. १९७५ साली या धोरणात महत्त्वाचा बदल झाला. यामध्ये राज्याचे वार्षिक व पंचवार्षिक आर्थिक नियोजन व योजना यापासून आदिवासी विकासासाठीचा निधी वेगळा काढण्यात आला व तो त्याच कारणासाठी राखीव ठेवण्यात आला. या निधीचा योग्य वापर व्हावा याकरिता आदिवासी उपयोजना सुरु करण्यात आली व राज्यातील आदिवासी बहुल क्षेत्रांसाठी (अनुसूचित क्षेत्रे) हे नियोजन लागू झाले.

परंतु उपयोजना व सरकारचे नवीन धोरण यातील मांडणीची तुलना केल्यास असे आढळते की सरकारने मांडलेल्या नवीन राष्ट्रीय धोरणापेक्षा आदिवासी उपयोजनेमागील दृष्टिकोनात आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत अधिक व्यापक विचार केलेला आहे. याउलट नवीन राष्ट्रीय धोरणात बऱ्याच उणीवा आहेत. उदाहरणार्थ, आदिवासी विकासात आदिवासींना कायद्याचे संरक्षण अभिप्रेत आहे त्याचा उल्लेख धोरणात केलेला नाही. राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यात पारंपरिक ज्ञानाच्या संदर्भातील काही मुद्दे, संस्कृतीबाबतचा उल्लेख आणि बौद्धिक संपदेवर अधिकार देण्याबाबतच्या सूचना हे मुद्दे सोडल्यास काहीही नवीन मांडणी केलेली नाही. याउलट आदिवासी उपयोजनेमागील मांडणीमध्ये अनेक उपयुक्त कायदे आहेत, जसे की, करसवलती, जमीन हस्तांतरण विरोधी कायदे, शोषणमुक्तीसाठीचे कायदे इत्यादी. या सगळ्या मुद्दयांचा जसा उपयोजनेमधील मांडणीमध्ये परामर्ष घेतलेला आहे तसाच या धोरणामध्ये घेण्याची आवश्यकता आहे. त्याबरोबरच उपयोजनेतील काही उपयुक्त कायदे, योजना आणि तरतुदींची अंमलबजावणी कुठल्या कारणांमुळे होऊ शकली नाही याचाही धोरणामध्ये थोडक्यात आढावा घेण्याची गरज आहे. ही प्रक्रिया केल्यामुळेच धोरणाचा मसुदा परिपूर्ण होऊ शकेल.

- **श्री. ब्रायन लोबो (शोषित जन आंदोलन)**

श्री. ब्रायन लोबो यांनी नवीन सरकारी धोरणाची समीक्षा करताना त्यातील चांगल्या वाईट बाबींचा एक धावता आढावा मांडला. नवीन राष्ट्रीय धोरणातील स्वागतार्ह बाबींचा उल्लेख करताना ते म्हणाले की, पारंपरिक ज्ञान व संस्कृती याबाबत त्याचप्रमाणे पुनर्वसन व विस्थापनाबद्दल धोरणात ठाम मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारच्या धोरणामुळे आदिवासींचे विस्थापन होते व राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीचे उल्लंघन होते, असे धोरणविषयक मसुद्यात स्पष्ट नमूद केले आहे. धोरणातील या काही चांगल्या बाबी आहेत. परंतु धोरणात अनेक उणीवा आहेत. व्यापक पातळीवर विचार केल्यास असे आढळते की (१) इतर क्षेत्रातील धोरणे; (२) अनुसूचित जाती व जमातींच्या प्रश्नांवर नियुक्त केलेल्या समित्यांचे अहवाल; व (३) सध्या सुरु असलेल्या आर्थिक

सुधारणा या तीन महत्त्वाच्या बाबींचा आदिवासी विकासाशी असलेला संबंध याबाबत नवीन राष्ट्रीय धोरणात कुठेही स्पष्टीकरण नाही. नवीन धोरणामधील कमतरता मांडताना वने, शेती व शेतीचे व्यवस्थापन, शेती आणि वनशेती, उपजीविका व अन्नसुरक्षा, रोजगार व स्थलांतर, आरक्षण धोरण, आदिवासी स्वशासन कायदा, दारिद्र्यरेषा, स्त्रिया व स्त्रियांचे हक्क, आदिवासींचे आरोग्य, पाणी, कुपोषण इ. महत्त्वाच्या बाबींवर अतिशय कमी भर दिला आहे असे ते म्हणाले. त्याबरोबरच बौद्धिक संपदेवरील अधिकार, वनशेती व वनकायदा, अपुरी राहिलेली विस्थापनाची कामे, वनौषधी आणि ॲलोपॅथी उपचारपद्धती यांचे एकात्मिकरण (integration) इ. बाबी सरकारने अधिक स्पष्ट करायला हव्यात असेही ते म्हणाले. यानंतर धोरणामध्ये कुठले बदल करणे आवश्यक आहे याबद्दल त्यांनी काही सूचना केल्या. यापैकी काही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे.

(१) आदिवासींचे मुख्यप्रवाहात सामिलीकरण करावे ही सरकारने घेतलेली भूमिका अयोग्य आहे. समाजात असणाऱ्या विविध प्रवाहांमध्ये आदिवासी समाज व त्यांची संस्कृती याचा एक स्वतंत्र प्रवाह आहे. हा आदिवासींचा प्रवाह व समाजातील इतर प्रवाह परस्परांमध्ये देवाण-घेवाण करतील अशी भूमिका आपण घ्यावी. (२) धोरणातील शैक्षणिक बाबींमध्ये अनौपचारिक शिक्षणाचा कुठेही उल्लेख नाही. अनौपचारिक शिक्षणाचा समावेश शैक्षणिक धोरणामध्ये करावा व अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम हा उपजीविका मिळवण्यासाठी उपयुक्त असावा. (३) जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्याविषयी मसुद्यात ठोस मांडणी करणे गरजेचे आहे. केंद्र सरकारचा या विषयावर तज्ज्ञांचा गट असून, त्यांनी जमीन हस्तांतरणाबाबत अहवालही प्रसिध्द केला आहे. या प्रक्रियेत सामील करावे. (४) काही राज्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये (उदाहरणार्थ महाराष्ट्रातील रायगड जिल्हा) अनुसूचित जमातींची लोकसंख्या व भौगोलिक परिसर यानुसार क्षेत्राची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. (५) आदिवासींबाबतचे संशोधन, माहितीसंकलन, जनगणना किंवा दारिद्र्य रेषा ठरवण्यासाठी करावयाचे सर्वेक्षण अशा वेळी वाडीतून कामासाठी स्थलांतरित झालेल्या आदिवासींची सर्वेक्षणात नोंद होत नाही. अशा परिस्थितीत, ठराविक काळात जेव्हा लोक वाडीत/पाड्यात उपलब्ध असतात, तेव्हा सर्वेक्षण होईल अशी काळजी घ्यावी. (६) वनशेती व संयुक्त वन व्यवस्थापन हा कार्यक्रम एकाच वेळी राबवण्यात यावा. संयुक्त वन व्यवस्थापनाचे व वनसंवर्धनाचे कार्यक्रम राबवताना वनशेतीस चालना द्यावी व याबरोबरच आदिवासींच्या वन अतिक्रमित जमिनी त्यांच्या नावावर व्हाव्यात.

- **डॉ. मिलिंद बोकील** (महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद)

सर्वसाधारणपणे कुठल्याही समाजाच्या विकासाविषयी सरकारतर्फे जेव्हा प्रयत्न केले

जातात तेव्हा त्या प्रयत्नांचे तीन मार्ग असतात. ते म्हणजेः १) धोरण, २) कायदे (उदा. जमीन हस्तांतरण विरोधी कायदा), आणि ३) समाजाला उपकारक होतील अशा उपायोजना. सरकारी पातळीवर या तिन्हीपैकी कायदे व योजना आहेत, परंतु, आजपर्यंत आदिवासींच्या विकासाबद्दल व्यापक मांडणी करणाऱ्या धोरणाचा अभाव होता. या धोरणाच्या निमित्ताने हा अभाव दूर करण्याचा प्रयत्न सरकारने उशिरा का होईना केला आहे, याबाबत सरकारचे अभिनंदन करावयास हवे. अशीदेखील शक्यता आहे की, सरकार बदलले तर हे धोरणही पूर्णपणे बदलू शकते. असे घडल्यास कदाचित आपल्या प्रयत्नांना अर्थ उरणार नाही. परंतु, दुसऱ्या बाजूला गेली पंचवीस वर्षे महाराष्ट्रात जी प्रक्रिया आपण चालवित आहोत त्याची एका टप्प्यावर फेरमांडणी करणे हेही आवश्यक आहे. त्यामुळे या मसुद्यातील शब्दांकडे फारसे लक्ष न देता त्यातील आशय व व्यापक मांडणीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

आदिवासींच्या विकासाबाबतच्या स्थितीचा आढावा घेताना सूत्ररूपाने सांगायचे झाले तर या देशात आदिवासी समाजाला दुबळा करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे म्हणता येईल. इतिहासात डोकावल्यावर असे दिसते की हा समाज मुळात काही दुबळा नव्हता, असलाच तर तो इतर समाजाप्रमाणेच मागासलेला होता. हे दुबळेपण आदिवासी समाजाकडे प्रमुख तीन प्रक्रियांमुळे आले आहे असे दिसते :

(१) वर्षानुवर्षे समाजात अस्तित्वात असलेली सरंजामशाही, जमीनदारी, इनामदारी, खोती या व यासारख्या सर्व व्यवस्था ही आदिवासींच्या खच्चीकरणाची पहिली पायरी होती. यामुळे आदिवासींचा नैसर्गिक संसाधनांवरील हक्क संपुष्टात आला. (२) ब्रिटिशांनी अंमल गाजवला तेव्हापासून (म्हणजे १८०० सालापासून) साधारणपणे दुसरा टप्पा सुरू झाला ज्यात जंगल, जमीन, पाणी यावर सरकारी अधिकार प्रस्थापित झाला व नैसर्गिक संसाधनांपासून आदिवासी दुरावण्याची प्रक्रिया अधिकच गतिमान झाली. (३) तिसरा टप्पा हा स्वातंत्र्यानंतरच्या काळातला, ज्यामध्ये सरकारी गलथानपणा, आदिवासींबाबत बेफिकीर वृत्ती यामुळे आदिवासींची परिस्थिती आणखीनच वाईट झाली.

ही पार्श्वभूमी लक्षात घेता, धोरण आखायचे झाल्यास आदिवासींचे दुबळेपण दूर करून या समाजाला समर्थ व सक्षम कसे करणार आहोत, यावर भर द्यायला हवा. धोरण आखताना काही गोष्टी आपल्या बाजूने आहेत त्या म्हणजे: भारतीय राज्यघटनेने दिलेले मूलभूत हक्क, सार्वभौम व स्वातंत्र्याची मूल्ये (न्याय, समता, बंधुभाव), मागास लोकांसाठी असणाऱ्या सरकारी उपायोजना, आदिवासी विकासाचे पुरोगामी कायदे, कार्यकर्त्यांची जागृती व त्यातून निर्माण झालेले कायदे इ. या पार्श्वभूमीवर आदिवासी

विकासाचा अग्रक्रम लावायचा असल्यास पुढील गोष्टी व्हायला हव्यात. (१) आदिवासींना जमिनीवरचा निर्वेध हक्क मिळायला हवा. यामध्ये जिथे आदिवासी राहातात ते गावठाण, सामाईक हक्काची जमीन, व वैयक्तिक जमिनी या तिन्ही प्रकारच्या जमिनींचा समावेश असावा. २) मूलभूत विकासासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या जीवन शिक्षणाचा, शिक्षणपद्धतीमध्ये अंतर्भाव करावा. ३) आदिवासींचे वेगळेपण, त्यांची अस्मिता व मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनात्मक तरतुदी असाव्यात. या तीन सूत्रांवर आधारितच विकासाची दिशा असायला हवी.

- **डॉ. सुबोध वागळे** (संसाधने व उपजिवीका प्रयास)

डॉ. सुबोध वागळे या नवीन राष्ट्रीय धोरणाचे महत्त्व मांडताना असे म्हणाले की, हे धोरण म्हणजे केवळ एक दृष्टिकोन नसून सरकारचे आदिवासी विकासाबाबतचे वचनपत्र आहे. या धोरणाचा परिणाम सरकारचे उपक्रम व योजना यावर होऊ शकतो. म्हणूनच, हे धोरण जर वचनपत्र असेल तर लोकशाही व्यवस्थेत हे लोकांच्या हातातील नियंत्रण ठेवण्याचे प्रमुख हत्यार बनू शकते. परंतु, ज्यांचे हितसंबंध यात गुंतले आहेत व ज्यांच्या हिताविरूद्ध हे धोरण आहे, असे दोन्ही गट या धोरणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू शकतात. त्याचबरोबर नवीन धोरणाचा विचार उदारीकरण-खाजगीकरणाचा संदर्भ लक्षात घेऊन करायला हवा. खाजगी मालक /संस्था तसेच, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्था व वित्तसंस्था या धोरणात असणारा सरकार व राजकारण्यांचा प्रभाव कमी करून स्वतःचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतात. याबाबत एक उदाहरण असे देता येईल की सध्या प्रशासकीय सुधारणांबाबत (Administrative Reforms) जी चर्चा सुरु आहे त्या सुधारणांमागे जनतेचे हित हा उद्देश नसून सरकारी कारभार खाजगीकरणाच्या बाजूने झुकवणे हाच या आंतरराष्ट्रीय संस्थांचा हेतू दिसतो. ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेता आदिवासी धोरणावर आपला प्रभाव टाकण्यासाठी खोलात जाऊन विचार करण्याची, व सद्यःस्थितीस पर्याय देण्याची तसेच या सर्वांमागे प्रयत्नांचा रेटा लावण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. आपले प्रयत्न या दृष्टिकोनातून असायला हवेत, असे वाटते.

धोरणावरची प्रतिक्रिया मांडताना सुबोध वागळे म्हणाले की, या आदिवासींना सुरक्षित व शाश्वत उपजीविका मिळावी या दृष्टिकोनातून या धोरणातील मांडणीकडे पाहिल्यास धोरणामध्ये केलेली यआदिवासी समाजाच्या समस्या व त्यावरील उपाय अशा स्वरूपाची ही मांडणी सरधोपट व अपुरी वाटते. धोरण ठरवण्यापूर्वी या समस्यांच्या मुळाशी जाण्याची गरज असूनही धोरणात मात्र मूळ कारणांचे विश्लेषण न करता केवळ लक्षणांवर मलमपट्टी केल्याचे आढळते. त्यामुळे धोरणाच्या मसुद्याची संपूर्ण पुनर्रचना करण्याची गरज आपण ठामपणे मांडणे आवश्यक आहे.

मसुद्यातील त्रुटींचा उल्लेख करताना त्यांनी धोरणामागील गृहितकांचा उल्लेख केला. यामध्ये सध्याच्या शहरी व औद्योगिक छापाच्या विकासामध्ये आदिवासींना सामील करून घेतले की सारे प्रश्न सुटतील असे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे गृहीत धरले आहे. मात्र असा विकास आदिवासींना मान्य आहे का? शहरी औद्योगिक छापाच्या विकासात आदिवासींना वाटा देण्याची समाजातील बलिष्ट वर्गाची तयारी आहे का? सर्व आदिवासींना अशा विकासात खऱ्या अर्थाने सामावून घेता येईल का? या व यासारख्या प्रश्नांचा सखोल विचार मसुद्यामध्ये केलेला आढळत नाही.

यानंतर मसुद्याची पुनर्रचना करताना स्वीकारायच्या मुद्दयांची मांडणी करताना त्यांनी, विस्थापनावर कडक निर्बंध, विस्थापितांची विस्थापनापूर्वी आगाऊ सामूहिक संमती, सर्वमान्य असा पुनर्वसन कार्यक्रम, आदिवासींच्या पारंपरिक वापरातील नैसर्गिक संसाधनांवर निरपवाद असा सामूहिक अधिकार हे प्रमुख मुद्दे मांडले. आदिवासी समाजाच्या समस्यांमागे आदिवासी समाजांची आर्थिक, राजकीय व सामाजिक दुर्बलता हेच प्रमुख कारण असून त्यावरचा उपाय म्हणून आदिवासींचे आर्थिक, राजकीय व सामाजिक सबलीकरण करणे हे या आदिवासी धोरणाचे सर्वसाधारण उद्दिष्ट असायला हवे, असे मत त्यांनी मांडले. आदिवासी कुटुंबांच्या जीविकेच्या गरजांची पूर्ती होणे, आणि संकटकाळातही त्यांची जीविका चालू ठेवण्यासाठी आवश्यक ती बेगमी (साठा) त्यांना करता येणे, अशी परिस्थिती आदिवासी कुटुंब निर्माण करू शकले पाहिजे. आर्थिक सबलीकरणासाठीची अशी स्पष्ट व नेमकी उद्दिष्टे असायला हवीत असे ते म्हणाले.

- **श्री. काळूराम धोदडे (भूमीसेना आदिवासी एकता परिषद)**

आदिवासी समाज यापूर्वीच्या काळात जनसंघटनांबरोबर हक्कांच्या संघर्षात पुढे होता, तो संघर्षातून मागे का आला, याचा विचार आपण करायला हवा. मसुद्यातील मुद्दयांचे परिक्षण करतानाच आपण आपलेही परिक्षण करायला हवे की आपल्या प्रयत्नांचे नेमके फलित काय? आदिवासी विकासासाठी जे काही चांगले कायदे सरकारने केले, ते सत्तेसाठी केले व राजकारण्यांनी केले. लोकांच्या सहभागातून व आपल्या संघर्षातून मात्र काय झाले, हे तपासायला हवे. याकडे पाहिल्यास याचे प्रमुख कारण असे जाणवते की आपण एकसंघ नाही. देशातील सगळ्या आदिवासी भागात काम करणाऱ्या संस्था संघटनांशी आपला संपर्क असायला हवा व त्यातून आपण एकसंघपणे लढायला हवे. परंतु, यामध्ये अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता जाणवते. सरकारच्या विकासप्रकल्पांमुळे व इतर कारणांमुळे आदिवासींच्या जगण्याची साधने हडप होत आहेत. विस्थापनाचे प्रश्न तर आहेतच, परंतु विकासप्रकल्पांमुळे रोजगार मात्र मिळत नाही.

अशा प्रकल्पांना अधिक संघटितपणे विरोध व्हायला हवा. विकास, पैसे किती खर्च झालेय यावर ठरवला जातो परंतु माणूस हा केंद्रबिंदू ठेवून विकास व्हायला हवा. आदिवासींसाठी कायदे आहेत परंतु त्यांची अंमलबजावणी नीट होत नाही. आदिवासींचा विकास झाला नाही यावर उपाय म्हणून मुख्य प्रवाहात त्यांचे सामिलीकरण करावे असा उपाय मांडला जातो. या मुद्दयाला आपला विरोध आहे कारण त्यातील वाईट प्रवृत्तींचा परिणाम आदिवासींवर होण्याची शक्यताच अधिक आहे. आदिवासींचे जे चांगले विचार-आचार आहेत ते मात्र मुख्य प्रवाह स्वीकारताना दिसत नाही. याबरोबरच राजकारणात असलेले सर्व पक्ष आणि सत्तेवर असलेल्या सगळ्या सरकारांनी आजपर्यंत मोठमोठ्या योजना जाहीर करून प्रत्यक्षात आदिवासींची फसवेगिरीच केलेली आहे. अशा परिस्थितीत एकत्रितपणे, आदिवासी लोकांच्या सहभागातून विकासाचा कार्यक्रम उभा करणे हीच खरी जनसंघटनांची जबाबदारी आहे.

या मांडण्यांनंतर चर्चासत्रातील सहभागी कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यावर मते, आक्षेप व सूचना मांडल्या. या चर्चेचा थोडक्यात सारांश पुढे दिला आहे.

सहभागी कार्यकर्त्यांच्या मांडणीचा सारांश

सहभागी कार्यकर्त्यांनी मसुद्यातील त्रुटी दाखवतानाच स्थानिक समस्यांच्या अनुषंगाने मसुद्यामध्ये समाविष्ट केले जावेत असे अनेक मुद्दे व सूचना मांडल्या. आदिवासी विकासामध्ये असणाऱ्या या समस्या आणि त्यावर मांडल्या गेलेल्या सूचनांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा चार गटांमध्ये वर्गीकरण केले आहे.

आर्थिक सबलीकरणाबाबत सूचना

- चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांच्या काही भागात नक्षलवादाचा प्रभाव आहे. त्यामुळे आदिवासींचा विकास खुंटत चालला आहे. या भागातील आदिवासींच्या रोजगाराची प्रमुख साधने: बांबू तोडणे व तेंदूपत्ता गोळा करणे, या दोन्ही मार्गांवर गदा येत चालली आहे. तेंदूपत्ता ठेकेदारांना धमकावण्या व त्यांची पोटा कायद्याखाली अटक झाल्याने तो पर्याय बंद झाला आहे. बल्लारपूर पेपर मिलद्वारे कागद तयार करण्याकरिता बांबूऐवजी सुबाभूळीचा पर्याय पुढे आल्यामुळे बांबूतोडीमुळे मिळणारा रोजगार धोक्यात आला आहे. यावर उपाय म्हणून वनौपजाची संपूर्ण मालकी आदिवासींकडे द्यावी.
- आदिवासी भागामध्ये बांधल्या गेलेल्या छोट्या धरणांमध्ये स्थानिक नसलेल्या लोकांना मासेमारी करण्याचा ठेका दिला जातो. यामुळे आदिवासींच्या हक्कांवर गदा येते. आदिवासी समाजाच्या विकासाकरिता व्यवसायाभिमुख उपक्रम निर्माण व्हावेत या दृष्टीने भूमिहीन आदिवासींना मासेमारीचा ठेका देण्यात यावा.
- जमीन हस्तांतरण विरोधी कायद्यामुळे आदिवासींची जमीन बिगर आदिवासी लोकांना विकता येत नाही. यावर उपाय म्हणून ठेकेदार कराराने जमीन वापरण्यास घेतात. ही जमीन वीटभट्टीसारख्या

उद्योगांसाठीसुद्धा वापरतात व याच्या मोबदल्यात जमीनमालकास वर्षाला ३००० ते ४००० रु. देतात. अशा उद्योगांमुळे जमिनीची उत्पादनक्षमता नाहीशी होते. म्हणून सर्व मार्गांनी होणाऱ्या जमीन हस्तांतरणावर कडक निर्बंध असायला हवेत.

- शेतीच्या संदर्भात सरकारी योजना कमी आहेत त्यात वाढ करावी, योजनांच्या आखणीत लोक व कार्यकर्त्यांचा सहभाग असावा. बऱ्याच लोकांच्या जमिनींची खातेफोड झालेली नाही. यामुळे आदिवासी योजनेचा लाभ घेण्यामध्ये अडचणी येतात. या अडचणींची दखल घेऊन सरकारने सर्व आदिवासींच्या जमिनींची कागदोपत्री खातेफोड करून जमिनी कसणाऱ्या व्यक्तींच्या नावे कराव्यात व त्याचबरोबर जमिनींच्या सर्व नोंदी पूर्ण कराव्यात.
- आदिवासींच्या जमिनी सर्वसाधारणपणे डोंगराळ भागात उंच जागी असतात. आदिवासी भागातील पाणलोट क्षेत्रातील पाणी मात्र सखल भागातील धरणांद्वारे बिगर आदिवासी लोकांना मिळते. यावर उपाय म्हणून अशा सगळ्या छोट्या-मोठ्या धरणातील ५०% पाणी शेतीसाठी उचलण्याचा अधिकार आदिवासींना मिळावा.
- या नवीन धोरणात आदिवासींचे जंगलावरचे अधिकार मान्य करण्याची आवश्यकता आहे. आदिवासींनी जळणासाठी लाकूडफाटा जमा केल्यास त्यांना शिक्षा होते, मात्र जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असूनही त्याकडे सरकार दुर्लक्ष करते. जंगलतोडीबाबत कडक तरतुदी करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे शिकार करण्यासाठी आदिवासी जमातींवर बंधन नसावे.
- बस्तरमधील आदिवासी समाजाने स्वीकारलेल्या यबैलादिलाय जाहीरनाम्यानुसार आदिवासी समाजाच्या जमिनींवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पातून मिळणाऱ्या किंवा या जमिनींचा वापर करून केल्या जाणाऱ्या उपक्रमातून मिळणाऱ्या नफ्याचा किमान एक तृतीयांश वाटा हा स्थानिक आदिवासींच्या विकासासाठी खर्च करण्यात यावा. ही रक्कम ग्रामपंचायतीमध्ये थेट जमा करण्यात यावी.
- आदिवासी भागामध्ये अजूनही सावकाराबरोबर होणाऱ्या कर्ज देवघेवीच्या व्यवहारामध्ये आदिवासींची पिळवणूक होते आहे. याबाबत सरकारने अनेक उपाय योजले असले तरीही ते अपुरे आहेत व त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही. याबाबत लोकांना संरक्षण देण्यासाठी अधिक कडक उपाय योजायला हवेत.
- आदिवासींचे ज्या ठिकाणी वनाधारित व इतर उद्योग आहेत, तेथे कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रियेच्या सोयी असायला हव्यात. या सोयी नसल्याने या प्रक्रियेत आदिवासींचे सध्या होणारे शोषण

रोखण्यासाठी त्यांच्या उत्पादनाला योग्य तो हमीभाव द्यावा.

राजकीय सबलीकरणाबाबत सूचना

- आजपर्यंत घटनेच्या आधारे आदिवासींना मिळालेल्या हक्कांची पूर्तता झालेली नाही. पुन्हा मसुदा करण्याची गरज वाटत नाही. परंतु पूर्वीच्या सूचनांची व योजनांची नीट अंमलबजावणी का झाली नाही याचा नीट विचार होणे गरजेचे आहे.
- गडचिरोली भागामध्ये नक्षलवादी आदिवासींना मारहाण करतात. या मारहाणीपासून त्यांना गावातून किंवा सरकारकडून कुठलेही संरक्षण किंवा मदत मिळत नाही. वास्तविक पाहता घटनात्मक संरक्षणाची तरतूद सरकारवर बंधनकारक असूनही सरकार संरक्षण देण्यास अपयशी ठरत आहे. अशा प्रकारच्या त्रासाने प्रभावित झालेल्या आदिवासी जमातींसाठी विशेष संरक्षण व मदत देण्यात यावी.
- सरकारच्या आजवरच्या आदिवासी धोरणामध्ये काही परस्परविरोधी तरतुदी आढळतात. उदाहरणार्थ, आदिवासी स्वशासन कायद्यान्वये आदिवासी लोक स्थानिक वनाच्या व्यवस्थापनाकरिता स्वतंत्रपणे समिती स्थापन करु शकतात. परंतु वनखात्याच्या एका वेगळ्या योजनेतील तरतुदीनुसार संयुक्त वन व्यवस्थापनाच्या योजनेमध्ये सरकारचा (वनखात्याचा) सहभाग अनिवार्य आहे. अशा परस्परविरोधी तरतुदींमुळे गाव-वाडीतील सर्वसामान्य लोकांचा गोंधळ होतो. अशा प्रकारच्या तरतुदींचे सरकारने योग्य स्पष्टीकरण द्यायला हवे.
- आदिवासींच्या विकासाकरिता अनेक कायदे व योजना असूनही आदिवासींचा विकास न होण्याचे कारण म्हणजे या प्रक्रियेमध्ये आदिवासी समूहांचा सहभाग नाही. त्यामुळे धोरण व कायदे बनविण्यात आदिवासींना सामील करणे आवश्यक आहे. याबाबतीत आदिवासींची त्यांच्या विकासाबाबतची संकल्पना व विचार सामील करणे आवश्यक वाटते.
- आदिवासी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेद्वारे आदिवासींना मिळणाऱ्या सवलतींमुळे बोगस आदिवासींचा प्रश्न वाढतो आहे. रायगड जिल्ह्यात बोगस आदिवासींचे प्रमाण मोठे आहे. पुणे जिल्ह्यातील ४००० कातकऱ्यांना ते कातकरी आहेत हे सिद्ध करता येत नाही. हा प्रश्न सोडवायचा असल्यास आदिवासींना सामूहिक स्वयम् निर्णयाचा अधिकार असावा. त्याचबरोबर आदिवासी जातपडताळणी करणारा अधिकारी हा आदिवासीच असावा ज्यायोगे त्याला जातपडताळणी करणे सोपे जाईल.
- जातीचा दाखला मिळत नाही म्हणून आदिवासी सरकारच्या विविध विकासाच्या योजनांच्या बाहेर आहेत. प्रमाणपत्रांच्या

प्रक्रियेतील जाचक तरतुदींमुळे एखाद्या आदिवासी व्यक्तीला आदिवासी जमात सिद्ध करता आली नाही तर त्यांना कुठले लाभ द्यावेत हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. खोट्या आदिवासींचा प्रश्न सोडवण्यासाठी कायदेशीर तरतूदी असाव्यात.

- पुणे जिल्ह्यातील पश्चिम भागातील कातकरी लोकांनी त्यांच्या वहिवाटीखालील जमीन सोडून जावी म्हणून त्यांच्यावर हल्ले होत आहेत व त्यांना धमकावण्यात येत आहे. अशा धोक्यांपासून त्यांचे कायद्याने व प्रत्यक्षात संरक्षण व्हायला हवे.
- आदिवासींचे कुठल्याही मार्गाने विस्थापन करू नये अशी तरतूद धोरणामध्ये असावी. याकरिता यसमता जजमेंटय चा आधार घेण्यात यावा.
- आदिवासी कल्याणयोजना व विकासनिधीचे वाटप जिल्हा परिषदेद्वारे होते. तो निधी ग्रामपंचायतीच्या खात्यावर थेट जमा व्हावा. त्याबरोबरच योजना अंमलबजावणीचे अधिकारही ग्रामपंचायतीकडे द्यावेत.
- आदिवासींमध्ये जमातीच्या लोकसंख्येनुसार एखाद्या ग्रामपंचायतीच्या किंवा पंचायत समितीच्या क्षेत्रात जर आदिवासी जमात अल्पसंख्यांक असेल, तर त्या अल्पसंख्यांक जमातीस योग्य प्रतिनिधित्त्व मिळावे यासाठी आरक्षण असावे.
- आदिवासींचे मुख्य प्रवाहामध्ये सामिलीकरण करणे हा त्यांच्या विकासाचा उपाय नसून यामुळे आदिवासींचा विनाशच होणार आहे. मुख्य प्रवाहातील काही प्रवृत्तींचे हे षड्यंत्र आहे, यास प्रखर विरोध करण्याची गरज आहे.
- सध्याच्या ग्रामपंचायतीच्या व्यवस्थेमध्ये आदिवासी वाडी पाड्यांना निर्णप्रक्रियेमध्ये स्थान नाही. यामुळे वाडी पाड्यांची स्वतंत्र वाडीपंचायत असावी.
- आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचा श्रमविषयक ठराव आणि आदिवासींच्या हक्कांचा जाहीरनामा यामध्ये मांडलेल्या मुद्दयांचा धोरण ठरवताना विचार होणे आवश्यक वाटते.

सांस्कृतिक सबलीकरणाबाबत सूचना

- वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, रीतीरिवाज व चालीरीती असणारे मानवसमूह हे आदिवासी आहेत असे आपण मानतो. अलिकडच्या पिढीमध्ये ही वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती लोप पावते आहे. मग आदिवासी कोण हे कुठल्या आधारावर ठरवावे? आदिवासी जन्माने ठरतात असे मानावे काय? ज्यांनी ही संस्कृती सोडून दिली, त्यांना आदिवासी मानावे काय? न मानल्यास सरकारकडून मिळणाऱ्या विकासविषयक सवलती कुणाला द्याव्यात असाही प्रश्न आहे.

- आदिवासींची वेगळी विचारधारा, त्यांच्या न्यायदानाच्या पद्धती, भीक न मागण्याच्या प्रथा, ह्या मुख्य प्रवाह किंवा विचारधारेपेक्षा सरस आहेत. परंतु या प्रथांना मुख्य प्रवाहात स्थान नाही. या वैशिष्ट्यपूर्ण पद्धती जपण्यासाठी सरकारने काही उपक्रम हाती घ्यायला हवेत.
- सुईण, वनौषधी इत्यादींसारख्या आदिवासी लोकांमधील पारंपारिक ज्ञानास जतन करून त्यास संरक्षण, बळकटी, व आधार द्यावा. वनौषधी स्वस्तात मिळतील, यावर भर दिला जावा.
- आदिवासींच्या भाषा, चालीरीती व जीवनपद्धतीस संरक्षण द्यावे ज्यायोगे त्यांच्या संस्कृतीचा विकास तेच करतील असा विचार धोरणकर्त्यांनी करायला हवा. शिक्षणाचा प्रश्न, शिक्षणाची उद्दिष्टे काय, आदिवासींना शिक्षणाचा उपयोग काय होईल, त्यामुळे ते मूलभूत विकासाचा विचार करतील की वरच्या वर्गाप्रमाणेच विचार करायला लागतील याकडे लक्ष द्यायला हवे.
- आदिवासींना अनुसूचित जमाती म्हणून नाही तर मूळ निवासी म्हणून मानले जावे.

सामाजिक सबलीकरणाबाबत सूचना

- शिक्षणाचा दर्जा गुणवत्तापूर्ण आहे का? हे ठरवण्यासाठी ठोस निकष निश्चित करण्यात यावेत. आदिवासी भागातील आश्रमशाळांच्या ठिकाणी असलेल्या सोयींचे पुनर्विलोकन करून योग्य त्या सोयी उपलब्ध कराव्यात. त्याबरोबरच आदिवासींना उच्चशिक्षणाची व तंत्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- इंग्रजी हा विषय इयत्ता पहिलीपासून लागू केला आहे. परंतु, प्राथमिक इयत्तांमध्ये परीक्षापद्धती बंद केल्यामुळे या विषयाकडे दुर्लक्ष होत असून तो शाळेत शिकवला जात नाही. यामुळे मुलांचे नुकसान होत आहे. याबाबत ठोस उपायोजना कराव्यात.
- स्थानिक ठिकाणी कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देण्याच्या सोयी उपलब्ध केल्या जाव्यात. अशा सोयी तांत्रिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करून ते आश्रमशाळांमध्ये सुरू करता येतील.

सहभागींनी केलेल्या सूचनांनंतर, श्री. काळूराम धोदडे यांनी थोडक्यात त्यांचे विचार मांडले. त्यांच्या मांडणीचा सारंश खाली देत आहोत.

गट १. जमीनः हक्क, विस्थापन आणि पुनर्वसन

- आदिवासींच्या जमिनीवरच्या हक्काला कुठलाही धक्का पोहचू नये व आदिवासींचे जमिनीवरील हक्क कायद्याने अबाधित राहावेत. मूळ धोरणविषयक मसुद्यामधील सूचना (संदर्भ: जमिनीशी फारकत – मुद्दा क्र. १, २, ३, ४, ५ व ६) अंमलात

आणण्याकरिता ग्रामपंचायत कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल, ती करावी.

- आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यातील सर्व पळवाटा म्हणजे खंड, करार, बक्षिसपात्र, किंवा संस्थेस जमीन देणे यांना प्रतिबंध करावा व तशी कायद्यात दुरुस्ती करावी. जमीन सार्वजनिक अथवा इतर संस्थेच्या किंवा ट्रस्टच्या अखत्यारित हस्तांतरित होत असल्यास मालकी अथवा कराराने घेणाऱ्या ट्रस्टचे ८०% सदस्य आदिवासी असावेत व ट्रस्टची आदिवासी सदस्य संख्या कायम रहावी. त्यापुढील जमिनीचे हस्तांतरण अशाच ट्रस्टकडे अथवा आदिवासी व्यक्तीकडे व्हावे.

- पूर्वी हिरावल्या गेलेल्या जमिनींवर आदिवासींच्या हक्कांची पुनर्प्रस्थापना व्हावी. ज्यांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या आहेत त्यांच्यावर नुकसानभरपाई म्हणून कर लावला जावा व ह्या करातून मिळणारा पैसा आदिवासींच्या विकास कामांसाठी वापरावा.

- सरकारने जमिनीविषयक सर्व प्रकरणे कागदपत्राअभावी अवैध न ठरवता निकाली काढावीत. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनींचे प्रश्न मोडतात, जसे की, दळी, एकसाली, कूळ कायद्याद्वारे मिळणारी, वनअतिक्रमित, महसूल अतिक्रमित जमिनी, कमाल जमीन धारणा (सिलिंग) कायद्याखालील जमिनी, गायरान जमिनी व इतर अशा स्थानिक जमिनींची सर्व प्रकरणे व नोंदी पूर्ण करून अशी सर्व प्रकरणे निकाली काढावीत. आदिवासींच्या जमीनविषयक कागदपत्रांची पूर्तता, त्यासाठी करावे लागणारे मोजमाप व त्याची नोंदणी पूर्ण करावी. हे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी व यासाठी योग्य त्या तरतूदी करून त्यास कायद्याने संरक्षण मिळावे.

- आदिवासींच्या ताब्यात असलेली जमीन किंवा वहिवाटीने असलेल्या जमिनी, त्यांच्याकडून काढून घेऊ नयेत. या जमिनी आदिवासींच्या म्हणून गणल्या जाव्यात व त्यावर आदिवासींच्या मालकीची नोंद व्हावी. कुठलाही आदिवासी भूमिहीन राहता कामा नये. सगळी वनग्रामे (फॉरेस्ट व्हिलेजेस) ही महसूल गावे (रेव्हेन्यू व्हिलेजेस) म्हणून जाहीर करावीत. हे करताना त्या गावांच्या सीमा निश्चित करण्यात याव्यात. फिरती शेती बंद करण्यापूर्वी सरकारने आदिवासींना कायमस्वरूपी जमिनी द्याव्यात.

- धरण व यासारख्या इतर विकासप्रकल्पांमध्ये जास्तीत जास्त आदिवासी उठविण्याची, त्यांचे विस्थापन करण्याची सरकारची भूमिका जाणवते ती योग्य नाही. कुठल्याही प्रकल्पासाठी आदिवासींची जमीन घेण्यात येऊ नये. पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी सदोष

आहे. त्यामुळे पुनर्वसन योग्य पद्धतीने होत नाही याबाबत योग्य ती कारवाई करावी.

- सेक्शन क्र.१४ व सेक्शन क्र. ३५ (वैध व अवैध जमीन हस्तांतरण कायदा) यया कायद्यातील तरतुदींच्या संदर्भातील मुदत संपून गेली आहे. ही मुदत वाढवून मिळावी. तशी कायद्यात दुरुस्ती व्हावी. वर्षानुवर्षे कसत असलेली जमीन कूळ असूनही, कूळाच्या नावे न होण्यात कूळ कायद्यामधील कलम क्र. ७० बी नुसार जसा पुरावा मिळायला हवा, तशा स्वरूपात तो आदिवासींकडे मिळत नाही ही एक प्रमुख अडचण आहे. हा पुरावा ज्या ठिकाणी मिळत नाही तेथे गावसमूहाने दिलेला पुरावा मान्य करण्यात यावा.

- आदिवासींमध्ये जमीन हक्काबाबत जाणीव–जागृती वाढवण्यासाठी व जमीनविषयक कायद्यांमधील तरतुदी लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्याचा प्रसार सरकारने योग्य त्या सरकारी/गैरसरकारी प्रसार माध्यमातून करावा.

- कुठलाही आदिवासी भूमिहीन रहाता कामा नये. किमान ५ एकर कोरडवाहू अथवा २.५ एकर सिंचित जमीन प्रत्येक आदिवासी कुटुंबाकडे असणे/देणे आवश्यक आहे. जमीन उत्पादक नसल्यास अशा जमिनीची सुधारणा करण्याचा अधिकार कायद्यामधे असावा. यासाठी शासकीय योजनेद्वारे आर्थिक पाठबळ मिळावे.

- वनग्रामे (फॉरेस्ट व्हिलेजेस) ही महसूल ग्रामे (रेव्हेन्यू व्हिलेजेस) म्हणून जाहीर करण्यात यावीत. वनक्षेत्रामधील अतिक्रमित जमिनी आदिवासींच्या नावावर व्हाव्यात. संयुक्त वन व्यवस्थापनाचे प्रकल्प (सं.व.व्य.) राबवताना वनक्षेत्रामधील अतिक्रमित जमिनी नियमानुकूल व्हाव्यात, म्हणजेच संयुक्त वन व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवण्याची प्रक्रिया आणि वनक्षेत्रातील शेतजमिनी/लागवडीखालील आदिवासींच्या जमिनी नियमानुकूल करण्याची प्रक्रिया एकाच वेळी व्हावी. यामुळे आदिवासींचा सहभाग सं.व.व्य. मध्ये मिळू शकेल. अशा प्रकारची दुरुस्ती १९९३ सालच्या वन कायद्यामध्ये करण्यात यावी.

- पुढील तीन बाबींवर देखरेख करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा असावी. १) जमीन अधिकार संरक्षण २) कायद्यांची कठोर अंमलबजावणी, व ३) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक शासन

गट. क्र. २ – उपजीविका: आर्थिक विकास, रोजगाराचा हक्क आणि संसाधनांवरील मालकी, बौद्धिक संपदेवरील अधिकार

- आदिवासी क्षेत्राचे नियोजन आदिवासींची समृद्ध जीविका केंद्रीभूत मानून करण्यात आले पाहिजे. उपजीविकेचे दोन मुख्य आधार –

नैसर्गिक संसाधने व श्रमाचा वापर संरक्षित करण्यात आला पाहिजे. त्यासाठी नैसर्गिक संसाधने म्हणजे जंगल, पाणी, मासे, वन्य प्राणी यावर स्थानिक गावसमूहांचा सामूहिक अधिकार संरक्षित करण्यात यावा. पर्यावरण आणि वन्यजीवांचे संतुलन राखण्याची गरज व पूर्वअटींसह हे अधिकार संरक्षित करण्यात यावेत. जंगल उत्पादनावर अधिकार मिळण्यासाठी योग्य त्या तरतूदी कराव्यात आणि वन्य उत्पादनांवर गावसमूहाचा सामूहिक अधिकार संरक्षित करण्यात यावा.

- शेतीच्या टिकाऊ व चिरंजीवी पद्धती व त्यासाठी पारंपारिक तंत्रज्ञान जोपासून त्यास पूरक ठरेल असे आवश्यक ते नवीन तंत्रज्ञान पोहोचवण्याचे कार्यक्रम घेण्यात यावेत.

- केंद्रीय स्तरावर एकूण अर्थसंकल्पापैकी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी खर्च झाला पाहिजे. तसेच प्रत्येक राज्याला देखील तेथील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी उपलब्ध व्हायला हवा.

- आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे विस्थापन होऊ नये हा देखील नियोजनाचा गाभा असायला हवा. रोजगाराच्या शोधात स्थलांतर, पाणी प्रदूषण, शहरीकरण, औद्योगिकरणामुळे होणारे आदिवासींच्या उपजीविकेचे अप्रत्यक्ष विस्थापन टाळणारे विकासाचे धोरण असायला हवे.

- संसाधने विकसित व समृद्ध करणे व त्यास आदिवासींच्या श्रम शक्तीची जोड देत त्या संसाधनांवर अधिकार संरक्षित करणे व त्यासाठी लागणाऱ्या क्षमता, कौशल्यांचा विकास करणे यासाठी आवश्यक त्या तरतूदी करण्ययात याव्यात. निकृष्ट जमिनी उत्पादक करण्याचे काम रोजगार हमी योजना (रोहयो) सारख्या योजनांअंतर्गत रोजगार हक्कांशी जोडून करण्यात यावेत. रोहयोसारखी योजना देशाच्या स्तरावर राबवण्यात यावी.

- बागायत, फळ लागवड या क्षेत्रातील मजूरांना कुशल कामगार मानण्यात यावे. तसेच अन्य बांधकाम, खाणकाम, वीटभट्ट्या व शेती इ. क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित कामगारांच्या किमान वेतनाचे संरक्षण व किमान वेतनास महागाई भत्त्याची जोड देऊन दर सहा महिन्यांनी वेतनाचे पुनर्निधारण करण्यात यावे.

- किमान वेतन न देणे वा वेठबिगार ठेवणे यासारख्या गुन्ह्यावर नियंत्रण आढाव्यासाठी स्वतंत्र यंत्रणा करण्यात यावी, व किमान वेतन कायद्याचे उल्लंघन हा दखलपात्र गुन्हा मानण्यात यावा.

- जिथे आदिवासींच्या क्षेत्रात धरणे व वीज प्रकल्प आहेत, तिथे निर्माण होणाऱ्या उर्जेवर, पाण्यावर व सिंचित जमिनीवर प्राधान्याने अधिकार तेथील आदिवासी गावे व समूहांचा असला पाहिजे. राज्य पातळीवर आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी

जे प्रमाण आहे त्या प्रमाणात एकूण राज्यात उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा व वीजेचा वाटा आदिवासींना मिळायला हवा.

- आदिवासी क्षेत्रात तेथील संसाधने, आदिवासींची जीविका, जीवनशैली, शेतीच्या व इतर कामाच्या वेळा लक्षात घेऊन रोजगार निर्मिती करण्यात यावी. आदिवासी विकास योजना प्राधान्याने रोजगार निर्मिती या उद्देशासाठी राबवण्यात याव्यात.
- आदिवासींचा शेतीमाल व अन्य उत्पादनांच्या विक्रीला हमीभाव देऊन व योग्य त्या यंत्रणा उभारून बाजारपेठेतील त्यांचा माल संरक्षित करण्यात यावा. तसेच आदिवासी क्षेत्रातील आठवडी बाजारांना आवश्यक त्या सोयी पुरवून त्या बाजारपेठा संरक्षित करण्यात याव्यात.
- आदिवासी उपयोजना बाहेरील क्षेत्रातील भागात जिथे आदिवासी विखुरलेले व अल्पसंख्य आहेत तिथे त्यांच्या जीविकेच्या संरक्षणासाठी विशेष विकास योजना आखण्यात याव्यात व केंद्र सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करावा.
- आदिवासी भागात असणाऱ्या धरणातील ५०% पाणी मोफत उचलण्याची परवानगी आदिवासींना असावी. यासाठी वीजबिलामधे माफी मिळावी. त्याचबरोबर राज्यात एकूण उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी, आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजेच महाराष्ट्राच्या संदर्भात ९% पाणी आदिवासींसाठी राखून ठेवण्यात यावे. यासाठी योग्य ती कायदेशीर तरतूद करण्यात यावी.
- बौद्धिक संपदेवरील अधिकार देताना जैविक विविधतेचा विचार करून वने, वनौषधी, पारंपारिक बियाणे व कंपोस्ट पद्धती या सगळ्यांची नोंदणी व्हावी.

गट: ३- सामाजिक विकास: शिक्षण / आरोग्य / सार्वजनिक सुविधा

शिक्षण

- आदिवासी भागातील प्रत्येक शाळा एकशिक्षकी असण्याऐवजी द्विशिक्षकी असावी. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा (पटाचा) विचार केला जाऊ नये. आदिवासी भागातील भोंगा शाळा व वस्तीशाळा ह्या आदिवासींच्या शैक्षणिक ऱ्हासाचे कारण ठरल्या आहेत. त्या बंद करून जिल्हा परिषदेने शाळा चालू कराव्यात. शिक्षण सक्तीचे असावे.
- सर्व शिक्षा अभियान ही योजना २०१० पर्यंतच न ठेवता शासनाने ती कायमस्वरूपी चालवावी. त्याबरोबरच सर्व उच्च शिक्षणासाठी लागणारी प्रवेश फी शासनाने माफ करून त्यांना शिक्षणाची संधी द्यावी. यामध्ये आर्थिक निकष व गुणवत्ता पडताळून आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे.
- प्राथमिक शिक्षणामध्ये काही इयत्तांमधे परीक्षा पद्धती बंद असल्याने मूल्यमापनाच्या

पद्धती बदलून मूल्यमापन गुणवत्तेवर आधारित असावे. अनौपचारिक शिक्षणाच्या पद्धती अंगिकारून त्यासाठी शिक्षण योजनांमधे तशा प्रकारच्या तरतूदी कराव्यात. त्याबरोबरच उपजीविका मिळवण्यासाठी उपयुक्त अशी तंत्रे व कौशल्ये निर्माण करण्यासाठी तंत्रशिक्षणाची सोय करावी.

- आदिवासींची मायबोली (मातृभाषा) जाणणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करावी. मायबोली ही प्राथमिक शिक्षणापर्यंत मर्यादित न ठेवता किमान १२वी पर्यंत असावी. प्रत्येक शिक्षकास अध्यापन पद्धतीचे (बी. एड.) शिक्षण सक्तीचे असावे. प्रत्येक पाड्यावर शाळा असावी आणि वर्षातून ३०० दिवस पाड्यावर राहणारा शिक्षक असावा. महाविद्यालयामध्ये मायबोली हा वेगळा विषय अभ्यासाकरिता असावा.
- आदिवासी भागातील शिक्षकांची गळती रोखण्यास व शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता गावपातळीवर शिक्षण समिती नेमण्यात यावी व या समितीस शिक्षणाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचे योग्य ते अधिकार देण्यात यावेत.
- आदिम आदिवासींसाठी ज्या भागात मुलांची गळती जास्त आहे त्या ठिकाणी स्वतंत्र आश्रम शाळा काढून ही शाळा शिक्षणाच्या सर्व सोयीसुविधांनी संपन्न असावी. उच्च शिक्षणासाठी लागणारी प्रवेश फी शासनाने माफ करून त्यांना शिक्षणाची संधी द्यावी. यामध्ये आर्थिक निकष व गुणवत्ता पडताळून आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे.
- प्राथमिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना पूरक आहाराऐवजी सकस आहार असावा.

आरोग्य

- आदिवासी समाजातील परंपरागत उपचारपद्धतींशी सांगड घालण्याच्या उद्देशाने सरकारी दवाखान्यात अॅलोपॅथीपेक्षा आयुर्वेदावर अधिक भर द्यावा.
- प्रत्येक सरकारी रुग्णालयामध्ये आरोग्य दक्षता समिती असावी. रुग्णालयातील दक्षता समितीमध्ये स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना आणि आदिवासी समाजाला प्रतिनिधित्व असावे.
- रुग्णालयाची निर्मिती करतेवेळी लोकसंख्येचा विचार न करता भौगोलिक परिस्थितीनुरुप विचार करावा. दुर्गम भागामधे योग्य त्या सोयी सुविधा निर्माण करण्यात याव्यात.
- आदिवासी स्वशासन कायदा- २४४/६ त्या अनुसूचीप्रमाणे ग्रामसभेचे, आरोग्यविभागातील व शिक्षणविभागातील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण असावे.
- पोषक आहाराला प्राधान्य देताना पोषक आहाराच्या स्थानिक स्रोतांवर, जसे की, परसबाग, घरगुती वनौषधी, भर द्यावा. त्यासाठी योग्य त्या योजना आखून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

- प्रजनन व बाल आरोग्य, किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य याबाबत जाणीवजागृतीचे उपक्रम हाती घेऊन आरोग्यशिक्षण व स्त्रियांचे आरोग्य व बाल आरोग्य या समस्या सोडवण्यासाठी योग्य उपायोजना हाती घ्याव्यात. यआरोग्यशिक्षणयय व इतर योजना एकमेकांशी जोडून अमलात आणाव्यात.
- केंद्रिय शाळा आदिवासी भागात असूनही शाळेच्या कामकाजावर केंद्राचे नियंत्रण नाही. या शाळांची जबाबदारी राज्यसरकारवर नसल्याने राज्य सरकार त्यात लक्ष घालू शकत नाही. त्यामुळे या शाळांबाबत केंद्र-राज्य संबंध स्पष्ट करावेत व कामकाज योग्य पद्धतीने चालावे यासाठी योग्य यंत्रणा नेमावी.

सार्वजनिक सुविधा

- अपारंपारिक उर्जेचा व सौर ऊर्जेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने उपक्रम हाती घ्यावेत.
- कायमस्वरुपी स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करणे, पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम आदिवासी भागामध्ये व्हावे, यांना प्राधान्य देताना पिण्याच्या पाण्याचे कार्यक्रम/योजना पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमांशी जोडून घ्याव्यात.
- गावामध्ये शौचालये बांधावीत.
- प्रत्येक वाड्या-पाड्याला पक्के रस्ते असावेत.
- आदिवासी भागातील वीजपुरवठा पूर्ववत चालू करावा. राज्याच्या एकूण वीज उत्पादनापैकी ९% (लोकसंख्येच्या प्रमाणात) वीज आदिवासींना पुरवण्यात यावी.

सामाजिक सुरक्षा

- रेशन दुकानामार्फत दिले जाणारे स्वस्त धान्य मिळण्याचा अधिकार सगळ्या आदिवासींना पूर्वीप्रमाणेच सार्वत्रिक मिळायला हवा, तो आता आहे त्याप्रमाणे लक्ष्याधारित नसावा. धान्याची सर्वांसाठी उपलब्धता हवी.
- दारिद्र्य रेषेच्या आधारे सरकारच्या विकास योजना छोट्या गटांसाठी निश्चित केल्या जातात. यांचा लाभ खऱ्या आदिवासींना मिळावा. यासाठी पाच एकर व त्यापेक्षा कमी जमीनधारणा असणारे सर्व आदिवासी व कायमस्वरूपी नोकरी नसणारे सर्व आदिवासी दारिद्र्यरेषेच्या खाली गणले जावेत.
- आदिवासी समाजातील निराधार स्त्रिया व मुले, अंध व अपंग व्यक्ती यांना सामाजिक सुरक्षेचे उपाय कायद्याद्वारे मिळावेत म्हणजे कायमस्वरुपी खात्रीचा लाभ मिळेल. ही योजना ग्रामपंचायतीकडे देण्यात यावी.

गट: ४ आदिवासी संस्कृती: भाषा, अस्मिता आणि मुख्य प्रवाह

- मोठ्या प्रमाणावर बोगस आदिवासींचे प्रमाण वाढलेले आहे. बोगस आदिवासींच्या संदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये एक केस दाखल करण्यात आली होती. यामध्ये असे निष्पन्न झाले की जर एखादे आडनाव (उदा. ठाकूर) हे जर कुठल्याही जातीमध्ये (caste) आहे व जमातीतही (tribe) आहे असे आढळले व त्या व्यक्तीने जर ती स्वत: अनुसूचित जमातीची असल्याचा दावा केला तर ती व्यक्ती नेमकी जातीत आहे की जमातीत हे शोधण्याचा अधिकार राज्यघटनेने कुणासही दिलेली नाही. त्यामुळे एखाद्या जातीतील समान आडनावाच्या व्यक्तीने (जे आडनाव आदिवासी जमातीमधेही आढळते) ती व्यक्ती त्याच आडनावाची आहे हे सिद्ध केले तर तो अनुसूचित जमातीचा आहे अशी मान्यता त्यास दिली जाऊ शकते. याचा फायदा इतर अनेक बिगर आदिवासी समाजातील लोकांनी घेतला व बोगस प्रमाणपत्रे मिळवली. हा प्रश्न सोडवायच्या दृष्टीने एका मुद्दयाकडे सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधता येईल की, राज्यघटनेने राष्ट्रपतीला दिलेल्या अधिकारानुसार एखादी जमात ही अनुसूचित जमात म्हणून जाहीर करताना 'Declar not a community but a tribe as a scheduled tribe' असा स्पष्ट निर्देश राज्यघटनेमध्ये आहे. याचा अर्थ राष्ट्रपती अनुसूचित जमात म्हणून कुठल्याही एका जमातीला किंवा पोटगटाला जमात म्हणून जाहीर करू शकतात, कुठल्याही समाज किंवा जातीला नाही. याकडे सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधून या आधारावर बोगस आदिवासी प्रश्न धसास लावता येऊ शकतो.

- याबरोबरच आदिवासी जमातींची अनुसूची पुन्हा तयार करून त्या सूचीपुढे जमात-पोटजमात कुठली याचे वर्गीकरण करावे. त्यांना यआदिवासी/इंडिजिनस पीपलय असे जाहीर करावे. आदिवासी लोकांना प्रमाणपत्र देताना प्रमाणपत्रात हिंदू असा शब्दप्रयोग करु नये. आदिवासींना कुठलाही धर्म नाही. आदिवासी व्यक्ती ही स्वतंत्रपणे आदिवासी म्हणून ओळखली जावी.

- संस्कृती टिकवणे हे त्या त्या मानवसमूहाचे काम असले तरीही संस्कृतीस मारक प्रवृत्तींना प्रतिबंध करण्याची धोरणे बनवून ती अमलात आणता येऊ शकतात. या प्रकरणी विशेष अध्यन करून तशा प्रकारची धोरणे बनवण्याची आणि राबवण्याची जबाबदारी सांस्कृतिक मंत्रालयाने घ्यावी.

- मुख्य प्रवाहाबाबत आदिवासींची मते/विचार काय आहेत हे जाणून घेणे आवश्यक आहे. मुख्य प्रवाह म्हणजे राजकीय व आर्थिक बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार. या सर्वांवर ज़ास्त खोलात जाऊन चर्चा व्हावी. ज्याच्या हाती आर्थिक सत्ता व निर्णय प्रक्रियेत सहभाग तो मुख्य प्रवाह अशी मुख्य प्रवाहाची व्याख्या मानल्यास मुख्य प्रवाहात आल्यावर आदिवासींचे अस्तित्व संपून जाईल.

- आदिवासी भाषा हळूहळू लोप पावते आहे. याकरिता किमान पातळीवर प्राथमिक शिक्षण हे मायबोलीतून द्यावे. इयत्ता १२ वी पर्यंत आदिवासी भाषा जाणणाऱ्या शिक्षकांमार्फत अध्यापनाचे काम व्हावे. याबरोबरच भाषा टिकवण्याकरिता शासनातर्फे इतर उपक्रम हाती घ्यावेत.
- आदिवासी समूहाचे मूलभूत हक्क कायम राहतील अशाच तऱ्हेने सर्व उपायोजना केल्या पहिजेत. आदिवासींना सन्मानाचे आणि दहशतमुक्त जीवन जगता येईल अशी परिस्थिती असावी. सामाजिक अत्याचार, शोषण, अन्याय यापासून कायद्याचे संरक्षण असावे.

गट क्र ६. प्रशासन आणि नियोजन

प्रशासनाच्या गटाने प्रथम या विषयावरील मूळ मांडणीबाबत टिप्पणी केली. त्यानंतर नियोजन व प्रशासनाबाबतचे सरकारी धोरण कुठल्या मूलभूत तत्त्वांवर आधारित असावे त्या तत्त्वांची मांडणी केली व सर्वात शेवटी धोरणाबाबतच्या सूचनांची मांडणी केली. या गटाने केलेल्या वर्गीकरणानुसार त्यांची मांडणी खालीलप्रमाणे.

टिप्पणी:

- प्रशासन यंत्रणेला नवसंजीवनी देण्यासाठी मूळ मसुद्यामधे मांडलेल्या सूचना फक्त शासनाच्या अधिकाऱ्यांच्या सोयीच्या आहेत. उदा. अधिकाऱ्यांच्या कौशल्य विकासाचे कार्यक्रम देण्यात यावेत, त्यांना सोय म्हणून पायाभूत सुविधांना प्राधान्य द्यावे, अधिकाऱ्यांना योजनांच्या अंमलबजावणीसाठी पुरेसा वेळ/कालावधी द्यावा. परंतु आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने प्रशासन आणि नियोजनामधे काहीही तरतुदी/सुधारणा नाहीत.

प्रशासन यंत्रणेची मूलतत्त्वे:

- प्रशासनाच्या कारभाराची निर्णय प्रक्रिया स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. यामध्ये लोकांच्या सहभागास अधिकाधिक महत्व द्यावे.
- स्थानिक पातळीवरच्या सामान्यांना समजून घेऊन आणि प्राधान्य देऊन निणय घ्यावेत आणि कृतीचे नियोजन व्हावे.
- नियोजनामध्ये आदिवासी लोकांचे प्रतिनिधित्व असायला हवे.

प्रशासन यंत्रणेचे स्वरुप : सूचना

- ग्रामसभेच्या धर्तीवर वाडी-सभा किंवा पाडासभा असणे आवश्यक आहे. या वाडीसभांना ग्रामसभेला सद्य:परिस्थितीत असणाऱ्या अधिकारांच्या जोडीनेच गावपातळीवर विविध विषयांवर चालणाऱ्या निर्णयप्रक्रियेमधे सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार असणे आवश्यक आहे. उदा: जातीच्या प्रमाणपत्रांचा दाखला, दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची निश्चिती इ. या

बाबतीतील निर्णप्रक्रियेमध्ये अधिकार असावेत.

- प्रशासकीय हद्दीची पुनर्रचना सध्या भौगोलिक पातळीवर आणि लोकसंख्येच्या आधारावर केलेली आहे. ती बदलून जमात निहाय प्रशासकीय हद्दी ठरवण्यात याव्यात. यासाठी आदिवासी स्वायत्त तालुका किंवा जिल्हा किंवा राज्य अशा प्रकारे प्रशासकीय हद्दी ठरवण्यात याव्यात. उदा. भिलखंड राज्य
- गावपातळीवरील विकासासाठीच्या सगळ्या योजनांची आखणी, नियोजनामधे आदिवासी समूहांचे प्रतिनिधित्व असावे व त्याबरोबरच अंमलबजावणीमधे त्यांचा सहभाग असावा. रोजगार हमी योजनांसारख्या योजनांचे नियोजन नीट करावे व नियोजनामधे आदिवासी गावसमूहांचा सहभाग असावा.
- गावपातळीवर ग्रामसभेसारख्या व ग्रामपंचायतीसारख्या संस्थांच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवतानाच पंचायत समितीच्या पातळीवरही आदिवासी लोकांचा सहभाग वाढवण्यास प्रयत्न व्हावेत. त्यासाठी आवश्यक अशा तरतुदी असाव्यात.
- सध्याची कारभाराची पद्धती बदलण्यात येऊन प्रशासनासाठी कारभाराची केंद्रित पद्धत लागू करण्यात यावा. ही प्रशासकीय पद्धत वाडी/ग्रामपातळीपासून तालुका, जिल्हा, राज्य व केंद्रपातळीपर्यंत असायला हवी. यामध्ये जास्तीत जास्त कर्मचारी आदिवासी असायला हवेत. उदा. सरकारच्या प्रती उत्तरदायी असणारी राज्य सल्लागार समिती आदिवासी सल्लागार मंडळ असायला हवी व ती आदिवासी विकास आयुक्तालय म्हणून ओळखली जावी. यानंतर जिल्हा व तालुका विकास अधिकार मंडळ अशी उतरंडीची व्यवस्था असू शकते.

आरक्षण धोरण

- प्रशासकीय व सार्वजनिक क्षेत्रामधील आरक्षणाच्या तरतुदी कायम ठेवाव्यात व त्याबरोबरच खाजगी क्षेत्रामधे नोकऱ्यांसाठी आरक्षण धोरण लागू करण्यात यावे. यामधे आदिवासींमधील शिकलेल्या पहिल्या पिढीस आरक्षण असावे व ते नीट राबवले जावे.
- आदिवासी समाजास सरकार स्थापनेमधे योग्य प्रतिनिधित्व मिळावे याकरिता आदिवासी मतदारसंघ राखीव ठेवण्याचे धोरण कायम ठेवतानाच काही ठिकाणच्या मतदारसंघांची पुनर्रचना करावी, जेणेकरून आदिवासी मतदार इतर मतदारसंघांमधे विभागला न जाता आदिवासी समाजास योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल.
- बोगस आदिवासी प्रश्न आणि आदिवासी प्रमाणपत्र दाखला व ओळख पटवणे व ठरवणे याचे अधिकार स्थानिक आदिवासींकडे असावेत. यामध्ये सरकारी अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करू नये.

इतर मुद्दे

- विकासासाठी अंदाजपत्रकामधे मंजूर होणारा निधी देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींचे जे प्रमाण आहे त्या प्रमाणात मंजूर व्हावा. अंदाजपत्रकामधील उर्वरित निधी सरकारकडे परत न देता स्थानिक लोकांच्या सहभागाने गावाच्या विकासासाठी वापरण्यात यावा.
- गावामध्ये एक वाडी–गाव पंचायत विकास केंद्र असावे. या केंद्रामधे लोकांसाठी सर्व सरकारी योजनांची व कायद्यांची माहिती असायला हवी.

केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय आदिवासी धोरणावरील सूचना व प्रतिक्रिया (महाराष्ट्रातील प्रक्रियेतून तयार झालेला दस्तावेज)

भाग १ : प्रस्तावना

भारत सरकारने प्रसृत केलेल्या आदिवासी धोरणावर विविध संस्था व आदिवासी समाजघटकांमध्ये सखोल व व्यापक सहभागाने चर्चा व्हावी या उद्देशाने महाराष्ट्रात काम करणारे अभ्यासक आणि संस्था संघटनांचे कार्यकर्ते यांचे एक चर्चासत्र पुणे येथे दि. ८ व ९ मे २००४ रोजी आयोजित केले होते. हे चर्चासत्र महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे; शोषित जन आंदोलन (महाराष्ट्र) ही जनसंघटनांची आघाडी; आणि प्रयास (संसाधने व उपजीविका गट), पुणे या तीन आघाडी/संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केले होते. या चर्चासत्रामधे सरकारने प्रसिद्ध केलेल्या धोरणाचा मसुदा आणि आदिवासींच्या विविध प्रश्नांवर व्यापक विचारविनिमय झाला. या चर्चेच्या दरम्यान, आदिवासींचे विकासविषयक प्रश्न सोडवण्यासाठी सरकारी धोरणात समाविष्ट व्हाव्यात या उद्देशाने सहभागींनी अनेक सूचना मांडल्या. या सर्व सूचना आणि धोरणसूत्रे संकलित करून सदर टिपण तयार केले आहे. या चर्चासत्रातून पुढे आलेल्या सूचनेनुसार हे टिपण महाराष्ट्राच्या इतर भागांमधे, विभागवार होणाऱ्या कार्यशाळांसाठी आधारभूत टिपण वापरले जावे असे ठरले. सदर टिपण तयार करण्यासाठी पुणे येथील चर्चासत्रामध्ये एका मसुदा समितीची (Drafting Committee) नियुक्ती करण्यात आली होती.

यानंतर पुणे येथील चर्चासत्रामुळे सुरू झालेली विचारविनिमयाची प्रक्रिया अधिकाधिक संस्था, संघटना आणि आदिवासी समाजघटकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने महाराष्ट्रातील पुणे व कोकण वगळता इतर विभागांमध्ये सदर धोरणावर बैठका आयोजित करण्याचे ठरले. यानुसार उत्तर महाराष्ट्रामध्ये नासिक आणि नंदुरबार येथे ''आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटनेच्या'' वतीने विभागीय चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. याबरोबरच विदर्भामध्ये एकूण तीन ठिकाणी चर्चासत्रे आयोजित केली गेली. यापैकी नागपूर येथील चर्चासत्र 'खोज', 'अपेक्षा होमिओ सोसायटी' (अमरावती) आणि 'दिलासा', 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' (यवतमाळ), अवॉर्ड (चंद्रपूर) या संस्थांच्या पुढाकाराने आयोजित केले आणि कुरखेडा (गडचिरोली) येथे 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेच्या वतीने विभागीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. सदर सर्व चर्चासत्रांमध्ये मांडण्यात आलेल्या सूचनांचा या दस्तावेजामध्ये समावेश केला आहे. याशिवाय नागपूर येथे 'तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल सायन्स' च्या वतीने नागपूर येथे एक व श्री. नेताजी राजगडकर (माजी आमदार) यांच्या वतीने यवतमाळ येथे एक अशी दोन चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती.

केंद्र सरकारने प्रसृत केलेल्या नवीन राष्ट्रीय धोरणावर देशातील सर्व आदिवासी जनतेने विचारविनिमय करून आपली भूमिका मांडावी या उद्देशाने देशाच्या पातळीवरही एक चर्चेची प्रक्रिया

चालवली गेली. या प्रक्रियेचा एक भाग म्हणून अहमदाबाद येथे दि. ९ व १० सप्टेंबर २००४ रोजी घेण्यात आलेल्या मूळ २२, २३ आणि२४ सप्टेंबर २००४ रोजी भरलेल्या आदिवासी/निवासी जनतेच्या परिषदेमध्येही सदर भूमिका संक्षिप्तपणे मांडण्यात आली व या टिपणाचे वितरण उपस्थित प्रतिनिधींमध्ये करण्यात आले होते.

देशातील अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या ६७.८ लक्ष म्हणजेच देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८.०८% एवढी आहे. राज्य घटनेच्या ३४२ व्या कलमानुसार राष्ट्रपतींनी प्रमाणित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते. जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून घोषित करण्याआधी त्यांच्या काही गुणवैशिष्ट्यांचा विचार केला जाणे अपेक्षित आहे. जसे की, आदिमपणाची लक्षणे/मागासपणाच्या खुणा, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, बुजरेपणा, भौगोलिक वेगळेपणा आणि सामाजिक व आर्थिक मागासलेपण इ. ६१८पैकी ७५ अनुसूचित जमाती आदिम/पुरातन म्हणून ओळखल्या जातात.

सदर दस्तावेजाच्या पहिल्या दोन प्रकरणांमध्ये या संपूर्ण प्रक्रियेचे तपशील आणि आदिवासी धोरणावरील भूमिका मांडली आहे. टिपणाच्या तिसऱ्या भागामध्ये आदिवासी समाजसमुहांच्या सद्यस्थितीची कारणमीमांसा अतिशय संक्षिप्त स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सदर धोरणावरील आक्षेप व सूचना अधिक नेमकेपणाने समजून घेता याव्यात या उद्देशाने आदिवासींच्या विविधांगी खच्चीकरणाची प्रक्रिया मांडली आहे. टिपणाच्या चवथ्या भागात धोरणातील उणीवा व अस्पष्ट बाबींचा उल्लेख केला असून त्याबरोबरच आदिवासी समुदायांबाबत धोरण तयार करताना आधारभूत असावीत अशी सूत्रे सुचवलेली आहेत. याच भागामध्ये धोरणामध्ये समाविष्ट व्हाव्यात अशा सूचना मांडण्यात आल्या आहेत.

भाग २ : भूमिका

स्वातंत्र्यानंतर प्रथमच भारत सरकारने अनुसूचित जमातींसाठी खास धोरण ठरविण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. याचा अर्थ समजून घेण्यासाठी सर्वप्रथम काही गोष्टी स्पष्टपणे मांडल्या पाहिजेत.

एकतर आदिवासींसाठी जरी लिखित धोरण आजवर मांडले गेले नसले तरी त्यांची वसतिस्थाने, त्यांचा परिसर व पर्यावरण, त्यांचा जीवनाधार असलेली जल-जंगल-जमीन व इतर नैसर्गिक संसाधने यांची लूट करून, ती त्यांच्यापासून हिसकावून, त्यांना बेदखल करून, त्यांची निसर्गाशी तादात्म्य पावलेली वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती नष्ट करून त्यांचे खच्चीकरण करण्याचे अलिखित धोरण मात्र देशाच्या एकूण विकासासाठीच्या, शास्त्रशुद्ध पर्यावरण रक्षणाच्या लिखित धोरणांत सुरुवातीपासूनच अंतर्भूत होते.

दुसरे म्हणजे 'एक राष्ट्र-एक जन' या सूत्राच्या आधारे राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या मिषाने आदिवासींच्या 'जमात' या संकल्पनेला व त्याबरोबरीने त्यांची सांस्कृतिक ओळख व वैशिष्टयांना नाकारले गेले. परिणामी, त्यांची सांस्कृतिक वैशिष्ट्ये ही त्यांचे मागासलेपण बनले. या तथाकथित मागासलेपणाचा फायदा घेत आदिवासींचे संरक्षण करण्याच्या नावाखाली त्यांना

पोलिसी धोरणांतर्गत सरकारच्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. आदिवासी विकास खाते स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बरीच दशके गृहखात्याच्या अंतर्गत ठेवण्यात आले होते हा याचा ढळढळीत पुरावा आहे.

आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्याची प्रक्रिया जरी आता सुरू झाली तरी निदान गेले शतकभर तरी विविध भागातील निरनिराळे आदिवासी समूह त्यांच्या झगड्यातून व मागण्यांतून त्यांना काय हवे आहे, कसे जीवन जगायचे आहे हे सांगत आले आहेत. दुर्दैवाने प्रस्तुत राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यात त्यांचे प्रतिबिंब दिसून येत नाही. अर्थात् तसे ते दिसावे हा हेतूही शासनाचा नसावा. कदाचित आज प्रत्येकच क्षेत्राबाबत देशाचे सुस्पष्ट व लिखित धोरण असले पाहिजे या जागतिक बँकेच्या आग्रहाखातर ही प्रक्रिया सुरु केली असावी. किंवा तत्कालीन सरकारातील राजकीय पक्षाच्या एकूण राजकारणाला पूरक असे आदिवासी धोरण बनवून राजकीय फायदा उठवण्याचा हा प्रयत्नही असू शकतो. काहीही असले तरी या निमित्ताने बहुसंख्य आदिवासी समूहांना जे हवे आहे त्याचा समावेश या राष्ट्रीय धोरणात करण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे.

राज्यघटनेत अनेक कलमांच्या माध्यमातून अनुसूचित जमातींच्या सामाजिक-आर्थिक विकासाची तसेच सबलीकरणाची तरतूद केलेली आहे. पण या घटनात्मक तरतुदी प्रत्यक्षात येण्यासाठी मदत करू शकेल असे कोणतेही राष्ट्रीय धोरण अस्तित्वात नाही. १९५२ मधे विषद केलेल्या पाच मार्गदर्शक तत्त्वांनुसार (पंडित नेहरुंचे पंचशील) आदिवासींविषयक कामांचे प्रशासन चालवले जाणे अपेक्षित आहे. वास्तविक पाहता पंडित नेहरूंच्या ज्या पंचशीलाचा उल्लेख या मसुद्यात केला आहे त्याच पायावर या राष्ट्रीय धोरणाचा डोलारा उभारण्याची आवश्यकता आहे, कारण आदिवासींच्या जीवनाच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटकांना, म्हणजेच त्यांची संस्कृती, प्रतिभा, कौशल्ये, त्यांचे जंगल व जमिनीवरील अधिकार, त्यांचा स्वशासनाचा अधिकार या गोष्टींनाच पंचशीलामध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या नवीन आदिवासी धोरणातील बाबींचे स्पष्ट आकलन व्हावयाचे असेल तर आदिवासींच्या सद्यस्थितीतील समस्यांची कारणमीमांसा करणे उद्बोधक ठरेल.

भाग ३ : समस्यांची कारणमीमांसा: आदिवासींचे खच्चीकरण

सरकारने प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या एकूण तेरा प्रश्नांविषयी मांडणी केली आहे परंतु मसुद्यामध्ये तेरा प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाची सखोल कारणमीमांसा न करता त्या प्रत्येक प्रश्नावर वेगवेगळे उपाय सुचवले आहेत. परिणामी, मसुद्यातील धोरणामध्ये तुटकपणा, विखुरलेपणा आला आहे. अशा तुटक व विखुरलेपणामुळे आदिवासींच्या मूळ समस्यांना हात घालण्याची ताकद या धोरणामध्ये येत नाही. त्याचबरोबर बहुसंख्य आदिवासी स्वातंत्र्यानंतर पंचावन्न वर्षांनी आजही दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात, त्यांचा साक्षरता दर अतिशय कमी आहे, ते कुपोषण आणि रोगराईने ग्रस्त आहेत, ते विस्थापनाला बळी पडतात यासारख्या प्रश्नांची दखल राष्ट्रीय धोरण-मसुद्यात घेतलेली आहे. परंतु

पूर्वापार स्वयंपूर्ण, समृद्ध म्हणूनच सुखी जीवन जगणाऱ्या आदिवासींची आज ही दयनीय परिस्थिती कशी झाली याचे विश्लेषण या मसुद्यात नाही. त्यामुळे ज्या प्रक्रियेमुळे आदिवासी समूह विविधांगांनी (म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय) निर्बल बनले व त्यांचे खच्चीकरण झाले त्या खच्चीकरणाच्या प्रक्रियेची मीमांसा स्पष्टपणे मांडायला हवी. त्याशिवाय आदिवासींच्या आजच्या समस्यांच्या उपायांकडे जाता येणार नाही.

आर्थिक खच्चीकरण

१. गेल्या कित्येक शतकांपासून निसर्गाच्या सानिध्यात राहत असलेल्या आदिवासी समूहांनी निसर्गाची व मानवाची ताकद व कौशल्ये एकवटून एक समृद्ध जीवनाचा प्रवाह प्रस्थापित केला होता. निसर्गाप्रति माणसाच्या जबाबदाऱ्या आणि निसर्गावरील माणसाचे अधिकार यातील सुयोग्य संतुलन राखत परस्परावलंबी सहजीवन आदिवासी समूह पूर्वीपासून जगत होते. सकस चौरस अन्न, समृद्ध आरोग्य, शाश्वत उपजीविका, सहकारी जीवनशैली या सर्व देणग्या आदिवासींनी निसर्गाकडून मिळवल्या. म्हणून निसर्ग हे त्यांचे शक्तीस्थान आहे आणि नैसर्गिक संसाधने म्हणजेच जमीन, जंगल, पाणी इत्यादी त्यांच्या उपजीविकेची साधने होती आणि अद्यापही आहेत हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे.

२. सामाजिक निर्बंधांच्या अभावी व स्वार्थापोटी निसर्गाचे जास्तीत जास्त शोषण होण्याचा धोका ओळखून, जंगलांचा व इतर नैसर्गिक साधनांचा वापर जपून व आवश्यक तेवढाच व्हावा व त्यांच्या संवर्धनासाठीची कर्तव्येही पार पाडावी यासाठी आदिवासी जमातींनी काही नियम बनवलेले होते. त्यांतून निसर्गाची शाश्वतता टिकून होती. परंतु स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिशांनी व नंतर स्वतंत्र भारतातील टिंबर लॉबी, उद्योगपतींची व भांडवलदारांची लॉबी यांनी शासनव्यवस्थेशी संगनमत साधून जैवविविधतेने नटलेल्या आदिवासींच्या या समृद्ध जीवनधाराकडे लाकूड, कच्चा माल, खनिजे मिळवण्याचे ठिकाण मानून निसर्गाचे-जंगलांचे अमानुष शोषण केले, जंगले उजाड बनवली, आदिवासींच्या वहिवाटीच्या जमिनींवरून/वस्त्यांमधून त्यांना हुसकावून लावले. स्थानिक आदिवासींनी केलेले विरोध मोडून काढत जंगले व त्यापाठोपाठ तेथील रहिवासी यांना आपले गुलाम बनवले. त्यांनाच वेठीस धरून जंगले साफ केली, कुळे बनवून जमिनदारी केली आणि सावकारी करून त्यांना कर्जबाजारी बनवले.

३. पुढे आंतरराष्ट्रीय दबावामुळे वन संरक्षण व संवर्धनाच्या धोरणाच्या नावाखाली विविधतेने नटलेल्या जंगलांच्या जागी एकजातीय वृक्षांची नफेखोरीसाठी लागवड केली गेली. पर्यावरणाचा अर्थ म्हणजे फक्त वनसंपत्ती आणि वन्यजीव असे विद्वान पर्यावरणवाद्यांनी मानल्यामुळे मानवविरहित राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांचे पेव फुटले. यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळलाच परंतु अभयारण्यांसाठी आदिवासींना त्यांच्या पारंपरिक वसतिस्थानांमधून हुसकावून

विस्थापित केले गेले. आदिवासींच्या दुर्दैवाने त्यांचा भूभाग विकास प्रकल्पांसाठी (जसे बंधारे, विद्युतप्रकल्प यांसाठी) आदर्श असल्यामुळे देशभरातील विकासप्रकल्पामुळे झालेल्या विस्थापितांमध्ये ५०% आदिवासीच आहेत. या बरोबरच पुनर्वसन कायद्याच्या सदोष आणि अपुऱ्या अंमलबजावणीमुळे विस्थापितांच्या दुर्दशेमध्ये भरच पडत आहे.

४. अशाप्रकारे नैसर्गिक संसाधनांच्या लुटीमुळे व त्यांचा दर्जाही खालावल्यामुळे आदिवासींच्या उपजीविका नष्ट होत गेल्या. त्यांचे पारंपरिक व्यवसाय बुडाले. जंगलात राहण्याचा, तेथील जमिनींची मशागत करून पोट भरण्याचा, लहान-सहान वनोपज गोळा करून ते विकण्याचा, त्यांपासून पक्का माल करून तो विकण्याचा, इत्यादी सर्वच हक्क त्यांच्याकडून हिरावून घेतल्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली.

५. या प्रक्रियेला जोडूनच देशात सुरु असणाऱ्या आर्थिक सुधारणांचा (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) आदिवासींची उपजीविका आणि सर्वांगीण विकास यावर दूरगामी परिणाम होत आहे. या तीन धोरणांतर्गत आदिवासींच्या नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांना बाधा पोचवणारे अनेक कायदे व धोरणे अंमलात आणली जात आहेत. ह्या व्यापक धोरणांचा परिपाक म्हणून अधिकच गतिमान व अनिर्बंध होत असलेले औद्योगीकरण व त्याला जोडून होणारे प्रदूषण यामुळे आदिवासींच्या जगण्याचा मुख्य आधार असणाऱ्या नैसर्गिक संसाधनांची स्थिती खालावत चालली आहे. व्यापारासाठी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वैध आणि अवैध जंगलतोडीमुळे वनउपज व पाण्याची उपलब्धता कमी होत असून सिंचनासाठी आवश्यक असणाऱ्या व त्याबरोबरच पिण्याच्या पाण्याची कमतरता वाढते आहे. या सगळ्याचा दुष्परिणाम सर्वप्रथम आदिवासी लोकांच्या उपजीविकेवर होत आहे.

६. जागतिकीकरणाच्या व औद्योगीकरणाच्या रेट्यामुळे प्रत्येक क्षेत्राचे आधुनिकीकरण, विशेषतः यांत्रिकीकरण झाल्यामुळे त्या तांत्रिक कौशल्यात पारंगत नसलेल्या आदिवासींना त्यातील रोजगार संधी मिळत नाहीत. परिणामी रोजगारासाठी होणारे हंगामी व कायमचे स्थलांतर हा आदिवासींचा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थलांतरित मजुरांचे कामाच्या ठिकाणी होणारे शोषण आणि अपुरी मिळकत यामुळे आदिवासींच्या आरोग्याची स्थिती खालावत असून पुढील पिढीचे शिक्षण, शारीरिक आणि मानसिक क्षमता यावर प्रचंड वाईट परिणाम होत आहेत. याबरोबरीनेच आदिवासींच्या परंपरागत कौशल्यांना सध्याच्या आर्थिक व्यवस्थेत स्थान न राहिल्याने त्यांचे परंपरागत रोजगार आज नष्ट झाले आहेत. त्या परंपरागत रोजगारांचा आधार असणाऱ्या संसाधनांची मालकी आदिवासींकडून गैरआदिवासी समाज आणि ब्रिटिश शासनाने गेल्या शतकापासून हिसकावून घेतल्याने आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने याकडे संपूर्ण दुर्लक्ष केल्याने आदिवासींच्या आर्थिक खच्चीकरणाची प्रक्रिया

अधिकच वेगवान होते आहे. स्पर्धात्मकता, आक्रमकता या गुणांच्या अभावामुळे प्रचलित बाजारव्यवस्थेतही ते टिकू शकत नाहीत. मूळ वसतिस्थानातून, उपजीविकेपासून हुसकावून लावलेले आदिवासी समूह आज रोजगारासाठी दर दर भटकत मिळेल त्या मजुरीत पडेल ते काम करीत आहेत, वीटभट्ट्या, कोळसाखाणी, दगडखाणी यात बांधलेले मजूर म्हणून काम करीत आहेत.

सामाजिक खच्चीकरण

१. शिक्षण: कोणतेही शिक्षण हे व्यक्तीचे/समूहाचे/समाजाचे सबलीकरण करणारे असले पाहिजे. प्रचलित शिक्षणामुळे काही आदिवासींना मुख्य प्रवाहातील सर्वांत खालचे स्थान मिळाले तरीही प्रचलित शिक्षणाने पसरवलेली मूल्ये व्यापक स्तरावर पहाता आदिवासी समुहांची शक्ती खच्ची करणारीच ठरली. पारंपारिक भाषा, शारीरिक श्रम, निसर्गाशी समरूपता या मूल्यांना सध्याच्या शिक्षणव्यवस्थेने किंमत न दिल्यामुळे त्यांच्या जीवनाशी विसंगत अशा शिक्षणप्रक्रियेत बहुसंख्य आदिवासी सामीलच होऊ शकलेले नाहीत व आदिवासींना दिले जाणारे शिक्षण हे त्यांना उपजीविका मिळवण्यासाठी आज उपयोगी पडत नसल्याचेच चित्र आहे. सामाजिकच नव्हे तर आदिवासींचे आर्थिक आणि राजकीय सबलीकरण करण्यासाठी देखील औपचारिक शिक्षणाला अनौपचारिक शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे, परंतु, शासनाकडून अशा प्रकारचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. शिक्षणाच्या संख्यात्मक सार्वत्रीकरणाच्या अट्टाहासामुळे आदिवासी क्षेत्रात तिय्यम दर्जाचे औपचारिक शिक्षण दिले जाऊन समानतेच्या तत्त्वाला हरताळ फासला गेला आहे.

२. आरोग्यः निसर्गाच्या सानिध्यात राहून जंगलातून गोळा केलेले, शिकार केलेले आणि जमीन मशागत करून पिकवलेले पोटभर अन्न मिळवू शकणारे आदिवासी बेदखल झाल्यामुळे अर्धपोटी, प्रसंगी उपाशी राहत आहेत. नैसर्गिक, समतोल अशा वन्यभोजनावर आधारित सशक्त निरोगी जीवन जगणाऱ्या आदिवासींना नीरस, एकांगी, प्रदूषित व निकस अन्न-पाणी खावे लागत आहे. यातून उत्पन्न होणाऱ्या कुपोषण, बालमृत्यू, अशक्तपणा यासारख्या समस्यांबरोबरच मलेरिया, कावीळ यासारख्या गंभीर आजारांचे प्रमाण लक्षणीय आहे व त्यातून या व्याधींशी मुकाबला करण्यासाठी त्यांच्याकडे आर्थिक ताकद नाही. आदिवासींमधील कमालीचे दारिद्रय हे या स्थितीमागील मूलभूत कारण आहे. आदिवासींच्या पारंपारिक उपचारपद्धतींशी आधुनिक उपचारपद्धतींची सांगड घालण्यात सरकारला आलेले अपयश आणि आदिवासींमध्ये असणारा आरोग्याविषयीच्या जाणीवजागृतीचा व आरोग्यशिक्षणाचा अभाव ही यामागील प्रमुख कारणे आहेत. सरकारी पातळीवरील आरोग्य अधिकाऱ्यांची अनास्था हेही आदिवासींची आरोग्याची स्थिती न

सुधारण्यामागील प्रमुख कारण आहे.

३. सार्वजनिक सुविधा: वर विषद केलेल्या या संपूर्ण प्रक्रियेमुळे आदिवासींच्या मूळ जीवनपद्धतीमध्ये अनेक बदल झाले. त्यांची जीवनशैली, वसतीची ठिकाणे व पद्धती बदलल्या. त्यामुळे आदिवासी भूभागांमध्ये सार्वजानिक सुविधेचे प्रश्न निर्माण झाले. परंतु दळणवळणाच्या सोयी, पिण्याचे पाणी, सार्वजानिक स्वच्छता, वीजपुरवठा या बाबींच्या संदर्भात आदिवासी जीवनशैलीशी विसंगत उपाय अवलंबल्यामुळे अशा प्रकारचे शासकीय प्रयत्न यशस्वी झालेले दिसत नाहीत.

राजकीय खच्चीकरण

आदिवासींच्या दृष्टीने त्यांच्या विकासाची राजकीय बाजू खूप महत्वाची आहे. विकासाच्या कारभारामधील (Governance) सरकारची भूमिका व स्थान व त्याचबरोबरीने या कारभाराच्या प्रक्रियेतील आदिवासींची भूमिका व स्थान हे दोन अतिशय प्रभावशाली घटक आदिवासी समाजाच्या सध्याच्या राजकीय खच्चीकरणाला कारणीभूत ठरतात. या परिप्रेक्ष्यामधून सध्याच्या आदिवासींच्या स्थितीकडे पाहिल्यास आदिवासींसमोर पुढील अडचणी दिसतात.

१. पारंपारिक आदिवासी समूह मूलतः स्वयंशासित होते. पंडित नेहरूंनी सुचवल्याप्रमाणे त्यांच्या रूढ प्रशासन पद्धतीत कमीतकमी हस्तक्षेप करणे हे योग्य धोरण होते. परंतु स्वातंत्र्यानंतर पहिली ५० वर्षे आदिवासी समूह हे अविकसित, अनिर्बंध, असंस्कृत असून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे धोरण स्वीकारले गेले. आदिवासींसाठी अनोळखी असलेल्या 'राज्य' या संकल्पनेतील महसूल, वन, पोलीस व न्याय या यंत्रणांनी असा कारभार केला की ज्यामुळे राज्याची दहशत आदिवासींवर बसली व त्यांची स्वशासन पद्धती हळुहळु ऱ्हास पावत गेली. आता त्यांची स्वशासनाची यंत्रणाच उरलेली नाही. त्यामुळे स्वशासनाचा कायदा करून त्याचा अधिकार दिला तरी त्याचा वापर करणेच या समूहांपैकी बहुतांश गटांना शक्य होणार नाही. मूळात स्वशासनाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याने या कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रामाणिक प्रयत्नच होताना दिसत नाहीत.

२. सरकारी पातळीवरती आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना असल्या तरीही योजनांची आखणी, नियोजन व अंमलबजावणीमधे आदिवासींची भूमिका निश्चित नसल्यामुळे या प्रक्रियेमधे त्यांचा सहभाग व खरेखुरे प्रतिनिधित्व नसते. त्यामुळे विकासाच्या योजनांचा अतिशय नगण्य फायदा आदिवासींना होतो. गाव-पातळीवरील निर्णयप्रक्रियेत आदिवासींना ग्रामसभेद्वारे काही प्रमाणात स्थान मिळाले असले तरीही आदिवासींच्या वस्त्या मूळ गावात नसून गावालगतच्या वाड्या, पाडे, फलिया, टोला अशा स्वरुपात आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीमधील निर्णयप्रक्रियेमधून आदिवासी इतर समाजांच्या दबावाखाली बाहेर

फेकले जातात. परिणामी, ग्रामपंचायत स्तरावरील विकास योजना व इतर अधिकार यापासून आदिवासी समाज बव्हंशी वंचित राहतो.

३. विकासाच्या योजना अंमलात आणणे सोयीचे जावे यासाठी शासनाने आदिवासी बहुल भागात वेगळ्या प्रशासकीय हद्दींची (अनुसूचित क्षेत्रे) रचना केली. परंतू स्थलांतराच्या प्रश्नामुळे इतर भागांमधे मोठ्या प्रमाणावर विखुरलेले आदिवासी अनुसूचित क्षेत्रामधे दिल्या जाणाऱ्या विकासाच्या फायद्यांपासून संपूर्णत: वंचित राहिल्याचे आढळते.

४. गरीबी रेषेचे सर्वेक्षण, जनगणना किंवा इतर अशा महत्वाच्या सर्वेक्षणाच्या पद्धती व वेळा आदिवासींच्या जीवनशैलीशी जुळवून घेतल्या जात नाहीत. उदा. आदिवासी काही हंगामामधे स्थलांतरित झालेले असतात तेव्हा गरीबीरेषा ठरवण्याकरिता सर्वेक्षण होते. अशा सर्वेक्षणात संपूर्ण आदिवासी समूहांचा समावेश होत नाही. मात्र गरीबीरेषेच्या आधारावर अनेक विकासयोजना निश्चित केल्या जातात. त्यामुळे अनेक आदिवासी विकास योजनांपासून वंचित राहतात. त्याचप्रमाणे आदिवासी समाजास आरक्षण असल्याने मिळणारे फायदे मिळवण्यासाठी इतर समाजातील लोकांनी बोगस आदिवासी प्रमाणपत्र मिळवल्याने आदिवासींवर अन्याय होत आहे.

सांस्कृतिक खच्चीकरण

१. मुख्य प्रवाहामधे आदिवासींचे सामिलीकरण केले जावे असा दृष्टिकोन घेणे योग्य नाही. भारतीय समाज हा वैविध्यपूर्ण (प्लुरल) आहे. यातील अनेक समाजप्रवाहांपैकी आदिवासी समाज व संस्कृतीचे स्वतंत्र प्रवाह असून त्यांना तशी मान्यता देणे आवश्यक होते. परंतु तसे न होता आदिवासींची संस्कृती, भाषा, वेशभूषा, धार्मिक श्रद्धा, नीती-अनीतीच्या कल्पना, नातेसंबंधांच्या रूढी या मागास असून त्यात सुधारणा करण्याची गरज आहे असे मानून या सुधारणा मुख्य प्रवाहाच्या संस्कृतीनुरूप केल्या पाहिजेत असे धोरण ठेवले गेले. आदिवासी समूहांच्या निसर्गाशी समरूप जगण्याच्या पद्धतीतून त्यांच्या श्रद्धा, मूल्ये आणि संस्कृती समृद्ध झालेली होती, ती संस्कृती त्यांना निसर्गापासून तोडून नष्ट केली गेली.

२. समाजातील आर्थिक-राजकीयदृष्टया ताकदवान समाजांच्या संस्कृतीपेक्षा आदिवासी समाजांची संस्कृती दुर्बल अथवा सदोष नसून उलट त्यात अनेक उन्नत घटक आहेत. मात्र आर्थिक -राजकीय खच्चीकरणामुळे आदिवासी संस्कृतीला ह्या समाजांनी बाजूला टाकून दिले आहे. त्या अर्थाने त्यांचे सीमांतीकरण (marginalization) करण्यात आले आहे. विविध कारणांनी व विविध मार्गांनी वर उल्लेखलेल्या ताकदवान समाजांच्या संस्कृतींचा आदिवासी संस्कृतीवर अनेक अंगांनी प्रभाव पडतो आहे. आदिवासी समाजातील पारंपारिक ज्ञान, समानतेची मूल्ये, त्यांच्या नीती-

अनीतीच्या कल्पना या सगळ्या बाबी बदलत्या परिस्थितीमध्ये लोप पावत चालल्या आहेत. आदिवासी भाषेतील शब्दसंपदा आणि प्रत्यक्ष बोलीभाषा यावरही याचा दुष्परिणाम होतो आहे. गैरआदिवासी समाजांकडून आदिवासींचे पूर्वीपासून होत असलेले शोषण, पिळवणूक याचाही आदिवासी संस्कृतीवर विपरित परिणाम झाल्याचे आढळते.

भाग ४ : मसुद्यात असणाऱ्या उणीवा आणि मसुद्यातील मुद्यांवरील स्पष्टीकरणे

आदिवासी समाजांसमोरील दारिद्रय, कुपोषण यासारख्या समस्या व इतर प्रश्नांच्या गाभ्याशी आदिवासी समाजाची विविधांगी खच्चीकरण आहे हे आपण पाहिले. आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीच्या प्रयत्नाद्वारे ह्या गाभ्याच्या समस्येचा बिमोड करून आदिवासी समाजाचे विविधांगी सबलीकरण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पाहता,कोणत्याही सरकारच्या आदिवासी धोरणाच्या गाभ्याशी आदिवासी समाजाचे सबलीकरण असे स्पष्ट व नेमके उद्दिष्ट असायला हवे. अशा गाभ्याच्या, स्पष्ट व नेमक्या उद्दिष्टांचा अभाव हा केंद्र सरकारने मांडलेल्या आदिवासी धोरणाच्या मसुद्यामधील प्रमुख दोष आहे व तो दूर करणे ही ह्या मसुद्यातील सुधारणेची पहिली पायरी ठरेल. टिपणाच्या या भागात महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या चर्चासत्रातून पुढे आलेल्या विविध सूचना व प्रतिक्रिया तीन उपविभागांमध्ये मांडल्या आहेत.

उणीवा व स्पष्टीकरणे

- नैसर्गिक संसाधने जसे की जमीन, जंगल, पाणी व खनिजसंपत्ती यावर आदिवासी समूहांना हक्क देण्याविषयी व ते हक्क कोणत्या, किती प्रमाणात व कसे देणार याविषयी केंद्रसरकारच्या राष्ट्रीय धोरणात उल्लेख आढळत नाही.
- आदिवासी समूहांची सद्यस्थिती आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्या या परिस्थितीमागील सखोल कारणमीमांसा धोरणामध्ये आढळत नाही. ही आदिवासींची परिस्थिती कालपरत्वे आली आहे असे मानून या निर्बल परिस्थितीमागील शोषण आणि अन्यायावर आधारित असणाऱ्या आदिवासींच्या खच्चीकरणाच्या प्रक्रियेकडे या धोरणाने संपूर्ण दुर्लक्ष केले आहे. देशभरात स्वातंत्र्यपूर्व काळात घडलेल्या व स्वातंत्र्योत्तर काळात घडत असणाऱ्या विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय, व सांस्कृतिक प्रक्रियांमुळे आदिवासींच्या खच्चीकरणाची प्रक्रिया घडली आहे हे वास्तव सदर धोरणाने संपूर्णपणे नाकारल्याचे दिसते.
- विविध राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या आदिवासी क्षेत्रांचा व समूहांचा अनुसूचित क्षेत्रांच्या यादीमध्ये समावेश न केल्याने सरकारच्या कल्याणकारी कायदे व उपक्रमांपासून आदिवासी जनतेस वंचित रहावे लागते आहे. याबाबत राष्ट्रीय धोरणामध्ये उल्लेख आढळत नाही.
- स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने स्वीकारलेल्या अलिखित धोरणाचा परिपाक म्हणून

गैरआदिवासी समाजाचे आदिवासी भागामध्ये स्थलांतर (transmigration) झाले व याचा परिणाम म्हणून आदिवासी समूह अल्पसंख्यांक बनले आहेत.

- भौगोलिक व सामाजिक दृष्ट्या सलग व संलग्न असणाऱ्या आदिवासी-बहुल भागांचे सर्वार्थाने अनैसर्गिक व राज्यकर्त्यांच्या सोयीच्या असणाऱ्या प्रशासकीय एककांमध्ये (जसे की राज्य, जिल्हा, तालुका इ.) विभाजन करण्यात आले. या जाणीवपूर्वक केलेल्या विभाजनामुळे आदिवासी समूह वेगवेगळ्या प्रशासकीय एककांमध्ये विभागले जाऊन ते परिघावर फेकले गेले व त्यांची ताकद आणखीनच क्षीण झाली.
- आदिवासींचे पारंपारिक कायदे व न्यायपद्धती नष्ट करण्यात आल्या व त्यांच्याजागी 'प्रतिद्वंद्वातून न्याय' या संकल्पनेवर आधारितअसणाऱ्या परक्या न्यायपद्धती व त्यावर आधारित कायदे आदिवासींवर लादण्यात आले. परिणामी, आदिवासींना वैयक्तिक व सामूहिक दोन्ही स्तरांवर न्याय नाकारला गेला. प्रस्तावित आदिवासी धोरणाने या वास्तवाची कुठेही दखल घेतलेली नाही.
- या मसुद्यात आदिवासी समुहांना देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याबाबत काही सूचना आढळतात. परंतु मुख्य प्रवाह कशाच्या आधारे ठरवायचा? मुख्य प्रवाहात आदिवासींना सामील करायचे म्हणजे नेमके काय अभिप्रेत आहे? यासारख्या प्रश्नांवर काहीही स्पष्टीकरण आढळत नाही. एका बाजूने मुख्य प्रवाहात आदिवासींचे सामीलीकरण करणे व दुसऱ्या बाजूने त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जपणे ही दोन्ही परस्परविरोधी उद्दिष्टे एकाचवेळी कशी साध्य करणार याविषयी मसुद्यामधे स्पष्टता नाही.
- मसुद्यात राजकीय अंगाचा समावेशच नाही. अनुसूचित जमातींच्या सर्वांगीण विकासात राजकीय संघटन, राजकीय सहभाग आणि एकूणच राजकीय सबलीकरणाचे स्थान काय असेल यावर काहीही भाष्य केलेले नाही.
- मसुद्यामधे दारिद्र्याचे प्राथमिक आणि मर्यादित आकलन गृहित धरलेले आहे. दारिद्र्याचे विविध आयाम (जसे की सत्ताहीनता, वंचितता, अभावग्रस्तता, निराधारता, इ.) तसेच दारिद्र्यामागील सामाजिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक इ. बिगर-आर्थिक घटकांची दखल घेतलेली नाही. त्याचप्रमाणे संपूर्ण मसुद्यामधे आदिवासींच्या आधी उल्लेखलेल्या समस्यांचे विश्लेषण मांडण्यात आलेले नाही.
- आदिवासी विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या अनेक मुद्यांवर सदर मसुद्यात पुरेसा भर दिलेला नाही: ते असे, (१) शेती, (२) जंगल, (३) अन्न सुरक्षा, व उपजीविका सुरक्षा (४) आदिवासी स्वशासन कायदा – पेसा, (५) आदिवासी आरक्षण धोरण, (६) स्त्री हक्क संरक्षण व विकास आणि (७) दारिद्र्य रेषा निश्चितीची प्रक्रिया व त्यातील आदिवासींचा सहभाग.
- या धोरण मसुद्याच्या आधी अनेक समित्या, आयोग, तज्ञगट यांनी आदिवासींच्या गुंतागुंतींच्या समस्यांवर सविस्तर खल करून विविध उपाययोजना सुचविल्या आहेत. ह्या

साऱ्या प्रयत्नांची दखल घेऊन या उपाययोजना नव्या धोरणामध्ये समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न झालेला नाही.

- आदिवासी स्वशासन (पेसा) कायद्याकडे या धोरणामध्ये संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आहे. परिणामी, स्वत:चे अस्तित्व टिकवून धरणे व आपल्या जगण्यावर स्वत:चे नियंत्रण ठेवणे यासाठी या कायद्याने आदिवासींना दिलेल्या संधी या नव्या धोरणामुळे हिरावून घेतल्या जातील.
- मसुद्यातील मांडणीमधे संदर्भ-विशिष्टतेकडे (context specificity) संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. भारतातील विविध ठिकाणी असणाऱ्या आदिवासी जमातींची भौतिक, प्राकृतिक, सामाजिक-सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती अतिशय भिन्न आहे आणि स्थानिक संदर्भातील या वैविध्यांमुळे आदिवासींचे प्रश्न गुंतागुंतीचे बनलेले आहेत. आदिवासींचा सर्वांगीण विकास घडवताना ही परिस्थिती कशी हाताळणार याबाबत काहीही उल्लेख नाही.
- सध्या भारतामधे राबवले जात असणारे विकासाचे प्रतिमान (model) आणि मसुद्यात ज्याविषयी मांडणी केली आहे त्या आदिवासींपुढील गंभीर समस्या यांचा एकमेकांशी काय संबंध आहे याबद्दल मसुद्यात स्पष्टीकरण नाही. आर्थिक सुधारणांच्या अनुषंगाने सध्याचे विकासाचे अग्रक्रम कायम ठेवून आदिवासींच्या विकासामधील समस्यांचे निराकरण करणे कसे शक्य आहे? सध्याच्या या प्रस्थापित विकासाच्या प्रतिमानाचा आदिवासींच्या विकासावर विपरित परिणाम होत आहे. परंतु याविषयी मसुद्यात काही विश्लेषण आढळत नाही.
- या मसुद्यात आदिवासींच्या उपजीविकेची सध्याची परिस्थिती काय आहे, आणि त्यांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारने कुठली धोरणात्मक पावले उचलायला हवीत याबाबत कुठलीच मांडणी केलेली आढळत नाही. आदिवासींना उपजीविका मिळवण्यासाठी कुठले आर्थिक उपक्रम (economic activities for livelihoods) उपलब्ध होतील अथवा तशा संधी निर्माण करता येतील यादृष्टीने सरकारच्या मसुद्यामध्ये कुठलीच मांडणी केलेली दिसत नाही. सदर मसुद्यात आदिवासी विकासाच्या आर्थिक अंगाकडे जवळजवळ संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. परिणामी सध्याच्या विकासप्रक्रियेत आदिवासींना सामील करून घेतले की सारे प्रश्न सुटतील असे भाबडे गृहितक मसुद्याच्या गाभ्यामध्ये मानले गेले आहे. सध्याच्या विकास प्रक्रियेमुळे आदिवासींचा झालेला विध्वंस पाहता तसेच त्या प्रक्रियेमध्ये पुढारलेल्या समाज घटकांना स्थान मिळणे कठीण होत चालले आहे हे वास्तव लक्षात घेता मसुद्यातील विकासविषयक गाभ्याच्या या गृहितकामागील फोलपणा स्पष्ट होतो. अशा परिस्थितीत या मसुद्यामध्ये आदिवासींच्या विकासाविषयी कोणतीच उपयुक्त मांडणी नाही असे म्हणावे लागते.
- मसुद्यामधे आदिवासींचे पारंपारिक ज्ञान तसेच बौद्धिक संपदेवरील अधिकार (intellectual property rights) याबाबत उल्लेख आढळतो.

परंतु सद्यपरिस्थिती लक्षात घेता आदिवासींमधील ज्ञान आणि माहिती जतन करणाऱ्या पारंपारिक संस्था बदलत्या समाजव्यवस्थेमधे विस्कळित होत आहेत. त्यामुळे बौद्धिक संपदेवरील अधिकार कुणाला व कसे देणार याचे स्पष्टीकरण मसुद्यामधे अभिप्रेत आहे.

- 'ट्रायबल' या शब्दाची व्याख्या मसुद्यामधे केलेली नाही. तसेच, इंग्रजी भाषेच्या व्याकरणाच्या संदर्भात या शब्दाकडे पाहिल्यास असे दिसते की 'ट्रायबल', हे 'नाम' नसून 'विशेषण' आहे. त्यामुळे ट्रायबल हा शब्द वापरायचा असेल तर 'ट्रायबल पीपल' किंवा 'ट्रायबल कम्युनिटी' असा वापरायला हवा. मात्र या शब्दाचा नाम असल्याप्रमाणे संबोधनपर उपयोग मसुद्यात केला आहे, (उदा. पॉलिसी ऑन ट्रायबल्स). यामुळे जी संदिग्धता निर्माण झाली आहे ती स्पष्ट होणे आवश्यक वाटते. त्याबरोबरच ट्रायबल या शब्दामधे एक मानहानीकारक (derogatory) अर्थ आहे. या मुळेही हा शब्दाचा वापर अयोग्य वाटतो. आदिवासी समाजास योग्य संबोधन देण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने 'इंडिजनस पीपल' असा शब्द वापरला आहे. या किंवा यासारख्या निसंदिग्ध शब्दाचाही या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या ज्या आदिवासी जमातींची मूळ संस्कृती अजून बऱ्याच अंशी टिकून आहे अशा काही आदिवासी जमातींचा उल्लेख करताना 'आदिम जमाती' (Premitive Tribal Groups) असा शब्द वापरला जातो. हा शब्द वापरण्याऐवजी 'अतीव निर्बल जाती' (Vulnerable Group) असा शब्द वापरावा.

भाग ५ : मसुद्यात समाविष्ट व्हावीत अशी व्यापक मार्गदर्शक धोरणसूत्रे (Policy Guidelines)

महाराष्ट्रात विविध ठिकाणी, आदिवासी कार्यकर्ते व संबंधित इतर संघटनांनी आयोजित केलेल्या चर्चांमधून प्रस्तावित आदिवासी धोरणामध्ये समाविष्ट करण्याकरिता विविध धोरणसूत्रे व विशिष्ट सूचना पुढे आल्या. विशेषत: आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक खच्चीकरणावर उपाय म्हणून आखावयाच्या धोरणाबाबत ही मार्गदर्शक सूत्रे मांडण्यात आली. या विषयवार धोरणसूत्रांची चर्चा करण्याआधी मसुद्यामधे व्यापक दृष्टीने महत्त्वाची असणारी सर्वसाधारण धोरणसूत्रे मांडणे आवश्यक आहे. त्यांचा उल्लेख येथे केला आहे.

याआधी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हा वैविध्यपूर्ण (Plural) आहे. त्यात अनेक समाजप्रवाह आहेत. त्यामधील एक समाजप्रवाह आदिवासींचा आहे. या विविध प्रवाहांपैकी काही प्रवाह आर्थिक व राजकीयदृष्टया सबल आहेत. मात्र त्या सबलतेमागे अनेक आक्षेपार्ह व अवांछनीय बाबी लपल्या आहेत. आदिवासींचा समाजप्रवाह आज विविधांगी खच्चीकरणाचा शिकार झाला असला तरीही आदिवासी समाजाकडे आज अनेक चांगल्या गोष्टी आहेत. त्यांचा स्वीकार इतरांनी करायला हवा. याबरोबरच स्वत:ची विविधांगी दुर्बलता नष्ट करण्यासाठी आदिवासी समाजानेही इतरांकडून अनेक चांगल्या गोष्टी स्वीकारायला हव्यात. तेव्हा याबाबतीत

असे म्हणता येईल की या पार्श्वभूमीवर आता मुख्य प्रवाह व त्यामध्ये आदिवासींचे सामिलीकरण या संकल्पना आता रद्दबदल केल्या जाव्यात. त्याऐवजी असे म्हणता येईल की, आधुनिक भारतातील इतर अनेक समाजप्रवाहांबरोबर बरोबरीच्या नात्याने आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत देवाणघेवाण करता यावी यासाठी आदिवासी समाजाचे सबलीकरण होणे आवश्यक आहे.

यापूर्वी केलेल्या मीमांसेप्रमाणे आदिवासींकडून त्यांची नैसर्गिक संसाधने हिरावून घेतल्यामुळे पारंपारिक वसतीस्थाने उजाडल्यामुळे, त्यांचे आपल्या मूळ उपजीविकांपासून विस्थापन झाल्यामुळे, स्वशासनाचा त्यांचा अधिकार नाकारल्यामुळे, आणि त्यांची संस्कृती, कौशल्ये, कला व श्रद्धा यांना हीन दर्जा दिल्यामुळे आदिवासी समाजाच्या खच्चीकरणाची प्रक्रिया झाल्याचे लक्षात येते. त्यामुळे आदिवासींचे सर्वांगांनी पुन:सबलीकरण करणे हे धोरण अवलंबले पाहिजे. अशा सर्वांगीण सबलीकरणासाठी जे धोरण आखावयाचे त्यामागील प्रमुख मार्गदर्शक सूत्रे खालीलप्रमाणे असतील.

- आदिवासींचे विस्थापन संपूर्णपणे ताबडतोब थांबवावे.
- त्यांची वसतीस्थाने, नैसर्गिक संसाधने, पारंपारिक उपजीविकांच्या साधनांवरील त्यांचा अधिकार पुनर्स्थापित करावा.
- निरनिराळ्या गोष्टींमुळे आदिवासी भागातील दर्जा खालावलेल्या नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन करणे व त्यांना संरक्षण देणे
- या संपूर्ण प्रक्रियेत आदिवासी समूहांना केंद्रस्थानी ठेवणे, त्यांना सन्मानाचे व जबाबदारीचे स्थान देणे.
- आदिवासींची जीवनपद्धती, संस्कृती, कला-कौशल्ये ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत, आणि एकंदर मानवजातीच्या व निसर्गाच्या परस्परावलंबी शाश्वत विकासाला पोषक आहेत याचे भान मुख्य प्रवाहाच्या संस्कृतीला करून देणे.
- आदिवासी समाजाच्या जीवनाशी संबंधित वेगवेगळ्या अंगांचा एकत्रितपणे विचार करून समग्र दृष्टिकोन घेऊन धोरणात विवेचन केले जावे.
- आदिवासींच्या समोरील समस्यांवर उपाय म्हणून आदिवासींचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सबलीकरण करणे हे धोरणाचे सर्वसाधारण उद्दिष्ट ठरल्यावर त्याला अनुरूप अशा नवीन कायदेशीर तरतुदी व जुन्या कायदयांमधे दुरुस्त्या कराव्यात व त्या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी केली जावी.
- देशभरच्या आदिवासींच्या जीवनातील संदर्भविशिष्टतेकडे म्हणजेच त्यातील भौतिक, प्राकृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक व सांस्कृतिक विविधतेकडे पुरेसे लक्ष देऊन विकासाची धोरणसूत्रे ठरवली जावीत.
- आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे विस्थापन होऊ नये हा देखील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील नियोजनाचा गाभा असायला हवा. रोजगाराच्या शोधात स्थलांतर, पाणी प्रदूषण, शहरीकरण, औद्योगीकरण या मार्गांनी होणारे आदिवासींच्या उपजीविकेचे अप्रत्यक्ष विस्थापन टाळणारे विकासाचे धोरण असायला हवे.
- आदिवासींना मान्य असा पुनर्वसन कार्यक्रम

आदिवासींच्या देखरेखीखाली समाधानकारक रित्या अंमलात आणल्या-शिवाय त्यांचे विस्थापन केले जाऊ नये.

- आदिवासी हित जोपासणारे कायदे उदा. जमीन हस्तांतर प्रतिबंधक कायदा, आदिवासी स्वशासन कायदा, अन्याय प्रतिबंधक कायदा इ. कायद्यामुळे मिळणाऱ्या अधिकारांपासून व इतर फायद्यांपासून आदिवासीं समाजाला वंचित ठेवू नये, याकरिता संबंधित अधिकाऱ्यांनी या तरतुदींचे कठोर पालन करावे.
- आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागात, जिथे आदिवासी विखुरलेले व अल्पसंख्यांक आहेत, त्यांच्या जीविकेच्या संरक्षणासाठी विशेष विकास योजना आखण्यात याव्यात व केंद्र सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करावा.
- सरकारी पातळीवर धोरणे, कार्यक्रम व योजना तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये तसेच योजनांची आखणी, नियोजन, व अंमलबजावणी करताना 'सहभागिता', 'पारदर्शकता' आणि 'जबाबदेयता' (उत्तरदायित्व) या तत्त्वांचे पालन करण्याबाबतच्या स्पष्ट सूचना असाव्यात.
- प्रस्तावित धोरणामध्ये अनुसूचित जमातींच्या विकास प्रयत्नांमध्ये ज्या संस्था-व्यक्ती (stakeholdrs) यांचा सहभाग आहे त्या सर्वांच्या कामांचे निश्चित स्वरूप व त्यांच्यावरील जबाबदाऱ्या याची स्पष्टता करणे गरजेचे आहे.
- धोरणात्मक मसुद्यामधे भारतातील अनुसूचित जमातींना सुरक्षित, शाश्वत आणि समृद्ध जीविका मिळवून देणे हे या धोरणातील गाभ्याचे अर्थिक उद्दिष्ट आहे अशा तऱ्हेचा स्पष्ट उल्लेख असायला हवा. आदिवासी क्षेत्राचे नियोजन करताना आदिवासींची समृद्ध जीविका हे उद्दिष्ट केंद्रीभूत ठेवून उपजीविकेचे दोन मुख्य आधार: नैसर्गिक संसाधने व श्रमाचा वापर यांना पुरेसे संरक्षण देण्यात यावे. त्यासाठी, नैसर्गिक संसाधने म्हणजे जमीन, जंगल, पाणी, मासे, वन्य प्राणी, खनिजसंपत्ती यावर स्थानिक गावसमूहांचा सामूहिक अधिकार निश्चित व संरक्षित करण्यात यावा. पर्यावरण आणि वन्य जीवांचे संतुलन राखण्याची गरज व पूर्वअटींसह हे अधिकार व जबाबदाऱ्या निश्चित व संरक्षित करण्यात याव्यात.
- प्रशासनाच्या कारभाराची निर्णय प्रक्रिया स्थानिक पातळीवर होणे आवश्यक आहे. यासाठी लोकांच्या सहभागास अधिकाधिक महत्व द्यावे. सामान्य लोकांना समजून घेऊन आणि त्यांच्या विचारांना प्राधान्य देऊन स्थानिक पातळीवर निर्णय घेतले जावेत आणि त्याप्रमाणे कृतीचे नियोजन व्हावे. नियोजनामध्ये आदिवासी जनांना प्रतिनिधित्व असायला हवे.

भाग ६ : धोरणविषयक विषयवार सूचना

या भागात महाराष्ट्रामधील विविध ठिकाणच्या चर्चेमधून पुढे आलेली विषयवार धोरणसूत्रे, धोरणे व कार्यक्रमाबाबतच्या तपशीलवार सूचना, व मसुद्यातील विवरणाच्या संदर्भातील सूचना यांची विषयवार मांडणी केली आहे. या सूचनांचे मसुद्यातील दुसऱ्या प्रकरणामधील रचनेप्रमाणे मांडल्यानुसार अनुक्रमे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक

या चार भागांमधे वर्गीकरण केले आहे.

आर्थिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येण्याऱ्या सूचना

१) नैसर्गिक संसाधने:

१-अ) जमीन:

आदिवासींचा जमिनीवरील हक्क कायद्याद्वारे व कागदोपत्री अबाधित रहावा. यासाठी खालील बाबी करणे आवश्यक आहे.

- जमीन हस्तांतरण: आदिवासी जमिनीचे गैरआदिवासींकडे कुठल्याही मार्गाने हस्तांतरण होऊ देऊ नये. जमिनीच्या हस्तांतरणाच्या सर्व मार्गांवर (खंड, करार, विक्री, बक्षिसपात्र इ.) कायद्याद्वारे प्रतिबंध करावा. जमीन सार्वजानिक अथवा इतर संस्थेच्या किंवा ट्रस्टच्या अखत्यारित हस्तांतरित होत असल्यास मालकी अथवा कराराने घेणाऱ्या संस्था किंवा ट्रस्टचे ८०% सदस्य आदिवासी असावेत व ट्रस्टमधील आदिवासींची सदस्य संख्या नंतरही कायम रहावी. त्यापुढील हस्तांतरण अशाच ट्रस्टकडे अथवा आदिवासी व्यक्तीकडे व्हावे.
- पूर्वी हिरावल्या गेलेल्या जमिनींवर आदिवासींच्या हक्कांची पुनर्प्रस्थापना व्हावी. ज्यांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या आहेत त्यांच्यावर नुकसानभरपाई म्हणून कर लावला जावा व ह्या करातून मिळणारा पैसा आदिवासींच्या विकास कामांसाठी वापरावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये जमीन खरेदी करण्याचा अधिकार केवळ आदिवासी समाजालाच असावा. कोणत्याही गैरआदिवासी समाजाला आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये जमीनीची खरेदी करण्याची परवानगी कायदाने नाकारण्यात यावी.
- जमिनीविषयीची प्रलंबित प्रकरणे: सरकारने जमिनीविषयक सर्व प्रकरणे कागदपत्राअभावी अवैध न ठरवता निकाली काढावीत. यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या जमिनींचे प्रश्न मोडतात. जसे की, दळी, एकसाली, कूळ कायद्याद्वारे मिळणारी, वनअतिक्रमित, महसूल अतिक्रमित जमिनी, कमाल जमीन धारणा (सिलिंग) कायद्याखालील जमिनी, गायरान जमिनी व इतर अशा स्थानिक जमिनींची सर्व प्रकरणे व नोंदी पूर्ण करून अशी सर्व प्रकरणे निकाली काढावीत. हे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी व यासाठी योग्य त्या तरतुदी करून कायद्याने संरक्षण मिळावे.
- जमिनींच्या नोंदी: आदिवासींच्या जमिनीसंदर्भातील सर्व अव्यवस्थित आणि अपूर्ण असलेल्या नोंदी विशिष्ट कालावधीत पूर्ण कराव्यात व आदिवासींचा जमिनीवरील अधिकार कागदोपत्री सिद्ध करावा. नोंदी व पुराव्याअभावी नोंदी पूर्ण करण्यास अडचणी येत असल्यास अशा ठिकाणी गावसमाजाने दिलेला मौखिक पुरावा ग्राह्य मानण्यात यावा.
- किमान जमीन धारणा: कुठलाही आदिवासी भूमिहीन राहाता कामा नये. किमान ५ एकर कोरडवाहू अथवा २.५ एकर सिंचित जमीन प्रत्येक आदिवासी कुटुंबाकडे असणे आवश्यक

आहे. ज्या आदिवासी कुटुंबांकडे किमान जमीन नसेल त्यांना जमीन उपलब्ध करून दिली जावी. जमीन उत्पादक नसल्यास अशा जमिनीची सुधारणा करण्याचा अधिकार कायद्यामधे असावा. यासाठी शासकीय योजनेद्वारे आर्थिक पाठबळ मिळावे. फिरत्या शेतीवर प्रतिबंध लावण्याआधी सरकारने आदिवासी कुटुंबांना कायमस्वरूपी जमिनी द्याव्यात. याकरिता कृषियोग्य जमिनींचे पुनर्वाटप करण्यात यावे.

- भू संपादन: कुठल्याही विकास प्रकल्पासाठी आदिवासींची जमीन संपादित करण्यात येऊ नये. यापूर्वी केंद्र व राज्य शासनाने विविध विकास प्रकल्पांकरिता संपादित केलेल्या आदिवासी समाजाच्या जमिनी, जर प्रकल्प जर रद्द झाले असतील अथवा अपूर्णावस्थेत सोडून देण्यात आले असतील तर आदिवासींना परत करण्यात याव्यात. याबाबत आदिवासींना नुकसानभरपाई देण्यात यावी.
- शेती तंत्रज्ञान: शेतीच्या टिकाऊ पद्धतींना प्राधान्य द्यावे व त्यासाठी पारंपारिक तंत्रज्ञान जोपासून त्याला पूरक ठरेल असे आवश्यक ते नवीन तंत्रज्ञान पोचवण्याचे कार्यक्रम आखावेत व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या तरतुदी करण्यात याव्यात.
- मूळ धोरणविषयक मसुद्यामधील सूचना (संदर्भ: जमिनीशी फारकत–मुद्दा क्र. १, २, ३, ४, ५ व ६) अंमलात आणण्याकरिता ग्रामपंचायत कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल, ती करावी.
- जमीन हस्तांतरण कायद्यातील अवैध हस्तांतरण कायद्याची (कलम. ३५/७४) मुदत संपून गेली आहे ती वाढवून मिळावी. तशी कायद्यात दुरुस्ती व्हावी.
- आदिवासींमधे जमीन हक्काबाबत जाणीव-जागृती वाढवण्यासाठी व जमीनविषयक कायद्यांमधील तरतूदी लोकांपर्यंत पोचवण्यासाठी त्याचा प्रसार सरकारने योग्य त्या सरकारी/गैरसरकारी प्रसार माध्यमातून करावा.

१–ब) वने:

- वनग्रामे (Forest Villages) ही महसूल ग्रामे (Revenue Villages) म्हणून जाहीर करण्यात यावीत.
- वनक्षेत्रामधील अतिक्रमित जमिनी आदिवासींच्या नावावर व्हाव्यात व त्याकरिता तसा नियम/कायदा करण्यात यावा. संयुक्त वन व्यवस्थापनाचे (सं.व.व्य.) प्रकल्प आणि वन अतिक्रमणे कायद्याने आदिवासींच्या नावावर होण्याची प्रक्रिया म्हणजेच संयुक्त वन व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवण्याची प्रक्रिया आणि वनक्षेत्रातील शेतजमिनी/लागवडीखालील आदिवासींच्या जमिनी नियमानुकूल करण्याची प्रक्रिया एकाच वेळी व्हावी. यामुळे आदिवासींचा सहभाग सं.व.व्य. मधे मिळू शकेल.
- ग्रामवन कायदा १९२७ या कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. विदर्भात असलेल्या पाच जिल्ह्यांमध्ये निस्तार हक्कांची

अंमलबजावणी करण्यात यावी.

- जंगल उत्पादनावर अधिकार मिळण्यासाठी योग्य त्या तरतूदी कराव्यात. याबरोबरच वनोपज व वन्य उत्पादनांवर गावसमुहाचा सामूहिक अधिकार संरक्षित करण्यात यावा.
- सर्व आदिवासी भागांमध्ये जमाबंदीची प्रक्रिया पूर्ण करावी व अभयारण्ये असलेल्या क्षेत्रांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे.

१-क) पाणी:

- आदिवासी भागात असणाऱ्या धरणातील किमान ५०% पाणी मोफत उचलण्याची परवानगी आदिवासींना असावी. यासाठी वीजबिलामधे माफी मिळावी.
- राज्यात एकूण उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी, आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात (म्हणजेच महाराष्ट्राच्या संदर्भात एकूण उपलब्ध पाण्याच्या ९%) पाणी आदिवासीं साठी राखून ठेवण्यात यावे. यासाठी योग्य ती कायदेशीर तरतूद करण्यात यावी.

२) विकास प्रकल्प: जिथे आदिवासींच्या क्षेत्रात धरणे व वीज प्रकल्प आहेत तिथे निर्माण होणाऱ्या उर्जेवर, पाण्यावर, सिंचित जमिनीवर प्राधान्याने अधिकार तेथील आदिवासी गावे व समूहांचा असावा. बस्तरमधील आदिवासी समाजाने स्वीकारलेल्या 'बैलादिला' जाहिरनाम्यानुसार आदिवासी समाजाच्या जमिनींवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पातून मिळणाऱ्या किंवा या जमिनींचा वापर करून केल्या जाणाऱ्या उपक्रमातून मिळणाऱ्या नफ्याचा किमान एक तृतियांश वाटा हा स्थानिक आदिवासींच्या विकासासाठी खर्च करण्यात यावा. ही रक्कम ग्रामपंचायतीमध्ये थेट जमा करण्यात यावी. त्याचा वापर स्थानिक आदिवासी समाजाच्या निर्णयानुसार आदिवासी विकासासाठी करण्यात यावा.

३) विस्थापन व पुनर्वसन: पुनर्वसन कायद्याची अंमलबजावणी सदोष आहे. त्यामुळे पुनर्वसन योग्य पद्धतीने होत नाही. अंमलबजावणी उचित पद्धतीने व्हावी याकरिता योग्य त्या कायदेशीर तरतुदी कराव्यात आणि विस्थापितांचे पुनर्वसन योग्य पद्धतीने व्हावे. कुठल्याही विकासप्रकल्पांमुळे होणाऱ्या विस्थापनाच्या प्रक्रियेत विस्थापन होण्या/करण्याआधी पुनर्वसनाच्या सोयी होणे आवश्यक आहे. त्याबरोबरच कुठलेही नवीन विस्थापन करण्याआधी पूर्वीच्या विकासप्रकल्पांमुळे अपूर्ण राहिलेली पुनर्वसनाची कामे पूर्ण करावीत. तत्पूर्वी नवीन विस्थापन होईल असे प्रकल्प हाती घेऊ नयेत.

४) श्रम व रोजगार: आदिवासी क्षेत्रांमधे रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात याकरिता संसाधने विकसित व समृद्ध करणे व त्यास आदिवासींच्या श्रम शक्तीची जोड देत त्या संसाधनांवर त्यांचे अधिकार संरक्षित करणे आवश्यक आहे. यासाठी लागणाऱ्या क्षमता, कौशल्यांचा विकास अशा आवश्यक त्या तरतुदी करण्यात याव्यात. निकृष्ट जमिनी उत्पादक करण्याचे काम हे महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना (रोहयो) सारख्या योजनांअंतर्गत रोजगार हक्कांशी जोडून करण्यात यावे. रोहयोसारखी योजना देशाच्या स्तरावर राबवण्यात यावी व रोजगारातून मिळणारे उत्पन्न

वर्षभर पुरेल असा रोजगार देण्यात यावा. रोजगार हमी योजनेचे काम हे ''मागेल त्याला काम'' या धर्तीवरच असावे. यामध्ये स्त्रियांच्या विशेष अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र सवलती देणे आवश्यक आहे.

बागायत, फळे लागवड या क्षेत्रातील मजूरांना कुशल कामगार मानण्यात यावे. राज्यांतर्गत विविध भागामध्ये स्थलांतरित होणाऱ्या आदिवासी समाजाच्या मजुरांची नोंदणी करणे आवश्यक आहे. आदिवासी क्षेत्रात रोजगार निर्मिती तेथील संसाधने, आदिवासींची जीविका, जीवनशैली, शेतीच्या व इतर कामांच्या वेळा लक्षात घेऊन करण्यात यावी. आदिवासी विकास योजना प्राधान्याने या उद्देशासाठी राबवण्यात याव्यात.

५) किमान वेतन: शेतमजूर, बागायत, फळलागवड तसेच बांधकाम, खाणकाम, वीटभट्ट्या, व शेती इ. क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित कामगारांच्या किमान वेतनाचे संरक्षण करावे व किमान वेतनास महागाई भत्त्याची जोड देऊन दर सहा महिन्यांनी वेतनाचे पुनर्निर्धारण करण्यात यावे. किमान वेतन न देणे वा वेठबिगार ठेवणे यासारख्या गुन्ह्यावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात यावी, व किमान वेतन कायद्याचे उल्लंघन हा दखलपात्र गुन्हा मानण्यात यावा.

६) आर्थिक उपक्रम: सबलीकरणासाठी आदिवासींना फायदेशीर ठरतील असे आर्थिक उपक्रम त्यांना करता यायला हवेत. शहरी व औद्योगिक व्यवस्थेशी संबंधित असणारे आर्थिक उपक्रम बहुसंख्य आदिवासींना फायदेशीर ठरत नाहीत असा आजवरचा अनुभव आहे. तेव्हा सभोवतालच्या नैसर्गिक संसाधनांवर (जमीन, जंगल, पाणी) आधारित व आदिवासींच्या आवाक्यात असणारे आर्थिक उपक्रम (शेती, मासेमारी, पशुपालन, वनोपज यासारखे) त्यांना सक्षमपणे करता यावेत यावर आदिवासी धोरणामध्ये भर द्यायला हवा. त्याबरोबरच या आर्थिक उपक्रमांची उत्पादकता वाढवून ते उपक्रम आदिवासींना जास्तीत जास्त फायदेशीर कसे ठरतील यासाठी उपयायोजना करायला हवी.

७) बाजारपेठ: आदिवासींचा शेतीमाल व अन्य उत्पादनांच्या (विशेषत: वनउपज) विक्रीला हमीभाव देऊन व योग्य त्या यंत्रणा उभारून बाजारपेठेतील त्यांचा माल संरक्षित करण्यात यावा. तसेच आदिवासी क्षेत्रातील आठवडी बाजारांना आवश्यक त्या सोयी पुरवून त्या बाजारपेठा संरक्षित करण्यात याव्यात. बाजारपेठेमध्ये वेगवेगळ्या मार्गांनी खाजगी व्यापाऱ्यांकडून आदिवासींचे जे शोषण होते ते कायद्याने बंद करण्यात यावे, यासाठी अनुसूचित क्षेत्रांमध्ये इतर खाजगी व्यापाऱ्यांना कुठल्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार व व्यापार करण्यास संपूर्ण प्रतिबंध करावा व कायद्याचे उल्लंघन करणारी व्यक्ती/संस्था शिक्षेस पात्र असावी. या संदर्भामध्ये महाराष्ट्रामध्ये सन १९७६ साली लागू केलेला Tribal Economy Improvement Act देशाच्या पातळीवर लागू करण्यात यावा. आदिवासी सहकारी चळवळीस प्राधान्य देऊन अनुसूचित क्षेत्रांमध्ये आदिवासी समाजाच्या सर्व उत्पादनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार आदिवासींच्या सहकारी संस्थांमार्फत करावेत व यासाठी योग्य उपाययोजना करावी.

८) अर्थसंकल्पाचा वाटा: केंद्रीय स्तरावर एकूण अर्थसंकल्पापैकी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी खर्च झाला पाहिजे तसेच प्रत्येक राज्याला देखील तेथील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण अर्थसंकल्पाचा वाटा आदिवासी विकासासाठी उपलब्ध व्हायला हवा. या निधीचा विनियोग पायाभूत विकासाच्या नावाखाली आदिवासी क्षेत्रातून जाणारे महामार्ग किंवा त्यासारख्या मोठ्या प्रकल्पांवर करण्याऐवजी प्रामुख्याने आदिवासी कुटुंबांच्या स्थानिक साधनसंपत्तीच्या व स्थानिक पायाभूत सोयींच्या विकासासाठी करण्यात यावा.

९) दारिद्रय रेषा: दारिद्र्य रेषेच्या आधारे सरकारच्या विकास योजना छोट्या गटांसाठी आरक्षित केल्या जातात. पाच एकर व त्यापेक्षा कमी जमीनधारणा असणारे व कायमस्वरूपी नोकरी नसणारे असे सर्व आदिवासी दारिद्र्यरेषेच्या खाली गणले जावेत. रेशन दुकानाद्वारे मिळणारे स्वस्त धान्य मिळण्याचा अधिकार सगळ्या आदिवासींना पूर्वीप्रमाणेच सार्वत्रिक मिळायला हवा, तो आता आहे त्याप्रमाणे लक्ष्याधारित नसावा.

राजकीय सबलीकरणाच्या अनुषंगाने येण्याऱ्या सूचना

१. आदिवासी स्वशासन कायदा

- आदिवासी स्वशासन कायद्याची त्वरित व परिणामकारक अंमलवजावणी होणे आवश्यक आहे. अंमलबजावणीतील सद्यस्थितीमधील अडचणी शोधून काढून त्या दूर कराव्यात व कायद्यामध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींची कठोर अंमलबजावणी करणे संबंधित अधिकारी, विकास विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर बंधनकारक करावे.

२. विकासप्रक्रियेतील सहभाग

- गावपातळीवरील विकासासाठीच्या सगळ्या योजनांची आखणी, नियोजनामधे आदिवासी समूहांचे प्रतिनिधित्व असावे व त्याबरोबरच अंमलबजावणीमधे त्यांचा सहभाग असावा. रोजगार हमी योजनांसारख्या योजनांचे नियोजन नीट करावे व नियोजनामधे आदिवासी गावसमूहांचा सहभाग असावा.
- गावपातळीवर ग्रामसभेसारख्या व ग्रामपंचायतीसारख्या संस्थांच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवतानाच पंचायत समितीच्या पातळीवरही आदिवासी लोकांचा सहभाग वाढवण्यास प्रयत्न व्हावेत. त्यासाठी आवश्यक अशा तरतुदी असाव्यात.

३. आरक्षण धोरण

- प्रशासकीय व सार्वजानिक क्षेत्रामधील आरक्षणाच्या तरतुदी कायम ठेवाव्यात व त्याबरोबरच खाजगी क्षेत्रामधे नोकऱ्यांसाठी आरक्षण धोरण लागू करण्यात यावे. यामधे आदिवासींमधील शिकलेल्या पहिल्या पिढीस आरक्षण असावे व ते नीट राबवले जावे.
- बोगस आदिवासींचा प्रश्न आणि आदिवासी प्रमाणपत्र दाखला देणे, व ओळख पटवणे याचे अधिकार ग्रामसभेकडे असावेत. यामधे सरकारी अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करू नये. बोगस प्रमाणपत्राचा प्रश्न सोडविण्यासाठी

राष्ट्रीय पातळीवर 'बोगस प्रमाणपत्र विरोधी कायदा' करावा. या कायद्यानुसार बोगस प्रमाणपत्र देणे व घेणे हा दखलपात्र गुन्हा मानण्यात येऊन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस कडक शासन करण्यात यावे.

- आदिवासी समाजास सरकार स्थापनेमधे योग्य प्रतिनिधित्व मिळावे याकरिता आदिवासी मतदारसंघ राखीव ठेवण्याचे धोरण कायम ठेवतानाच काही ठिकाणच्या मतदारसंघांची पुनर्रचना करावी, जेणे करून आदिवासी मतदार वेगवेगळ्या मतदारसंघांमधे विभागला न जाता आदिवासी समाजास योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल.

४. प्रशासन

- सध्या आदिवासी क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या विकास विभागांसाठी (उदा. वीज, सिंचन, आरोग्य इ.) असणाऱ्या प्रशासकीय हद्दींमध्ये आदिवासी क्षेत्रे (अनुसूचित क्षेत्रे किंवा उपयोजना क्षेत्रे) व गैरआदिवासी क्षेत्रे या दोहोंचा समावेश आहे व त्यामुळे विविध विकास विभागांचे कार्यक्रम आदिवासी क्षेत्रांमध्ये फारसे राबवले न जाता त्याच प्रशासकीय हद्दीतील गैरआदिवासी क्षेत्रांमध्ये हे कार्यक्रम राबवण्याचा भर दिसतो. यावर उपाय म्हणून प्रशासकीय हद्दीची पुनर्रचना बदलून आदिवासी-बहुल भाग सलग राहतील अशाप्रकारे प्रशासकीय हद्दी ठरवण्यात याव्यात व या हद्दी अनुसूचित क्षेत्रांच्या हद्दींशी सुसंगत (co-terminus) असाव्यात. त्याचप्रमाणे यासाठी त्या त्या क्षेत्रातील लोकसंख्या व भौगोलिक प्रदेश विचारात घेऊन आवश्यकतेनुसार नव्या हद्दी बनवण्यात याव्यात. यासाठी स्वायत्त आदिवासी तालुके किंवा स्वायत्त जिल्हा किंवा स्वायत्त राज्य असाही विचार करता येईल. उदा. भिलखंड राज्य.
- याबरोबरच गाव, तालुका, व जिल्हापातळीवर आदिवासींच्या दक्षता समित्या नेमण्यात याव्यात व अशा समित्यांना प्रशिक्षित करून आदिवासींचे शोषणापासून संरक्षण करण्याकरिता दक्षता समित्यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात यावेत.
- आदिवासी क्षेत्रातील क्षेत्रनिहाय उपाययोजनेकरिता 'जनसुनवाई ' सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून धोरणे निश्चित करावीत. ग्रामसभेच्या धर्तीवर प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर वाडी-सभा किंवा पाडासभा असणे आवश्यक आहे. यानुसार आदिवासी स्वशासन कायद्यामधे दुरुस्ती करावी. या वाडीसभांना ग्रामसभेला असणाऱ्या अधिकारांबरोबरच निर्णयप्रक्रियेमधे सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार असणे आवश्यक आहे. उदा: जातीच्या प्रमाणपत्रांचा दाखला, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची निश्चिती इ. जातीच्या प्रमाणपत्रांचे दाखले व इतर दाखले देण्याची प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने मा. शिवाजीराव मोघे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी लागू

करण्यात यावी.

- आदिवासी उपयोजनेमध्ये नमूद केल्यानुसार क्षेत्र व योजनावार नियोजित खर्च ती ती क्षेत्रे व योजनांवरच व्हावा, तो निधी इतरत्र वळवला जाऊ नये अथवा शासनाकडे परत केला जाऊ नये. आदिवासी उपयोजनेतील निधीचा लाभ हा आदिवासींना होतो आहे व योग्य रीतीने नियम व आदेश यांना अनुसरून होतो आहे हे तपासण्यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र आढावा व परिक्षण समिती नेमावी. याचबरोबर राज्यपातळीवर शासनातर्फे अधिकृत स्वयंसेवी व शिक्षणक्षेत्रातील अभ्यासक-कार्यकर्त्यांची परिक्षण समिती नेमावी. या समित्यांच्या सूचना शासनावर बंधनकारक असाव्यात.

५. इतर वंचित आदिवासींचा प्रश्न

- आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील भागात जिथे आदिवासी विखुरलेले व अल्पसंख्यांक आहेत त्यांच्याकरिता केंद्र सरकारने स्वतंत्र विकासाचे धोरण आखावे. त्यांच्या जीविकेच्या संरक्षणासाठी विशेष विकास योजना आखण्यात याव्यात व केंद्र सरकारने त्यासाठी निधी उपलब्ध करावा. यासाठी कुटुंब स्तरावरील योजनांवरील भर वाढवण्यात यावा. माडा व मिनिमाडा अशा छोट्या आदिवासी क्षेत्रांच्या पुनर्रचनेसाठी लोकसंख्येची मर्यादा खाली आणण्यात यावा.

सांस्कृतिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येण्याऱ्या सूचना

१) आदिवासी ओळख व अस्मिता

- मसुद्यातील 'ट्रायबल' हा शब्द नाम नसून विशेषण आहे. त्याऐवजी ट्रायबल पीपल किंवा कम्युनिटी असे म्हणावे. अनुसूचित जमाती या शब्दप्रयोगाऐवजी इंग्रजीमध्येही 'आदिवासी' असाच शब्दप्रयोग करावा.
- आदिवासी लोकांना प्रमाणपत्र देताना प्रमाणपत्रात कोणत्याही धर्माचा उल्लेख करु नये. त्यावर केवळ जमात व पोटजमातीचा उल्लेख असावा.
- मोठ्या प्रमाणावर बोगस प्रमाणपत्र बाळगणाऱ्या आदिवासींची संख्या वाढली आहे. या प्रश्नाचा सखोल अभ्यास करून यावर उपाय शोधणे आवश्यक आहे.
- याबरोबरच अनुसूचित जमातींची सूची पुन्हा तयार करून त्यांना 'आदिवासी' असे जाहिर करावे.

२) आदिवासी संस्कृती

- संस्कृती टिकवणे हे त्या त्या मानवसमूहाचे काम असले तरीही संस्कृतीस मारक प्रवृत्तींना प्रतिबंध करण्याची धोरणे बनवून ती अमलात आणता येऊ शकतात. या प्रकरणी विशेष अध्ययन करून तशा प्रकारची धोरणे बनवण्याची आणि राबवण्याची जबाबदारी सांस्कृतिक मंत्रालयाने घ्यावी. या समस्येवर केल्या जाणाऱ्या संशोधनामध्ये सामाजिक संस्थांचा सहभाग असावा.
- आदिवासी भाषा हळूहळू लोप पावते आहे. याकरिता किमान पातळीवर प्राथमिक शिक्षण हे मायबोलीतून द्यावे. इयत्ता १२ वी पर्यंत आदिवासी भाषा जाणणाऱ्या शिक्षकांमार्फत

अध्यापनाचे काम करावे. याबरोबरच भाषा टिकवण्याकरिता शासनातर्फे इतर उपक्रम हाती घ्यावेत.

३) मानवी हक्क

- आदिवासी समूहाचे मूलभूत हक्क कायम रहातील अशाच तऱ्हेने सर्व उपाययोजना केल्या पहिजेत. आदिवासींना सन्मानाचे आणि दहशतमुक्त जीवन जगता येईल अशी परिस्थिती असावी. सामाजिक अत्याचार, शोषण, अन्याय यापासून कायद्याचे संरक्षण असावे. मानवी हक्कभंगाची प्रकरणे 'मानवी हक्क संरक्षक मंचाकडे' नेण्याची संधी आदिवासींना असावी.
- आदिम जमातीच्या लोकसंख्येचा उत्तरोत्तर ऱ्हास होत असल्याने या जमातींना कुटुंब नियोजनाच्या योजनांपासून संरक्षण मिळावे.
- आदिवासींसंबंधीच्या कायदेशीर प्रकरणांमध्ये सर्वसाधारणपणे हिंदू कोड बिलाचा संदर्भ घेतला जातो. त्याऐवजी आदिवासींचे पारंपारिक नियम व कायद्याचा (Customary Law) सखोल अभ्यास करून त्यास प्रत्येक आदिवासी जमातीसाठीच्या कायद्यामध्ये योग्य ते स्थान द्यावे.
- अनुसूचित क्षेत्रातील हिंसक अतिरेकी चळवळींना त्वरित आळा घालण्यात यावा. व आदिवासींच्या वंशविच्छेदाची प्रक्रिया थांबवण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजण्यात यावेत.
- आदिम जमातींसाठी (Premitive Tribes) स्वतंत्र धोरण तयार करावे.

४) मुख्य प्रवाह

मुख्य प्रवाहामधे आदिवासींचे सामिलीकरण करणे असा दृष्टिकोन घेणे योग्य नाही. भारतीय समाज हा वैविध्यपूर्ण (प्लुरल) आहे. यातील अनेक समाजप्रवाहांपैकी आदिवासी समाज व संस्कृतीचा एक स्वतंत्र प्रवाह असून त्यास तशी मान्यता देणे आवश्यक आहे. भारतीय समाजातील काही प्रवाह हे आर्थिक व राजकीय दृष्टया बलवान असल्यामुळे त्यांचा आर्थिक व राजकीय घडामोडींवर प्रभाव आहे. मुख्यप्रवाह व सामिलीकरण ह्या संकल्पना रद्दबदल कराव्यात. आदिवासी लोक स्वतंत्रपणे समाजातील इतर प्रवाहांशी देवाणघेवाण करतील ही भूमिका स्वीकारून त्यास अधिकृतरित्या मान्यता द्यावी. याकरिता आदिवासी समाजाचे आर्थिक व राजकीय सक्षमीकरण करणे हे आदिवासींविषयक धोरणाचे सर्वसाधारण उद्दिष्ट मानण्यात यावे.

सामाजिक सबलीकरणाच्या अनुषंगाने येण्याऱ्या सूचना

१) शिक्षण

- इयत्ता १२ वी पर्यंत आदिवासींची मायबोली (मातृभाषा) जाणणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करावी व प्राथमिक शिक्षण आदिवासी भाषेतून द्यावे. महाविद्यालयामध्ये मायबोली हा वेगळा विषय अभ्यासाकरिता असावा. ज्या आदिवासी भागांमध्ये स्थानिक आदिवासी भाषा दैनंदिन व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे, त्या भागांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके आदिवासी भाषांमध्ये काढावीत. यासाठी विशेष अनुदान देण्यात यावे.

- आदिवासी भागातील शिक्षकांची गळती रोखण्यास व शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता गावपातळीवर शिक्षण समिती नेमण्यात यावी व या समितीस शिक्षणाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचे योग्य ते अधिकार देण्यात यावेत. शिक्षण मोफत असावे व सरकारकरिता शिक्षण देणे सक्तीचे असल्याने शिक्षणाच्या सोयी आदिवासींसाठी उपलब्ध करणे बंधनकारक आहे. प्रत्येक शिक्षकास अर्हतेच्या निकषानुसार अध्यापनशास्त्राचे शिक्षण घेणे बंधनकारक असावे. प्रत्येक पाड्यावर शाळा असावी आणि वर्षातून (सुट्या वगळून) संपूर्ण दिवस शाळा भरवण्यात यावी. शिक्षकाचे निवासस्थान पाड्यावर असावे.
- सर्व शिक्षा अभियान ही योजना २०१० पर्यंतच न ठेवता शासनाने ती कायमस्वरुपी चालवावी. सर्व उच्च शिक्षणासाठी लागणारी प्रवेश फी शासनाने माफ करून त्यांना शिक्षणाची संधी द्यावी. यामध्ये आर्थिक निकष व गुणवत्ता पडताळून आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्यांना प्राधान्य द्यावे. विद्यमान कोठारी आयोगावर आधारित सार्वत्रिक शिक्षणपद्धतीचा अवलंब न करता दहावीपर्यंतच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना विज्ञान, वाणिज्य व कला या विभागानुसार विषय निवडण्याची मुभा/सवलत असावी. यानुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी.
- प्रत्येक शाळा ही द्विशिक्षकी असावी. त्या ठिकाणी पटाचा (उपस्थितीचा) विचार केला जाऊ नये. महाराष्ट्राच्या संदर्भात आदिवासी भागातील भोंगा शाळा, वस्तीशाळा ह्या आदिवासींच्या शैक्षणिक ऱ्हासाचे कारण ठरले आहे. त्या बंद करून त्या ठिकाणी जिल्हा परिषदनेने शाळा सुरू कराव्यात. आदिवासी समाजामध्ये मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याने या प्रश्नाचा अभ्यास करून त्यांच्याकरिता स्वतंत्र धोरण आखण्यात यावे.
- आदिम आदिवासींसाठी, त्याचप्रमाणे ज्या भागात मुलांची गळती जास्त आहे त्या ठिकाणी स्वतंत्र आश्रम शाळा काढाव्यात व ह्या शाळा शिक्षणाच्या सर्व सोयीसुविधांनी संपन्न असाव्यात. आश्रमशाळांमध्ये शिकवला जाणारा अभ्यासक्रम उपजीविकेशी संबंधित असावा व स्थानिक उपजीविकांना अनुसरून व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रमाची निर्मिती व अध्यापन करावे. व्यावसायिक अभ्यासक्रम प्राथमिक स्तरापासून शिकवण्यात यावा.
- प्राथमिक शिक्षणामध्ये काही इयत्तांमधे परीक्षा पद्धती बंद असल्याने मूल्यमापनाच्या पद्धती बदलून मूल्यमापन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आधारित असावे. अनौपचारिक शिक्षणाच्या पद्धती अंगिकारून त्यासाठी शिक्षण योजनांमधे तशा प्रकारच्या तरतुदी कराव्यात. त्याबरोबरच उपजीविका अर्जित करण्यासाठी उपयुक्त अशी तंत्रे व कौशल्ये निर्माण करण्यासाठी तंत्रशिक्षणाची सोय करावी.
- प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना

पुरेसा सकस आहार देण्यात यावा.

२) आरोग्य

- आदिवासी समाजातील परंपरागत उपचारपद्धतींशी सांगड घालण्याच्या उद्देशाने सरकारी दवाखान्यात ॲलोपॅथीपेक्षा आयुर्वेदावर अधिक भर द्यावा. यासाठी आदिवासी भागामध्ये आयुर्वेदिक पदवी धारण करणाऱ्या वैद्यांची (डॉक्टर) नेमणूक करावी. आदिवासी भागातील रुग्णालयांमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा एक भाग (इन्टर्न) म्हणून किमान दोन वर्षे काम करण्याचा अनुभव घेणे बंधनकारक करावे. याबदल्यात अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व त्यासारख्या शैक्षणिक सवलती द्याव्यात.
- आदिवासी क्षेत्रामध्ये असणाऱ्या रुग्णालयांमधील रिक्त पदे लवकरात लवकर भरणे आवश्यक आहे. याकरिता आदिवासी उमेदवारांचा प्राधान्याने विचार करावा. तातडीच्या वेळी त्या परिसरामध्ये असणाऱ्या खाजगी व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांचे सहकार्य घ्यावे. परिसरातील खाजगी डॉक्टरांचे सहकार्य घेताना स्थानिक आदिवासी समुदायाचे शोषण होणार नाही यासाठी योग्य ते नियम व कायदे करून त्यांचे पालन व्हावे यासाठीही योग्य तरतुदी असाव्यात.
- आदिवासी क्षेत्रातील रुग्णालयांची व प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या व भौगोलिक स्थान हे रुग्णालये व त्या क्षेत्रातील गावे-वस्त्या यामधील अंतर या निकषावर ठरवू नये. त्याऐवजी वाडी वस्तीपासून आदिवासी व्यक्तीस रुग्णालयापर्यंत पायी चालत लागणारा वेळ या निकषावर ठरवावी. जेथे रुग्णालयांची संख्या वाढवणे शक्य नसेल तेथे फिरती रुग्णालये (mobile clinics) पाठवावीत. ही फिरती रुग्णालये आठवड्यातून विशिष्ट दिवशी न ठेवता सर्व दिवस सुरू ठेवावीत.
- प्रत्येक सरकारी रुग्णालयामधे आरोग्य दक्षता समिती असावी. रुग्णालयातील दक्षता समितीमध्ये स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना आणि आदिवासी समाजाला प्रतिनिधित्व असावे. रुग्णालायातील दक्षता समित्यांच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यात यावे व त्याकरिता योग्य ती आर्थिक तरतूद करण्यात यावी.
- प्रत्येक आदिवासी वाड्यांमध्ये वाडी किंवा 'पाडा स्वयंसेवक' असावा. लोकांच्या आजारांवर प्राथमिक औषधोपचार करणे ही त्याची जबाबदारी असावी. पाडा स्वयंसेवकाची निवड स्थानिक समुदायातील तरुणांमधून केली जावी.
- रुग्णालयाची निर्मिती करतेवेळी लोकसंख्येचा विचार न करता भौगोलिक परिस्थितीनुरुप विचार करावा. दुर्गम भागामधे योग्य त्या सोयी सुविधा निर्माण करण्यात याव्यात.
- आदिवासी स्वशासन कायद्यातील तरतुदींप्रमाणे ग्रामसभेचे, आरोग्य व शिक्षण

कर्मचाऱ्यांवर नियंत्रण असावे.

- पोषक आहाराला प्राधान्य देताना पोषक आहाराच्या स्थानिक स्रोतांना, जसे की, परसबाग, घरगुती वनौषधी, यावर भर द्यावा. त्यासाठी योग्य त्या योजना आखून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.
- आदिवासी समुदायामध्ये आरोग्याच्या समस्यांबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि वैद्यकीय सेवेचा लाभ त्यांनी घ्यावा याकरिता जाणीव जागृतीचे उपक्रम घेण्यात यावेत. प्रजनन व बाल आरोग्य, किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य याबाबत जाणीवजागृतीचे उपक्रम हाती घेऊन 'आरोग्यशिक्षण' व स्त्रियांचे आरोग्य व बाल आरोग्य या समस्या सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना हाती घ्याव्यात. 'आरोग्यशिक्षण' व इतर योजना एकमेकांशी जोडून अमलात आणाव्यात.

३) सार्वजनिक सुविधा

- अपारंपारिक उर्जेचा व सौर ऊर्जेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने उपक्रम हाती घ्यावेत.
- कायमस्वरुपी स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करणे. पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम आदिवासी भागामध्ये प्राधान्याने व्हावेत. यांना प्राधान्य देताना पिण्याच्या पाण्याचे कार्यक्रम/योजना पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमांशी जोडून घ्याव्यात.
- गावामध्ये प्रसाधनगृहे (शौचालये) बांधावीत. प्रसाधनगृहाचे स्थान, तंत्र व रचना (मॉडेल) ठरवताना स्थानिक रहिवासी, लाभार्थी यांच्याशी सल्लामसलतीद्वारे व स्थानिक परिस्थितीनुसार योग्य ते बदल करून निश्चित करावीत. याबाबतच्या निर्णयप्रक्रियेमध्ये लोकांच्या मताला स्थान असावे.
- प्रत्येक वाड्या-पाड्याला पक्के रस्ते असावेत. ज्या ठिकाणी प्रवासी वाहतूक व मालाची ने-आण करण्यासाठी सोयी नाहीत त्या ठिकाणी त्वरेने एस. टी. बस सुरु करण्यात यावी.
- आदिवासी भागातील वीजपुरवठा पूर्ववत चालू करावा. राज्याच्या एकूण वीज उत्पादनापैकी ९% (लोकसंख्येच्या प्रमाणात) वीज आदिवासींना पुरवण्यात यावी.
- आदिवासी भागांमध्ये संदेशवहनाच्या सोयी सुविधा वाढवून दूरध्वनी केंद्रे, पोस्ट ऑफिसेस, व तारघरांची संख्या वाढवणे आवश्यक आहे.

४) सामाजिक सुरक्षा

- आदिवासी समाजातील निराधार स्त्रिया व मुले, अंध व अपंग व्यक्ती यांना सामाजिक सुरक्षेचे उपाय कायद्याद्वारे मिळावेत म्हणजे कायमस्वरुपी खात्रीचा लाभ मिळेल. ही योजना ग्रामपंचायतीकडे देण्यात यावी.

■ ■ ■

आदिवासी व मूळ निवासी जनतेचे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आदिवासी धोरणावरील प्रतिक्रियेच्या स्वरुपातील 'दिल्ली घोषणापत्र'

दि. २२ सप्टेंबर २००४

भाग १ : प्रस्तावना

१. आम्ही, दि. २२ ते २४ सप्टेंबर २००४ रोजी नवी दिल्ली येथे जमलेले/ल्या, भारतातील विविध ठिकाणच्या आदिवासी व मूळ निवासी जनतेचे प्रतिनिधी, आमचे मित्र, पाठिराखे आणि सहयोगी संस्थांच्या सोबतीने व देशभरातील आदिवासी जनतेच्या वतीने, एकमताने केंद्र सरकारचे नवीन राष्ट्रीय आदिवासी धोरण नाकारत आहोत.

२. आमची ही भूमिका गेल्या काही महिन्यांमध्ये स्थानीय, क्षेत्रीय, राज्यस्तरीय आणि विभागीय पातळीवर आयोजित केलेल्या चर्चासत्रांमध्ये शेकडो आदिवासी व मूळ निवासी लोकांच्या आणि आमचे मित्र व सहयोगी पाठिराख्यांच्या सहभागातून घडलेल्या विचारविमर्षाच्या प्रक्रियेवर आधारित आहे. सदर विभागीय चर्चासत्रे अनुक्रमे उत्तर-पूर्व विभाग (इशान्येकडील राज्ये) (२-४ जून २००४ ग्राम: अकाजन, आसाम); पूर्व विभाग (२४-२५ जुलै २००४, रांची, बिहार); दक्षिण विभाग (४-६ सप्टेंबर २००४ बंगलोर, कर्नाटक) आणि पश्चिम विभाग (९-१० सप्टेंबर २००४ अहमदाबाद, गुजरात) या ठिकाणी आयोजित केली गेली.

केंद्र सरकारचे सदर धोरण आम्ही नाकारत आहोत, याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे:

३. या दस्तावेजामध्ये, भारतामध्ये सर्वाधिक वंचित असणाऱ्या आदिवासी आणि मूळ निवासी जनतेच्या हक्कांचे, त्यांच्या जगण्याचे आणि विकासाचे सर्वसमावेशक विवेचन अभिप्रेत आहे. याबरोबरच आदिवासी व मूळ निवासी जनतेच्या प्रति सरकारच्या जबाबदाऱ्या व बंधने याबाबतची मांडणी असणारा सदर धोरणात्मक दस्तावेज, धोरण तयार करण्याची योग्य प्रक्रिया न घडवल्याने आपले उद्दिष्ट गाठू शकत नाही.

४. सदर धोरण तयार करताना, आम्हाला दिली जाणारी भेदभावाची वागणूक आणि आमच्या हक्कांच्या प्रति असलेली उपेक्षा यामुळे निर्माण झालेल्या आमच्या दुरावस्थेची मूळ कारणे आम्हाला भारतीय राज्यघटनेने दिलेल्या वैयक्तिक आणि सामुहिक मानवी हक्कांच्या चौकटीशी पडताळून पाहिल्याशिवाय आमच्या या परिस्थितीमागील मूलभूत समस्यांवर उपाय शोधणे केवळ अशक्य आहे.

५. आंतरराष्ट्रीय पातळीवर सध्या अस्तित्त्वात असलेले आणि विकसित होत असलेले आमच्या हक्कांबाबतचे नियम, आधार, आणि मानके आणि भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांशी बांधिलकी या दोन घटकांवर राष्ट्रीय आदिवासी धोरण आधारभूत असणे आवश्यक आहे. आमची सद्यस्थिती, संस्कृती आणि अस्मितेबाबत आदराची भावना असल्याशिवाय आणि आमच्या सद्यस्थितीचे

घटनादत्त अधिकारांच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील कायदे आणि नियमांच्या संदर्भात योग्य मांडणी केल्याशिवाय आमचे अधिकार संपूर्णत: आम्हाला मिळणे शक्य होणार नाही.

६. एका पारदर्शी, सहभागी आणि सर्वसमावेशी प्रक्रियेचा अभाव, धोरणास अंतिम स्वरूप देताना केलेली अकारण घाई व याप्रक्रियेविषयी बाळगलेली गोपनीयता हे ही यामागील एक प्रमुख कारण आहे.

७. 'मुख्य प्रवाहामध्ये आदिवासींचे सामिलीकरण' हे सदर धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आमच्या हक्कांचे उल्लंघन करते. हे उद्दिष्ट स्वीकारण्यामागे असलेली धोरणकर्त्यांची समज व भूमिकेतून भारतातील आदिवासी व मूळ निवासी समूहांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती, त्यातील वैविध्य आणि समूहांचे वेगळेपण याबद्दल अनादराची भावना दिसून येते.

८. सदर धोरणामध्ये अस्वीकारार्ह, अपमानकारक आणि मानहानीकारक संज्ञा आणि व्याख्यांचा वापर केलेला आहे.

९. या धोरणामध्ये राज्यघटनेच्या ५ व्या आणि ६ व्या अनुसूचीमध्ये मांडलेल्या संरक्षणात्मक धोरणांचा आणि व त्यासारख्या इतर कायद्यांच्या अंमलबजावणीवर पुरेसा भर देण्यात आलेला नाही.

१०. आम्ही पिढयान्‌पिढ्या कसत असलेल्या जमिनी, तसे आमची वस्ती असणारे भूप्रदेश आणि तेथील नैसर्गिक संसाधने यावरील आमचे हक्क, त्याचबरोबर बळजबरीने होणारे स्थलांतर/हकालपट्टी यापासूनचे अपुरे संरक्षण, पुनर्वसनाच्या अपुऱ्या तरतुदी या सर्वांची धोरणात सातत्याने आणि स्पष्टपणे दखल घेतलेली नाही.

११. आमचे परंपरागत कायदे, न्यायनिवाड्याच्या आणि स्वशासनाच्या पद्धतींची धोरणाने पुरेशी दखल न घेता या पद्धतींचे संरक्षण आणि संवर्धनासाठी धोरणामध्ये काहीही उपाय सुचवण्यात आलेले नाहीत. त्याचबरोबर खुल्या पूर्व–सर्वसंमतीच्या सूचनेची (Free and prior consent : FPIC) तरतूदही सदर धोरणामध्ये नाकारण्यात आलेली आहे.

१२. या धोरणामध्ये आमची स्वतंत्र ओळख आणि अस्मिता जोपासण्याच्या हक्कांबाबत असलेला अनुल्लेख अतिशय आक्षेपार्ह आहे. त्याबरोबरच या धोरणामध्ये आमचा जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या दुष्प्रभावापासून स्वत:चा बचाव करण्याचे आणि स्वयंशासित/स्वघोषित विकासाचे हक्क संपूर्णत: डावलण्यात आलेले आहेत, हे ही अस्वीकारार्ह आहे .

१३. प्रचलित विकासाचे प्रतिमान (model) व त्यामुळे सुरू असलेल्या विविध प्रक्रियांचा आमच्या उपजीविकेवर अतिशय प्रतिकूल परिणाम होत आहे. याची सदर धोरणामध्ये अजिबात दखल घेण्यात आलेली नाही.

१४. या धोरणामध्ये आमच्या विकासाच्या आर्थिक अंगाकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. याबरोबरच सदर धोरणामध्ये विकासाच्या

एकात्मिक दृष्टिकोनाबाबत मांडणीचा संपूर्ण अभाव आहे.

१५. आमचे पारंपारिक ज्ञान, आणि या ज्ञानाची जोपासना करणारे समूह/व्यक्ती यांना पुरेसे संरक्षण देण्यात आलेले नाही. त्याचबरोबर आमच्या भाषा, इतिहास, तंत्रज्ञान इ. चा समावेश असणारी आमची शिक्षण व्यवस्था, व त्याचप्रमाणे आमची संकृती, जगाकडे पहाण्याचा आमचा दृष्टिकोन याबाबत इतर समाजांचे शिक्षण या सर्वांबाबत धोरणामध्ये पुरेशी तरतूद केलेली नाही.

१६. आमचे धर्म, आध्यात्मिक संकल्पना, संस्था, व्यक्ती आणि पद्धती, पवित्र स्थळे इ. बाबत धोरणामध्ये कुठेही आदराची भावना दिसून येत नाही. त्याचप्रमाणे या सर्वांना पुरेसे संरक्षण देण्याच्या तरतुदी धोरणामध्ये आढळून येत नाही.

१७. सामान्य शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा सर्वांना सारख्या प्रमाणात लाभ घेता यावा याकरिता पुरेशा तरतुदी सदर धोरणामध्ये मांडलेल्या नाहीत.

१८. आमचे आरोग्याबाबतचे दृष्टिकोन तसेच औषधोपचाराच्या पद्धतींना धोरणामध्ये मान्यता आणि संरक्षण देण्यात आलेले नाही.

१९. सदर धोरणामध्ये लिंगभावाबाबतच्या वैचारिक दृष्टिकोन अथवा स्त्रियांचे हक्क व समस्या याबाबत वैचारिक स्पष्टता आढळत नाही. याचबरोबर बालहक्कांविषयी सरकारच्या बांधिलकीचा काहीही उल्लेख नाही व तसेच युवकांना बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या दुष्प्रभावापासून संरक्षण देण्याच्या दृष्टीने काहीही तरतुदी अथवा उपायांची मांडणी आढळून येत नाही.

२०. या धोरणामध्ये सैन्याचा आमच्या भूभागातील वाढता प्रभाव, आमच्या भूप्रदेशांचे सैनिकीकरण व त्याच्या दुष्परिणामांबद्दल काहीही उल्लेख आढळत नाही.

२१. आमच्या भूभागातील वाद व तंटे मिटवणे ही आमच्या भूभागातील आमची अतिशय तातडीची गरज व अपेक्षा आहे. आमची धोरणे, नीती, पारंपारिक ज्ञान, नियम आणि समेट घडवण्याच्या व सलोखा प्रस्थापित करण्याच्या पद्धतींचा उपयोग करून तंटे मिटविण्याबाबत काहीही मांडणी आढळून येत नाही.

भाग २ : आदिवासींसाठी राष्ट्रीय धोरण ठरवताना तडजोड करता न येण्याजोगी सूत्रे

१. संस्कृती, ओळख, मूल्ये आणि जीवनपद्धती याबाबतीत असलेल्या आमच्या समाजाच्या वेगळेपणाला व वैविध्याला मूलभूत सन्मान देणे अभिप्रेत आहे.

२. आदिवासी / मूळ निवासी समाजसमूहांच्या नैसर्गिक आणि कायदेविषयक सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय हक्कांना मान्यता देणे आवश्यक आहे. यातून पुढील हक्कांना मान्यता देणे अभिप्रेत आहे.

अ) उपजीविका आणि सन्मानाने जीवन जगण्याचा हक्क

ब) आमच्या मातृभूमीवरील नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण व मालकी व त्याबरोबरच संसाधनांचे संरक्षण आणि संवर्धन/पुनर्निर्मिती करण्याचे हक्क

क) आमची वैशिष्ट्यपूर्ण ओळख, संस्कृती, मूल्ये आणि जीवनपद्धती अभिव्यक्त करण्याचा आणि उचलून धरण्याचा आमचा हक्क

ड) आमच्या परंपरागत स्वयंशासनाच्या पद्धती, परंपरागत न्यायशास्त्र व न्यायदानाच्या पद्धती यांचे संरक्षण आणि संवर्धन

इ) आमच्या संस्कृतीचे आणि सभ्यतांचे (Civilization) संरक्षण व संवर्धन

फ) आमच्या विकासाबाबत आणि भविष्याबाबत स्वयंशासनाचा आणि स्वयंनिर्णयाचा अधिकार

३. लोकसहभाग आणि लोकाभिमुखतेच्या तत्त्वावर आमच्यावर परिणाम करणाऱ्या कायदे व धोरणांची आखणी व्हायला हवी.

४. आदिवासी/मूळ निवासी जनतेच्या हक्कांची पूर्तता आणि त्यांना संरक्षण याचे उत्तरदायित्त्व सरकारवर असेल.

५. इतिहासापासून आदिवासी व मूळनिवासी जनतेवर झालेल्या व अजूनही सुरु असलेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्याची आणि आमच्या सनदशीर हक्कांची पुर्नप्रस्थापना करण्याची जबाबदारी सरकारवर असावी.

भाग ३ : मूलभूत हक्क

आमच्या वर्तमान स्थितीला आणि भविष्याला आत्यंतिक धोका निर्माण झालेला असतानाही आम्ही आमच्या भविष्याबाबत आशादायी आहोत. आमच्या संबंधीच्या कोणत्याही राष्ट्रीय धोरणातून आम्ही पुढे नमूद केलेल्या आमच्या मूलभूत हक्कांना मान्यता मिळावी असे आम्ही निग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

१. भारतीय संविधानाच्या कलम ३४२ मध्ये केलेला 'अनुसूचित जमाती' असा मानहानीकारक उल्लेख काढून टाकण्यात यावा आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आम्हाला दिलेल्या मान्यतेनुसार (आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या कलम क्र. १६९) नुसार आमच्या समुदायाला 'मूळ निवासी' (indegenious people) अशी मान्यता मिळावी.

२. नष्ट होत जाणाऱ्या, भटक्या आणि डी-नोटिफाईड आणि इतर अतीव निर्बल आदिवासी समूहांच्या हक्कांना विशेष तरतुदींद्वारे पुरेसे संरक्षण देण्यात यावे.

३. मूळ निवासी समुहांच्या हक्कांबाबत संयुक्त राष्ट्रांनी व आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने जाहीर केलेल्या (कलम क्र.१६९) नियमांनुसार मूळ निवासी समुदायांना मिळालेले हक्क सरकारने स्वीकारावेत व त्यांना मान्यता द्यावी.

४. मानवी हक्क, समता ही सूत्रे व आदिवासी समुदायांच्या परंपरागत न्यायशास्त्राशी सुसंगत असाव्यात आणि त्यांच्या स्वशासनाच्या पद्धतींना मान्यता मिळावी.

५. भारतीय संविधानाच्या ६व्या अनुसूचीतील सर्व

तरतुदी ५व्या अनुसूचीतील क्षेत्रांसाठी लागू करण्यात याव्यात. याबरोबरच सर्व आदिवासी/मूळ निवासी समुदायांची पिढिजात व सध्याच्या वसतिस्थाने व भूभागांना आणि ज्या ठिकाणी आदिवासीं मोठ्या प्रमाणावर वसती करीत असतील अशा सर्व क्षेत्रांना अनुसूचित क्षेत्रे अशी मान्यता मिळावी. या सर्व क्षेत्रांचे प्रशासकीय पुनर्रचना करून त्यांना स्वयंशासित (Self-Rule) आदिवासी क्षेत्रे म्हणून मान्यता देण्यात यावी.

६. आमच्या अस्मिता, ओळख, मूल्ये, जीवनपद्धती व त्याचप्रमाणे धर्म, पवित्र ठिकाणे आणि उत्सवांच्याबद्दल संविधानाने आदर बाळगावा. आमचा इतिहास, विशेषतः आदिवासींनी स्वातंत्र्य चळवळींमध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेऊन आमच्या ऐतिहासिक आणि पवित्र ठिकाणांचे जतन व देखभाल करण्यात यावी.

७. आमची वसतिस्थाने असलेल्या भूभागातील नैसर्गिक संसाधनांवर आमची संपूर्ण मालकी राहील. आदिवासी/मूळनिवासी समुदायांच्या पूर्वसंमतीशिवाय आणि समुदायांना पुरेसा लाभ मिळण्याची खात्री असल्याशिवाय नैसर्गिक संसाधनांच्या वापराचा अधिकार कोणत्याही इतर समाजघटकांना मिळणार नाही.

८. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अंगांनी होणारे सीमांतीकरण, लिंगभेदावर आधारित भेदभाव, वंचना, हिंसा आणि इतर सर्व प्रकारचे शोषण व अत्याचारापासून मुक्ती हे धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असावे.

९. उपजीविकेच्या मुलभूत गरजांची पूर्ती आणि इतर सुविधा (जसे की अर्थपूर्ण आणि सांस्कृतिकदृष्ट्या योग्य शिक्षण, पुरेशा आरोग्य सुविधा, समाजकल्याण आणि समुदायांची सामाजिक प्रगती) चा समावेश असलेले सन्मानजनक, शाश्वत आणि समृद्ध जीविका देणारे एक स्वरचित विकासाचे प्रतिमान आमच्या विकासासाठी लागू करण्याचा अधिकार मिळावा.

१०. आदिवासी/मूळ निवासी जनतेचे त्यांच्या परंपरागत वसतीस्थानांमधून जबरीने स्थलांतर होणार नाही व त्यांना परागंदा केले जाणार नाही. त्याचप्रमाणे विस्थापित लोकांचे पुनर्वसन आमच्या जमिनींवर केले जाऊ नये अशी आमची भूमिका आहे.

११. ज्या समुदायांना वेगवेगळ्या कारणांमुळे विस्थापित केले/व्हावे लागले आहे, किंवा लागत आहे, त्यांची नोंद करून त्यांना मान्य असलेल्या पद्धतींने त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे.

१२. स्थानिक आदिवासी /मूळ निवासी समुदायातील शिक्षकांद्वारे आमच्या भाषेतून प्राथमिक शिक्षण दिले जावे. आमची भाषा, कला, संस्कृती आणि पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण, संवर्धन आणि प्रसाराच्या उद्दिष्टाने उच्च शिक्षण केंद्रे आणि विद्यापीठे स्थापन करण्यात यावीत. आमच्या समुदायाबाबत केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या संशोधनासाठी आम्ही एकत्रितपणे दिलेली पूर्वसंमती आवश्यक राहील.

१३. आमच्या संस्कृतीची योग्य समज व भान असलेला लिंगभावाबाबतचा दृष्टिकोन स्वीकारला जाऊन त्यास स्रीहक्कांबाबतच्या आंतरराष्ट्रीय मानकांचा पुनरुद्धार करणाऱ्या भूमिकेची जोड देण्यात यावी.

१४. बालहक्कांविषयी सरकारच्या जबाबदाऱ्या सरकारला बंधनकारक असाव्यात.

१५. युवकांच्या योग्य विकासासाठी तरतुदी केल्या जाव्यात आणि त्यामध्ये अलिकडच्या काळात वेगाने बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीच्या दुष्परिणामांपासून त्यांना संरक्षण मिळावे.

१६. आमच्या भूभागावरील लष्कराची सर्व ठाणी/तळ हटवण्यासाठी समर्पक उपाययोजना केल्या जाव्यात. भविष्यात अशा प्रकारच्या कोणत्याही सैन्याची ठाणी किंवा तळ लावण्यावर संपूर्णपणे प्रतिबंध करण्यात यावा.

१७. कोणत्याही प्रकारचे वाद, भांडणे आणि मतभेदांचा न्यायनिवाडा आणि शांततेचा पुनर्स्थापना आमच्या पारंपरिक पद्धती, स्थानिक समुदायांचे नियम आणि सलोखा निर्माण करण्याच्या पद्धती यांना अनुसरून व्हायला हवा.

१८. 'नॅशनल पॉलिसी ऑन ट्रायबल्स' या मूळ धोरणविषयक मसुद्याचे नाव बदलून 'नॅशनल पॉलिसी ऑन ट्रायबल, आदिवासी अँड इंडिजनस पीपल' (आदिवासी आणि मूळ निवासी जमातीं/समुदायांकरिता राष्ट्रीय धोरण) असे ठेवण्यात यावे. इतर क्षेत्रातील धोरणे उदा. भूसंपादन, जंगलविषयक व वन्यप्राण्यांबाबत संरक्षणाचे धोरण आणि इतर कोणत्याही कायद्यांतील तरतुदी सदर आदिवासी धोरणातील तरतुदींशी विसंगत आढळल्यास आदिवासी धोरणातील तरतुदीच प्रमाण मानल्या जाव्यात.

या जाहिरनाम्यातील कोणत्याही शब्दाचा वापर कोणत्याही आदिवासी, मूळ निवासी जमात अथवा समुदायांच्या सद्यस्थितीतील किंवा भविष्यात मिळू शकणाऱ्या हक्कांचे उल्लंघन होईल अथवा हक्क कमी होतील अशा पद्धतीने केला जाऊ नये.

परिशिष्टे: विभागीय चर्चासत्रांमध्ये सहभागी झालेल्या प्रतिनिधींची अभिघोषणापत्रे

२१ सप्टेंबर २००४

नवी दिल्ली.

जाहिरनाम्याच्या स्वरूपात स्वीकृत

* या टिपणाच्या तिसऱ्या भागातील पहिल्या परिच्छेदामध्ये केलेली मागणी स्वीकृत होण्यापूर्वी, त्यातील तरतुदींचे सखोल परिक्षण होईपर्यंत, त्या तरतुदींमध्ये अभिप्रेत असणाऱ्या किंवा त्यातून ध्वनित होणाऱ्या सर्व बाबींचे योग्य स्पष्टीकरण मिळून संबंधित संस्था/संघटनांच्या कार्यकारी समित्यांनी त्यास संमत करेपर्यंत त्यांना मान्यता देण्याचा अधिकार आसामच्या प्रतिनिधींनी राखून ठेवला आहे.

■ ■ ■

विविध ठिकाणच्या चर्चासत्रांमध्ये सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांची यादी

नासिक

१. डॉ. अरविंद प्रभ ाकर कुलकर्णी, नासिक
२. श्रीराम र. वैजापूरकर, पाटबंधारे विभाग नासिक
३. ना.सी. पाटील, नासिक
४. प्राचार्य डॉ. भास्कर गिरीधारी, नासिक
५. डॉ. शाम अष्टेकर, यचममुवि, नासिक
६. डॉ. ध्रुव मंकड, नासिक
७. डॉ. यशवंत बर्वे, कुसुमाग्रज प्रतिष्ठान नासिक
८. सुरेश लोखंडे
९. ए. ए. भट्ट
१०. संजय जाधव
११. एस.जे. बावा
१२. अविनाश गांगुर्डे
१३. डी. एन. सुर्यवंशी
१४. यशवंत कोंडाजी फसाळे
१५. मधुकर खंडू फसाळे
१६. मुकुंद फसाळे
१७. अनिकेत साठे
१८. विजय रामचद्र बागूल
१९. रमेश साळवे
२०. क. मा. भामरे
२१. विठ्ठल भिका फसाळे
२२. सुधीर अनंत कुलकर्णी
२३. शिवाजी रामदास झोले
२४. काशिनाथ देवराम वारझाडे
२५. भगवान रामा मधे
२६. हरीभाउ टी. अंबापुरे, इगतपुरी, नासिक
२७. नंदकुमार धात्रक
२८. विक्रांत मते
२९. मुरलीधर फसाळे
३०. सिताराम गबाले
३१. ज्ञानेश्वर जाधव
३२. रामकृष्ण पुनाजी जाधव
३३. नवसू गायकवाड, आदिवासी एकता, दिंडोरी
३४. रामकिसन विश्राम मोरे
३५. राजारामआबाजी चौधरी
३६. निवृत्ती जगन्नाथत्त गायकवाड
३७. संदिप कमळु मेंगाळ, भूमीसेना, पालघर, ठाणे
३८. अरविंद जगताप
३९. संजय देसले
४०. राम. जे. चौरे
४१. वाय. बी. आहिरे
४२. बाळू गभाले
४३. भालचंद्र बोराडे, आ. कर्मचारी संघटना, नासिक
४४. श्री. बेंडकुळे, आ. कर्मचारी संघटना, नासिक
४५. पी. बी. जाधव, आ. कर्मचारी संघटना, नासिक

नागपूर

४६. जिजा चांदेकर, महिला राजसत्ता, बुलढाणा
४७. ॲड. बंड्या साने, खोज, परतवाडा, अमरावती
४८. मायाताई वानखेडे, नागपूर
४९. यामिनीताई चौधरी, नागपूर
५०. राजीव थोरात, नागपूर
५१. शुभदा देशमुख, कुरखेडा, गडचिरोली
५२. आर. एम. पटेल, धारणी, अमरावती
५३. किशोर जंगले, धारण
५४. रमेश लाडखेडकर, निसर्ग सेवा संघ, नागपूर
५५. प्रा. अरुणा गजभीये, नागपूर
५६. निशांत माटे, नागपूर
५७. डॉ. सुषमा पनकुले, नागपूर
५८. प्रा. केशव वारके, नागपूर
५९. ॲड. प्रकाश मेघे, नागपूर
६०. सुखदेवबाबू उईके, माजी आमदार देसाईगंज

नंदुरबार

६१. जयंत पाडवी, उमलोविम, नंदुरबार
६२. राजबन्सी, वळवी, तळोदा, नंदुरबार
६३. राजेश रामराजे, नंदुरबार
६४. सी. के. पाडवी, जि.प. सदस्य, नंदुरबार
६५. सखाराम पाडवी, जि.प. सदस्य, नंदुरबार
६६. सुहास नाईक, आदिवासी विद्यार्थी संघटना
६७. सुनील पावरा, आदिवासी विद्यार्थी संघटना
६८. राजेंद्र गावीत, आदिवासी विद्यार्थी संघटना
६९. टायगर भील, आदिवासी विद्यार्थी संघटना
७०. विष्णू नाईक, आदिवासी विद्यार्थी संघटना
७१. अंबालाल दळवी, आदिवासी वेलऊँअर संघटना
७२. मधुकर पाडवी, आदिवासी वेलऊँअर असो.
७३. रेवसिंग पावरा, आदिवासी वेलऊँअर असो.
७४. रमेश ठाकरे, जनार्थ, नंदुरबार
७५. रुपसिंग शेवाळे, जनार्थ, नंदुरबार
७६. सुखलाल पवार, जनार्थ, नंदुरबार
७७. मिलिंद पावरा, जनार्थ, नंदुरबार
७८. चुनिलाल ब्राम्हणे, जनार्थ, नंदुरबार
७९. वाहरू सोनावणे, जनार्थ, नंदुरबार
८०. डामू ठाकरे, आदिवासी एकता, नंदुरबार
८१. चामुलाल राठवा, आदिवासी एकता, नंदुरबार
८२. भीमसिंग पवार, आदिवासी एकता, नंदुरबार
८३. गुजऱ्या वळवी, आदिवासी एकता, नंदुरबार
८४. वीरसिंग पाडवी, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
८५. जयवंत पाडवी, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
८६. दिगंबर मराठे, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
८७. सीताराम वळवी, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
८८. विश्वास वसावे, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
८९. एम. एम. पोतदार, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९०. एस.डी. गांगुर्डे, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९१. सुभाष पावरा, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९२. बी. बी. पावरा, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९३. के. पी. तडवी, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९४. ए. एम. पाटील, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९५. सी. व्ही. पाटील, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९६. पी. एम. गवळी, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९७. मुकुंद पवार, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार
९८. प्रमोदचंद्र नाईक, आ. कर्मचारी संघटना, नंदुरबार

कुरखेडा (गडचिरोली)

९९. दलपत कुमरे, अंगारा, कुरखेडा
१००. राघोबाजी पेंदाम, मालेवाड, कुरखेडा
१०१. दुर्योधन कचलाम, माहेगाव, कुरखेडा
१०२. चतरु सोमा हलामी, मरकेगाव, धानोरा
१०३. देवाजी तोपा, मेंढा (लेखा), धानोरा
१०४. भारत फिरतू साहळ, कोचीनारा, कोरची
१०५. प्रभू हिरामी, माहेगाव, कुरखेडा
१०६. माधव गोटा, तुकुंब, धानोरा
१०७. उमाकांता मडावी, प.स. सदस्य, कुरखेडा
१०८. ॲड. अनिता समरीत, नागपूर
१०९. कुमारीबाई जमकानंन, कोरची
११०. सुमनताई घोडाम, सरपंच, कुरखेडा
१११. नितीन बारसिंगे, गडचिरोली
११२. दिपक भडे, गडचिरोली
११३. रमेश मडावी, चिखली, कुरखेडा
११४. मनोहर मडकाम, आंधळी, कुरखेडा
११५. राजेंद्रसिं ठाकूर, प.स. सदस्य, कुरखेडा
११६. राजकुमारी ठाकूर, जि.प. सदस्य, गडचिरोली
११७. सुखदेवबाबू उईके, देसाईगंज (वडसा)
११८. शुभदा देशमुख, कुरखेडा

पुणे

११९. काळूराम धोदडे, भूतीसेना, पालघर, ठाणे
१२०. संदिप मेंगाळ, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२१. राजू पांढरा, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२२. दत्ताराम करबट, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२३. रामू सांबरे, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२४. प्रकाश मुंडे, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२५. रामचंद्र मुंढारा, भूमीसेना, पालघर, ठाणे
१२६. उल्का महाजन, सर्वहारा जनआंदोलन, रायगड
१२७. अपर्णा जॉर्ज, मोहोपाडा, जि. रायगड

१२८. नॅन्सी गायकवाड, दिशा केंद्र, कर्जत, रायगड
१२९. गोविंदराव शिंदे, शांतीवन, पनवेल, रायगड
१३०. सुरेखा दळवी, श्रमिक क्रांती संघटना, रायगड
१३१. दिलीप डाके, श्रमिक क्रांती संघटना, रायगड
१३२. कमलाकर हिलम, श्रमिक क्रांती संघटना, रायगड
१३३. बुधाजी डामसे, शाश्वत, मंचर, पुणे
१३४. पंडीत पडळघरे, गरिब डोंगरी संघटना, पुणे
१३५. जितेंद्र मैड, गरिब डोंगरी संघटना, पुणे
१३६. विजय सिद्धवार, श्रमिक एलगार, चंद्रपूर
१३७. ब्रायन लोबो, कष्टकरी संघटना, ठाणे
१३८. दिलीप विंधन, कष्टकरी संघटना, ठाणे
१३९. मधुकर धस, दिलासा, घंटाजी, यवतमाळ
१४०. इंदवी तुळपुळे, श्रमिक मुक्ति संघटना, ठाणे
१४१. दशरथ वाघ, श्रमिक मुक्ति संघटना, ठाणे
१४२. कमळू खाकर, श्रमिक मुक्ति संघटना, ठाणे
१४३. ॲड. बंड्या साने, खोज, परतवाडा, अमरावती
१४४. किशोर मोघे, यवतमाळ
१४५. विक्रम गायवाड, जुना आग्रा रोड, नाशिक
१४६. आशिष कोठारी, कल्पवृक्ष, पुणे
१४७. अनंतराव बोधनकर, ममाविप, पुणे
१४८. सुधाकर मोराणकर, ममाविप, पुणे
१४९. पुरुषोत्तम आगाशे, ममाविप, पुणे
१५०. रामचंद्र मुटाटकर, ममाविप, पुणे
१५१. कल्पना मुटाटकर, ममाविप, पुणे
१५२. ज्ञानेश पाटील, पाथर्ली रोड, डोंबिवली (पु)
१५३. सदाशिव कांबळे, नारी समता मंच, पुणे
१५४. मिलिंद बोकील, ममाविप, पुणे
१५५. वैशाली पाटील, अंकुर, पेण, जि. रायगड
१५६. वसंत पाटील, जिव्हाळा, सुधागड, रायगड
१५७. प्रकाश आंब्राळे, आदिवासी आधार संघटना रायगड
१५८. प्रभा तिरमारे, निर्मला निकेतन, मुंबई
१५९. नेताजी राजगडकर, वर्धा रोड, नागपूर
१६०. डॉ. गोविंद गारे, कोंढवा रोड, पुणे
१६१. डॉ. सुबोध वागळे, प्रयास, पुणे
१६२. राम कौलगी, प्रयास, पुणे

आदिवासी धोरण जागृती समिती (सदस्य)

श्री. ब्रायन लोबो, शोषित जन आंदोलन, (महाराष्ट)
श्री. विक्रम कान्हेरे / रंजना कान्हेरे, जनार्थ, शहादा, नंदुरबार
श्री. काळुराम धोदडे, भूमीसेना, पालघर, ठाणे
ॲड. बंडू साने, खोज, परतवाडा, अमरावती
श्री मधुकर गुंबळे, अपेक्षा होमिओ सोसायटी, मोझरी, अमरावती
श्री किशोर मोघे, ग्रामीण समस्या मुक्ती टस्ट, जळका, वणी, यवतमाळ
श्री. मधुकर धस, दिलासा, घाटंजी, यवतमाळ
डॉ. सतीश गोगुलवार, आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा, गडचिरोली
श्री. विक्रम गायकवाड, आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, नासिक
प्रा. रा. के. मुटाटकर, महाराष्ट मानव विज्ञान परिषद, पुणे
श्री. नेताजी राजगडकर, माजी आमदार, यवतमाळ
श्री. गुणवंत वैद्य, ॲवार्ड, नागभिड, चंद्रपूर
डॉ. सुबोध वागळे, संसाधने व उपजीविका गट, प्रयास पुणे.

केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय आदिवासी धोरणावरील विचारविनिमयाची प्रक्रिया - घटनाक्रम

- फेब्रुवारी (पहिला आठवडा) २००४ : पुणे जिल्ह्यामधील आदिवासी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्रयासला केंद्र सरकारच्या आदिवासी मंत्रालयाच्या धोरणाविषयक मसुद्याबाबत माहिती दिली. त्यांनी या मसुद्याबाबत आदिवासी भागात काम करणाऱ्या संस्था व संघटना यांच्यपर्यंत ही माहिती जावी व या विषयावर विचार विनिमय व्हावा अशी आवश्यकता मांडली.
- फेब्रुवारी (दुसरा आठवडा) २००४ : प्रयासने आदिवासी भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना केंद्र सरकारच्या आदिवासींबाबतच्या नवीन राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याचा गोषवारा उपलब्ध असल्याचे व असा गोषवारा व मसुदा हवा असल्यास प्रयासशी संपर्क करावा असे सूचित करणारे पत्र पाठवले.
- फेब्रुवारी (शेवटचा आठवडा) २००४ : केंद्र सरकारच्या मूळ धोरणाविषयक मसुद्याचा मराठी गोषवारा तयार झाला.
- मार्च (पहिला आठवडा) : आदिवासी विकासाच्या प्रश्नांवर काम करणारे सर्व कार्यकर्ते व इतर अभ्यासक यांच्यामध्ये एकत्रित विचारविनिमय ववा व यासाठी एक कार्यक्रम घ्यावा या प्रस्तावावर प्रयासने इतर काही संस्था संघटनांशी विचारविनिमय केला. अशा प्रयत्नांमध्ये शोषित जन आंदोलन ही जनसंघटनांची आघाडी व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (ममाविप) ही पुणे येथील संस्था यांनीही पुढाकार घेतला.
- एप्रिल (तिसरा आठवडा) २००४ : चर्चासत्राच्या तयारीचा एक भाग म्हणून, केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याची समीक्षा करणारे प्रयासने तयार केलेले एक टिपण सर्व निमंत्रित कार्यकर्त्यांना पाठवण्यात आले.
- मे ८ व ९, २००४ : या नवीन राष्ट्रीय धोरणावर, भारतय शिक्षण संस्था, पुणे या ठिकाणी चर्चासत्र घेण्यात आले. चर्चासत्रामध्ये साधारणपणे २५ संस्था / संघटनांच्यावतीने एकूण ३४ कार्यकर्ते सहभागी झाले होते. माहिती देणारे एक पत्र चर्चासत्रात सहभागी झालेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्यानिशी केंद्र सरकारच्या आदिवासी विकास मंत्रालयाला पाठवण्यात आले. सदर चर्चासत्र ममाविप, शोषित जन आंदोलन व प्रयास यांनी संयुक्तीरित्या आयोजित केले. या प्रक्रियेची माहिती देणारे एक पत्र केंद्र सरकारला चर्चासत्राच्या शेवटी पाठवण्यात आले.
- मे १७, २००४ : या नवीन राष्ट्रीय आदिवासी धोरणावर कार्यकर्ते आणि इतर मान्यवर यांच्यामध्ये सुरू असणाऱ्या विचारविनिमयाच्या प्रक्रियेची माहिती देणारे एक पत्र केंद्र सरकारला पाठवलेल्या पत्राची एक प्रत, महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री मा. श्री. मधुकरराव पिचड यांना पाठवण्यात आले.
- मे २८, २००४ : पुणे येथील चर्चासत्रामध्ये स्थापन करण्यात आलेल्या मसुदा समितीची बैठक, पुणे येथील प्रयासच्या कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली. यामध्ये पर्यायी मसुद्यातील सूचनांचा पुर्नविचार केला व काही मुद्दयांचा अंतर्भाव करून टिपणास अंतिम स्वरूप देण्यात आले.
- जून १०, २००४ : बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनी ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे श्री. नेताजी

राजगडकर यांच्या प्रयत्नाने आदिवासी धोरणावर पहिली विभागीय बैठक आयोजित करण्यात आली.

- जून १९, २००४ : नागपूर, येथे आदिवासी धोरणावर विदर्भपातळीवरील दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. सदर चर्चासत्र खोज, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, अपेक्षा होमिओ सोसायटी, ॲवार्ड आणि दिलासा या संस्थांनी आयोजित केले होते.
- जुलै ३, २००४ : नंदुरबार येथे आदिवासी धोरणावर आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना आणि जनार्थ आदिवासी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बैठक आयोजित करण्यात आली.
- जुलै १०, २००४ : आदिवासी विकास विभाग कर्मचारी सघटनेच्या पुढाकाराने नासिक येथे आदिवासी धोरणावर बैठक आयोजित करण्यात आली.
- जुलै २०, २००४ : आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेच्या प्रयत्नांनी गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा येथे आदिवासी धोरणावर बैठक आयोजित करण्यात आली.
- सप्टेंबर ९, २००४ : अहमदाबाद येथे पश्चिमेकडील चार राज्यांचे (राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र) आदिवासी धोरणावर एकत्रितपणे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्रातर्फे खोज व प्रयासचे प्रतिनिधी सदर कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध चर्चासत्रांमधून मांडल्या गेलेल्या भूमिकेची संक्षिप्त स्वरूपात मांडणी प्रयासतर्फे केली गेली. पश्चिम विभागीय चर्चासत्रांतून मांडल्या गेलेल्या भूमिका / सूचनांचे संकलन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मसुदा समिती मध्ये प्रयासचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.
- सप्टेंबर २२ ते २४ : महाराष्ट्रातर्फे प्रयास संस्थेने दिल्ली येथे आदिवासी धोरणावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये महाराष्ट्राची भूमिका मांडली. महाराष्ट्रातील प्रक्रियेमधून तयार झालेल्या टिपणाचे इंग्रजी भाषांतर दिल्ली येथील कार्यक्रमामधील सहभागी प्रतिनिधींना वितरित करण्यात आले. दिल्ली जाहिरनाम्यामध्ये महाराष्ट्राच्या भूमिकेतील महत्वपूर्ण मुद्दे समाविष्ट व्हावेत याकरिता प्रयास केले.
- डिसेंबर १७, २००४ : आदिवासी धोरण घोषणा परिषदेमध्ये ' केंद्र सरकारचे नवीन आदिवासी धोरण प्रश्न आणि पर्याय ' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी व ग्रामीण भागातील समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न परिषद करीत असते. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री. जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपीठावर आणले. केवळ आदिवासींच्य प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. हाकारास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अ दर्जा दिला आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांच्या सहभागातून एकात्मिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याद्वारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११००७

फोन : (०२०) २५८८४१५० / २५८९७२९८



स्टेज

आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणी आम्हाला बोलंवलंही नाही.
बोटाच्या इशाऱ्यांनी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली.
आम्ही तिथेच बसलो;
आम्हाला शाबासकी मिळाली.
आणि ते स्टेजवर उभे राहून -
आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिले.
आमचे दु:ख आमचेच राहिले
कधिच त्यांचे झाले नाही..........
आमची शंका आम्ही कुजबुजलो.
ते कान टवकारुन ऐकत राहिले
नि सुस्कारा सोडला.
आणी आमचेच कान धरून
आम्हालाच दम भरला
माफी मागा; नाही तर ....!

वाहरु सोनवणे

Registered With the Registrar of Newspaper of India under No. 35835 / 80

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाव्दारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याव्दारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाव्दारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ्य व विकास संशोधन केंद्र २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी) **हाकारा** वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थासाठी)
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड डाफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद , ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद